बाबा आणि मी

डॉ.प्रमोद सूर्यवंशी

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

बाबा आणि मी

डॉ. प्रमोद सूर्यवंशी

बाबा आणि मी

लेखक: डॉ. प्रमोद सूर्यवंशी

३९६/३९७, दीप्ती अपार्टमेंट्स, फ़्लॅट- २१, सी विंग, ई वॉर्ड,
शाहुपुरी, कोल्हापूर, 416003
भ्रमण दरध्वनी 9730328182

इ मेल spramodb27573@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)

प्रकाशन : ३० जून २०२६

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. १५०/- फक्त
(१००% रक्कम लेखकाकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)
(संपर्क- डॉ. प्रमोद सूर्यवंशी - 9730328182

या पुस्तकाचे मूळ प्रकाशक निस्वार्थी कॉम्म्युनिकेशन्स, पुणे, यांनी ई प्रकाशनासाठी ई साहित्य प्रतिष्ठानकडे हे पुस्तक दिले. त्यासाठी आम्ही लेखक श्री प्रमोद सूर्यवंशी आणि निस्वार्थी कॉम्म्युनिकेशन्स यांचे आभारी आहोत.

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

बाबा आणि मी

Baba ani Mee

First Edition published by Niswarthi Publication in India
Februwary 2024

ISBN –

डॉ.प्रमोद सूर्यवंशी

396/397, दीप्ती अपार्टमेंट ,फ्लॅट . 21 , C-विं , Eवॉर्ड , शाहूपुरी कोल्हापूर – 416003.

भ्रमणध्वनी - +91 9730328182 **E mail :spramodb27573@gmail.com**

प्रथमावृत्ती : २०२४

प्रकाशक

निस्वार्थी कॉम्म्युनिकेशन्स

263 , दत्तवाडी ,शंकर मंदिराच्या मागे, पुणे ३०

भ्रमणध्वनी : +91 86055 66839

E mail :

वेबसाईट : www.

मुखपृष्ठ :

अक्षरजुळवणी/ दैनिक सिंधुदुर्ग समाचार,सिंधुदुर्ग

मुद्रक :

किंमत :

सर्व हक्क राखीव. प्रकाशकाच्या पूर्व परवानगीशिवाय या पुस्तकातील कोणताही भाग कोणत्याही स्वरूपात किंवा कोणत्याही प्रकारे पुनर्मुद्रित किंवा रूपांतरित करता येणार नाही.

या पुस्तकात प्रकाशित झालेले मते लेखकाची आहेत. यामध्ये कोणाचाही अवमान करण्याचा लेखकाचा अथवा प्रकाशक यांचा हेतू नाही.पुस्तकात प्रकाशित झालेल्या मतांशी निस्वार्थी प्रकाशन सहमत असेलच, असे नाही.

प्रस्तावना

डॉ. प्रमोद सूर्यवंशी यांनी एका असामान्य आभाळाएवढ्या माणसाच्या सोबतचा जो प्रवास होता त्याचे प्रामाणिक निवेदन इथे केले आहे. आयुष्य अज्ञाताचा प्रवास आहे असे एके ठिकाणी लेखक सांगतो आहे आणि त्यांच्या वाटेला आलेला हा अज्ञाताचा पण आयुष्य उजळून टाकणारा प्रवास त्यांनी कथन केला आहे.

आयुष्याच्या अर्थ कळल्यानंतर जी माणसं त्या अर्थपूर्ण जगण्यासाठी झोकून देतात त्यांना महामानवच म्हणावं लागतं. महामानवांना चरित्र असतं आणि सामान्यांना आयुष्य असतं. पण आयुष्य हे चरित्रासोबत असतं तेव्हा त्या सामान्याचं सुद्धा दिव्य चरित्रात रूपांतर होतं. आपण इथे वाचत असताना डॉ. प्रमोद , बाबा आमटे, आनंदवन आणि हेमलकसा इथल्या वातावरणाशी एकरूप होऊन जातो. असामान्य काम उभं राहात असताना बाबांच्या कष्टांची, वेदनांची जाणीव होते. इथं सुरू असलेल्या कार्यातली संघभावना आणि त्यातून अनेकांच्या वेदना संपविण्याचे आणि अखंड प्रेरणा देण्याचे काम अनुभवता येते.

एखादा महापुरुष आपल्या कतृत्वाने एखादया जागेवर मानवी जीवनातील वेदनांचा हुंकार संपविण्यासाठी एखाद्या भूमीचा तुकडा वापरतो तेव्हा तो तुकडा सर्वांसाठी तीर्थ बनतो आणि तो माणूस तीर्थरूप बनून जातो. अशा व्यक्तीसोबत डॉ.प्रमोद यांनी क्षण व्यतीत केले आणि त्या क्षणांना शब्दबद्ध करून या लिखाणाच्या माध्यमातून आम्हासमोर मांडले आहेत.

जगतगुरु तुकोबाराय म्हणतात,"धन्य काळ संतभेटी". आयुष्याचा जो काळ संतांच्या सोबत असतो तेवढाच धन्य असतो. उरलेला भोगातच जातो. ज्याचं हृदय विशाल आणि व्यापक आहे आणि लोकांची दुःखे संपवण्याचा प्रयत्न करतो आहे, तो जरी नास्तिक असला तरी संतच असतो. अशा डॉ.प्रमोद स्वतःच्या मनाची आंदोलने आणि तिथल्या सर्वांना तोलत राहतात आणि अनुभूतीच्या क्षेत्रात संपन्न होतात.

"इथे नांदती श्रमर्षी या भूमीला क्षरण नाही" याचा समृद्ध अनुभव ते घेताहेत. बाबा आणि साधनाताई यांच्या एकरूप सहजीवनाची जी साधना आहे त्याचे ते

साक्षीदार बनतात. एकमेकांच्या सहअस्तित्वाची जाणीव ठेवत एकमेकांत मिसळून जाणं काय असतं हे तटस्थपणे पाहत थक्क होऊन जातात. आयुष्याच्या या अज्ञाताच्या प्रवासातले जे उजळून गेलेले दिवस होते ते डॉ. प्रमोद यांनी नेमकेपणाने टिपले आहेत. सूर्याच्या प्रकाशात विलीन होऊन आपले अंतरंग उजळून घेत त्यांनी आपले आयुष्यातील संपन्न क्षणांची शिदोरी या लिखाणातून ते वाटत आहेत. आनंदवन सोडतानाची घालमेल सांगताना ते बाबांचे गीत सांगतात,' शृंखला असू देत पायामध्ये पण मी गतीचे गीत गाणार आहे.'

ज्याला भवतालचे दुःख स्वतःपेक्षा मोठे दिसते त्याला स्वतःची आसवे गळायला वेळ कुठे असतो. हे सर्व वाचत असताना डॉ. प्रमोद यांचे प्रवाही लिखाण आपल्याला जखडून ठेवते आणि आत्मभान जागे करत आपल्याला आपल्या आयुष्याचा स्वधर्म आणि युगधर्म कोणता असायला हवा याची जाणीव करून देते. थोरांचे बोट आयुष्यात थोडा वेळ जरी हातात आले तरी वाट आपल्यासाठी काय असावी याचे मार्गदर्शन होते. डॉ.प्रमोद यांनी हे तुकोबारायांच्या उक्तीप्रमाणेच लिखाण केले आहे.

" वाट दावी त्याच्या पुण्या नाही पार

होती उपकार अगणित "

इंद्रजीत देशमुख

मनोगत

'बाबा आमटे' या व्यक्तिमत्वाचा शोध घेण्यासाठी म्हणून मी बाहेर पडलो आणि पुढे वर्षभर त्यांचाच होऊन राहिलो. तो झपाटलेला काळ होता. अस्वस्थ मनाच्या वेड्या तरुणाईला आव्हानांची ओढ होती. कोकणातली चांगला चाललेला वैद्यकीय व्यवसाय मोडून मी आनंदवनाची वाट धरली. तेव्हा समाज,नातेवाईक,मित्रमंडळी आदी अनेकांकडून प्रचंड टीका झाली. अक्षरशः वेड्यात गणला गेलो. पण.... तरीही व्रतस्थ संन्याश्याप्रमाणे वाट तुडवीत राहिलो. पुढे आनंदवनऐवजी सोमनाथला वास्तव्याचा योग आला आणि साधारण वर्षभर मी तिथेच राहिलो. 'बाबाला' भेटण्याचा या वेडात माझे अवघे जीवनच बदलून गेले.

आनंदवन, सोमनाथ हेमलकसा येथील कमी - अधिक वास्तव्यादरम्यान अनेक बऱ्यावाईट अनुभवांची मौज होती. पैशाने माणसे श्रीमंत होतात, हे मी पाहून होतो. परंतु दुःख आणि केवळ दुःखानेच समृद्ध झालेली ती बहारदार आयुष्ये मी तिथेच पाहिली. मी धन्य झालो. पुढे ज्या ज्या वेळी माझ्या वैयक्तिक दु:खातून बाहेर पडलो, तेव्हा ती प्रेरणा मला बाबा आणि त्यांच्या अवघ्यांपासूनच गवसली. वेळोवेळी 'मूषकाला ऐरावती बळ मिळाल'!

खरेतर मी बाबांविषयी लिहिणं म्हणजे..... काय लिहिणार मी? त्यांची आणि माझी अनेकदा भेट झाली. संवाद घडला. ते हितगुज वैयक्तिक न राहता जनांना समजावे ही कामना मनी धरून जसे जमेल तसे मी लिहिता झालो. उद्या कोणी सांगावं, हे सारं वाचून असाच एखादा 'बाबा' भविष्यात नव्याने जन्म घेईल. वास्तविक अंतर्मुख करणारे अनुभव आपणा सर्वांना अनेकदा येत असतात. असे मोजके अनुभव कागदावर उतरविताना त्यांना अलंकारांची गरज भासत नसते. कारण मुलत:च ते अस्सल अलंकार असतात. केवळ शब्दफुलांनी शृंगारलेल्या 'ऐवजां' ऐवजी अनुभवसिद्ध शब्द सुमनांनी पखरलेले पारडे नेहमीच जड असते.

करुणाघन बाबांची मूर्ती आजही माझ्या डोळ्यांसमोर उभी राहते. त्यादिवशी आनंदवनातून कायमस्वरूपी घरी परतण्यासाठी मी बाबांचा निरोप घ्यावा म्हणून

त्यांना भेटावयास गेलो. तेव्हा त्यांच्या डोळ्यात पाणी उभे राहिले. "आता ही आपली शेवटची भेट" बाबांच्या तोंडून बाहेर पडलेल्या या शब्दांनी तेव्हा माझे काळीज अक्षरश: पिळवटून गेलं होतं. धारदार सुरा कोणी छातीत खूपसावा आणि काळीज चिरून जावं अगदी तसंच झालं होतं. कालांतराने त्यांना पुन्हा एकदा भेटण्याची तीव्र आस मनी लागून राहिली होती. पण.... संसारीक अडचणींमुळे पुढे ते कधी शक्य झाले नाही. हो, एकदा मात्र त्यांना भेटायला जायचेचं म्हणून ठाम नियोजन केले होते पण एके दिवशी पेपरमध्ये अचानक बातमी आली..... बाबा सर्वांना सोडून निघून गेले होते.... कायमचेचं .... पुन्हा कधीही न भेटण्यासाठी....

त्यांच्याशी पुन्हा न झालेल्या भेटीची सल माझ्या मनात नेहमीच सलत राहिल. हे मात्र अगदी खरं. त्यांच्या विस्तृत परिवार जणांच्या समृद्धीकडे पाहून मी दु:खातही जगायला शिकलो. हे ऋण कसे फेडायचे? श्रध्येय बाबांच्या स्मृतीस माझे विनम्र अभिवादन !

डॉ.प्रमोद सूर्यवंशी

ऋणनिर्देश

या पुस्तकाच्या पूर्ततेसाठी अनेक व्यक्तींचे सहकार्य लाभले. पुस्तकात वापरलेल्या साहित्य सामग्रीबद्दल संबंधित व्यक्ती तसेच संस्था यांचे मनापासून आभार!

निस्वार्थी प्रकाशनचे श्री. विजय अनंत मरल यांचा मी मनापासून ऋणीच राहू इच्छितो. कारण त्यांच्याशिवाय हे नवनिर्माण संभवनीयच नव्हते ! त्यांनी वारंवार पिच्छा पुरविला आणि काही मौल्यवान सूचना, बदल करावयास सांगून बहुमोल मार्गदर्शन केले. निस्वार्थी प्रकाशन या नावाप्रमाणेच त्यांचे कार्य आहे. अगदी निस्वार्थीपणे त्यांनी हा सर्व उपद्व्याप मांडला आहे असे म्हटले तरी ते वावगे ठरणार नाही. त्यांचे आभार मानावे तितके थोडेच.

मजकुरातील चुका दुरुस्त करून डीटीपी तयार करणाऱ्या व या पुस्तकाचे मुखपृष्ठ सजविण्यासाठी आपले बहुमूल्य योगदान देणाऱ्या

दैनिक सिंधुदुर्ग समाचार, सिंधुदुर्ग '

यांचेही मनापासून आभार.

ज्या ज्ञात - अज्ञात व्यक्तींनी माझ्या या पुस्तकास हातभार लावला त्या सर्वांचे मनापासून आभार व कृतज्ञता !

धन्यवाद,

डॉ.प्रमोद सूर्यवंशी

अर्पण..

कोरोनाच्या कराल दाढेत सापडुन

पुन्हा कधीही न दिसण्यासाठी

नाहीशी झालेली प्रिय बहीण जिजीस....

आणि

प्रिय पत्नी सौ. दिपाली ,

दोघींना मन:पूर्वक अर्पण !

बाबा **आणि मी.....**

१९९६ सालची गोष्ट. तेव्हा मी नुकताच डॉक्टर झालो होतो. आपण डॉक्टर झालोय यावर माझा मलाच विश्वास बसत नव्हता. त्यामुळे पाय हवेत अन् आकाश ठेंगणं झालेलं. आरशासमोर उभं राहून डोईवरच्या केसांना वळण देताना समोरील व्यक्तींची मी मलाच नव्याने ओळख करून द्यायचो.... हे ' डॉ. प्रमोद सूर्यवंशी '! अस्मादिकांना क्षणभर न्याहाळून झाले की, स्वारी पुढील कामास रवाना होई. मग चालताना दोहो बाजू छातीपासून थोडे विलग होत अन् नसलेली छाती उगाचच पुढे येई !

माझे आई वडील प्राथमिक शिक्षक. वडील जुन्या काळातील सातवी पास तर, त्याहीकाळी आईने मात्र दहावीनंतर डी.एड. केलेलं. दोहोंकडे ठार निरीक्षर शेतकरी कौटुंबिक पार्श्वभूमी असतानाही दोघांनी बरीच मजल मारली होती असेच म्हणावे लागेल. ' रानात कामाला गडी-माणसं न्हाईत अन् ह्यो xxx चा शाळा शिकतोय.' बापाला त्याच्या बापानं गचांडीला धरुन शाळेतनं बाहेर ओढलं. बोकांडीवर जनावरं आणि शेत बांधलेलं. ' आता आपली सुटका नाही' या भयानं मुसंडी मारुन बापानं मामाचा गांव जवळ केला. अन् त्याच्या गोठ्यातील जनावरांचं शेण-मूत सारून शिकता झाला. सातवी पास होऊन मास्तरकीही मिळविली. त्यामुळे बाप आमचा ग्रेटचं! तिकडे आईनेही रॉकेलचा दिवा पेटवून

नाकाचा शेंडा काजळीनं काळवंडला तरी शिक्षणाचा दिवा विझू दिला नाही. त्यामुळे तीसुध्दा ग्रेटचं!

वास्तविक, मी साधा जनरल प्रॅक्टिशनर. तो काळच तसा होता.' आपलं पोरगं डॉक्टर नाहीतर इंजिनिअर झालं पाहिजे ' हे प्रत्येक मध्यमवर्गीय आई वडिलांचं ठरलेलं स्वप्नं असायचं. खोऱ्यानं पैसा ओढता येईल अशी ही दोन क्षेत्रे तेव्हा त्यांच्या दृष्टिक्षेपात होती. पण व्यवहारी जगाचा अनुभव, आणि जुजबी ज्ञानामुळे निर्णयक्षमता आणि दूरदर्शीपणा यांचा दोघांकडेही अभाव होता. ' आपल्या मुलाला डॉक्टर करायचं' या एकाच ध्यासानं त्यांना पछाडलं होतं. पण तो कसला डॉक्टर होणार ? कोणती पदवी त्याच्याकडे असणार ? याचं कसलंही भान त्यांना मुळीच नव्हतं. मी बारावी सायन्स उत्तीर्ण झाल्यानंतर माझं ॲडमिशन कोणत्या मेडिकल कॉलेजमध्ये होणार हे मला अजिबात ठाऊक नव्हतं. तोपर्यंत तिकडे माझ्या मामाने माझ्या परस्पर एका मेडिकल कॉलेजला माझे ॲडमिशन उरकलं होतं !
'मामा, हा कोणता डॉक्टरी कोर्स रे ? माझ्या भाबडया प्रश्नावर मामा एकदम चिडीचूप मग मीही गप्प-गारं. मामापुढे जास्त काही बोलण्याची हिंमत माझ्यात नव्हती. मग काय, ' तेरी भी चूप और मेरी भी चूप !' सगळा सावळा गोंधळ. एखाद्या गोष्टीविषयी परिपूर्ण ज्ञान स्वत:ला नसेल तर ते जाणकार व्यक्तींना विचारण्यात संकोच तो कसला ? अधिकारी व्यक्तीची मदत त्यांनी जरुर घ्यायला हवी होती असे मला आजही वाटते. पण तेव्हाच काळ हा भांडवलशाहीच्या जागतिकी करणाचा होता.आर्थिक सुबत्तेचे वारे देशात वाहू लागले होते.मध्यमवर्गीयांना क्षितीजावरील श्रीमंतीची स्वप्ने खुणावत होती. वाकुल्या दाखवीत होती.

चौथी व सातवीच्या स्कॉलरशीप परिक्षेत मी चांगले यश संपादिले होते. त्यावेळी जिल्ह्यातून पहिल्या काही क्रमांकात माझा नंबर हमखास असे. शालेय यशाची घौडदौड अगदी बालवयापासून जोरात सुरु होती. दहावीच्या बोर्ड परिक्षेत पहिल्या दहा-वीस पोरांत भी हमखास असणार याची माझ्या सर्व शिक्षकांना खात्रीच होती. पण....दुर्दैवाने इयत्ता नववीत असताना वडिलांच्या अत्यंत मारकुटया स्वभावामुळे माझी सुसाट धावणारी यशवंत एक्सप्रेस पटरीवरुन कधी उतरली ते कोणासही समजले नाही. दहावीला बोर्डात येवू शकणारा मी पार मागच्या रांगेत कधी जावून बसलो, ते माझे मला देखील कळले नाही. मग व्हायचे ते झालेचं. माझे कधीही भरून न येणारे प्रचंड शैक्षणिक नुकसान झाले.

मी मधूनच महिना-महिनाभर शाळेला दांडी मारत असे. शाळेसाठी दररोज वेळेवर निघे पण शाळेत न जाता बाहेरच भटकत बसे. शाळा सुटल्याच्या वेळी साळसूदपणे घरी येई. त्यातून मग पुढे कसेतरी रडत-रखडत बारावी सायन्स उत्तीर्ण झालो. बारावीला फारच कमी गुण मिळाले. शाळेबाहेर जास्त गुण उधळले होते. बघता-बघता सारी स्वप्ने धुळीस मिळाली. मला बारावीला खूपच कमी मार्कस् मिळाले असले तरी मी भूगोल या विषयांत संपूर्ण राज्यातून पहिला आलो होतो. अगदी प्राथमिक शाळेपासूनच मला भूगोल विषय खूप आवडायचा. तो शिकताना मी दंग व्हायचो. भान हरपायचो. अनंत विश्वाची सफर करुन यायचो. खरेतर, दहावीनंतर मला ' कला शाखेचे ' खूप आकर्षण वाटत होते. 'आर्टसला' प्रवेश घ्यावा असे वारंवार वाटायचे. तिकडील सर्वच विषय मला आकृष्ट करीत. पण हे घरी बोलायची सोय नव्हती. कधीतरी आईजवळ कला शाखेला जाण्याबाबत विषय काढी, पण... ' बाळ तू डॉक्टरच हो ' असे पालूपद ऐकायला मिळे. चाचपडत बसण्याशिवाय मग पर्यायच उरत नसे.

कसाबसा एकदाचा मी बारावी उत्तीर्ण झालो अन् मला मारुन मुटकून मुसलमान बनविण्याची प्रक्रिया सुरु झाली. कधी- कोठे-कशास मामाने माझे ॲडमिशन केले ते माझ्या गावीही नव्हते. त्यानंतर मात्र कसे का होईना, तर रडतखडत म्हणा, एकदाचा मी डॉक्टर झालो. गोड-गोड शाबूदाण्याच्या गोळ्यांचा होमिओपॅथिक तज्ञ ! माहित नाही कोणी लिहिलीयं ती शायरी मला आजही हटकून आठवते

उठाके ले गए, सब लोग मुझे सुली तक,

और मैं चिल्लाता रहा,

यारो मेरा बयान तो ले लो।

तर असा मी होमिओपॅथ ! तेव्हा नुकताच डॉक्टर झालेलो. दवाखाना नेमका कोठे सुरु करायचा हा प्रश्न ओघाने समोर आला होताच. त्यावर मला बरीचशी मतमतांतरे ऐकून घ्यावी लागली होती. पण सरतेशेवटी बहुमताचा कौल असा झाला की, मी कोकणात जाऊन दवाखाना थाटावा. तिकडे बक्कळ पैसा कमाविता येतो. (अगदी अक्कल नसली तरी !)' खोऱ्याने पैसा कमवायचा असेल तर कोकणात जावे ' असा जणू अलिखित नियमच बनला होता तेव्हा.

मलाही हाच सल्ला सर्वांकडून दिला गेला. त्यापुढे मी नतमस्तक झालो. अनेकांच्या सल्ल्याची तामिल करायची म्हणून मी तिकडे प्रस्थान ठेवले. ' येवा कोकण आपलोच आसा ', ` कोकण जणू आंदणचं मिळालयं, या भावनेनं मी मालवणला कूच केले. कोकणात मी मालवणचाच परिसर का निवडला यालाही सहज एक निमित्त घडले. डॉक्टरी पास झाल्यानंतर दवाखाना सुरु करण्यापूर्वी कोठेतरी मस्त फिरुन यावेसे वाटत होते. एके दिवशी असेच मी दिपक टेके या मित्राबरोबर गप्पा मारत बसलो होतो. सहजच त्याला म्हटले, "चल आपण दोन दिवस कोठेतरी फिरुन येऊ." त्यावेळी त्याच्याकडे नवीन मोटारसायकल आली होती. ती घेऊन दोघे मालवणला गेलो. भरपूर भटकंती झाली. मनसोक्त मौज केली. परतीचा प्रवास आचरामार्गे करायचा म्हणून निघालो. आचरा मालवणपासून साधारणत: १५ किमी अंतरावर आहे. आचऱ्याच्या तिठयावर (मुख्य चौकात) पोहचलो. तेव्हा याठिकाणीही समुद्रकिनारा आहे असे समजले. तिठयापासून पश्चिमेला तो तीन-चार किमी अंतरावर होता. आमच्याकडे भरपूर वेळ होता.

आचऱ्याचा समुद्रकिनारा पाहून पुढे निघू, म्हणून आम्ही तिकडे वळलो. संपूर्ण रस्ता वाड्या-वस्त्यातून वाहत होता. अरुंद पण अतिशय सुंदर नागमोडी वळणाचा हा रस्ता छोट्या-मोठ्या टेकड्यांना वळसा घालून पुढे सरकत होता. रस्त्याच्या दुतर्फा समृध्द वनराई हिरवाईने नटली होती. त्यातूनच अधून-मधून वसलेली मोजकी कौलारु घरे डोकावायची. तर कधी समुद्राची छोटीशी खाडी दर्शन द्यायची. जाताना वाटेत एक खळाळता ओढा वाहत होता. दर्या दर्शनास तो व्याकूळ झाला होता. विठ्ठलाच्या दर्शनास आसुसलेल्या वारकऱ्याच्या ओढीने धावत होता. पाण्याची खळखळ आणि पक्षांचा गुंजारव एका वेगळ्याच आध्यात्मिक उंचीवर घेऊन जात होता. दिव्यत्वाची प्रचिती येत होती. मन अगदी प्रसन्न झाले. सर्वत्र नीरव शांतता होती. कसलीही घाई गडबड नव्हती. लोकांची, वाहनांची वर्दळ तर नावालाच होती. छोट्या-छोट्या टेकड्यांमधून नागमोडी वाहणारा रस्ता जेव्हा संपला तेव्हा समोर सर्वदूर दर्यासागर पहुडला होता. नजरेच्या टप्यात मावत नव्हता. वाह....क्या बात है ! आपसूक शब्द बाहेर पडले. अतिशय स्वच्छ आणि सुंदर समुद्रकिनारा आचऱ्यास लाभला होता. स्वप्नवत वाटावा इतका नयनरम्य निसर्ग सर्वत्र भरभरून पसरला होता. खरचं निसर्गाने सौंदर्याचं माप कोकणच्या ओंजळीत अगदी मुक्तहस्ते रित केलं होतं. याचि देही,

याची डोळा मी आचरा पहिला अन् मन तृप्त झालं ! देहभान हरपून निसर्गाचं अद्‌वितीय देणं मी डोळ्यात साठवित होतो. तितक्यात कोठूनशी वाऱ्याची एक झुळुक आली अन् हळूच माझ्या कानात सांगून गेली, 'डॉक्टर, दवाखाना याच गावात काढायचा बरं !'

शुभस्य शीघ्रम. परतीच्या प्रवासाला लागण्यापूर्वीच आचऱ्यातील काही कारभाऱ्यांच्या लागलीच भेटी घेतल्या ! "मी डॉक्टर सूर्यवंशी. सांगलीहून आलोय. मला आपल्या गावी दवाखाना सुरू करायचा आहे. कोठे जागा मिळेल का?" मी अगदी अधिरतेने विचारीत होतो. गाव कारभारी मला आपादमस्तक न्याहळीत होते. 'डॉक्टर आहे ? दिसतोय तर पोरसवदा.. पण ठीक आहे', असे वाटून त्यांनी माझी जुजबी चौकशी केली अन् खात्री वाटून घेवून एकदाचा होकार भरला.

"जागेचं सोडा ओ डॉक्टर, ती जरूर मिळेल. पण तुम्ही कधी येतायं ते सांगा. चार दिवसांत परत या. दवाखाना लगेच सुरू करूया."

माझ्या आनंदास पारावर उरला नाही. मन उचंबळून आलं. खरचं मला शब्दातीत आनंद झाला होता. इतक्या जलद सर्व काही घडेल याची यःकिंचितही कल्पना नव्हती. अनपेक्षित घडत होतं. एका झटक्यात सगळं काही ठरलं - ठरवलं जात होतं. ऊर भरून आला. आनंदाच्या भरात, वेगात, परतण्यासाठी, परत निघालो. लढाई जिंकूनच योध्दा घरी चालला होता जणू !

केवळ आठच दिवसात मी, मामेभाऊ विकास व मित्र रमेश बॅगा भरून तयार झालो आणि एक दिवस आचऱ्यात येऊन दाखल झालो. आमच्या जेवण्याची - राहण्याची सर्व व्यवस्था कारभाऱ्यांनी चोख केली होती. गावातील मुख्य रस्त्यावरील एक छोटीशी खोली दवाखान्यासाठी उपलब्ध करून दिली होती. दुसऱ्या दिवशी कारभाऱ्यांनी तातडी केली. कोठूनसा पिऊन तर्रर् झालेला एक सुतार उचलून आणला. दवाखान्यासाठी हवे असणारे फर्निचर बहाद्‌दराचे एकाच दिवसात बनवून झाले होते. अर्थात ते कामचलाऊच होते. तोवर तसाच एक पेंटरही आणला गेला. मंतर मारल्यासारखा 'दवाखाना' असा बोर्ड एका तासात बनविला अन् दर्शनी भागात भिंतीवर टांगला. खोलीच्या भिंतींना आतून-बाहेरून डिस्टेंपर मारला. तेवढीच लकाकी. पुढचे पुढे बघू म्हणून आताशी जास्त शोभा केली नाही. थोडसं रूपडं आल्यासारख वाटू लागलं. 'नवीन दवाखाना सुरू

होतोयं वाटतं' येणा-जाणारी कुजबुजू लागली. जाताजाता क्षणभर थबकून डोकावू लागली. तोवर मी औषधे व इतर उपकरणांची मांडामांड केली. दवाखान्यास कळा आली. सर्व जुजबी उपचार पुरे केले. दुसरे दिवशी एका बुजुर्ग थोरल्या माणसाच्या हस्ते औपचारिक उद्घाटन करून पेढे वाटले. त्याक्षणी माझ्या मनातील सर्व तिढे सुटले. एकदाचा दवाखाना सुरू झाला. स्वप्न सत्यात उतरले अन् पहिल्याच दिवशी मी चक्क चार रूग्ण तपासले. मग मलाही बरे वाटले.

संपूर्ण दिवस आनंदात गेला. दिवसभराच्या धावपळीने थोडी दमछाक झाली होती. होता-होता रात्र (कि काळरात्र) झाली आणि अचानक....समुद्राचे खारे पाणी गावात शिरले. गावकऱ्यांच्या लेखी असे आजपर्यंत कधीही घडले नव्हते. काय होतयं ते कोणासही समजेनासे झाले होते. समुद्राचे पाणी गावात शिरु नये म्हणून खाडीवर एक भला मोठा बंधारा बांधलेला होता. दर्यास कितीही भरती आली तरी त्याने माप ओलांडू नये म्हणून बंधाऱ्याची योजना केलेली होती. पण दर्यासागराने माप नुसतेच ओलांडले नव्हते तर ते मोडून फेकून दिले होते. अघटित घडले होते. कधी नव्हे तो आज बंधारा फुटला होता. पाणी दवाखान्याकडे जसे सरकू लागले तसे माझ्या तोंडचे पाणी पळाले. कशीबशी औषधे आणि इतर साहित्य पटापट बॅगेत भरले अन् खुंटीला टांगले. लगोलग आम्ही तिघे तेथून बाहेर पडलो अन् बघता-बघता दवाखाना पाण्यात गेला. रस्त्यावरील पाण्यातून कसेतरी वाट शोधत आम्ही पुढे निघालो. राहत्या व्यवस्थेकडे जायचे होते. ती उंचावरील सुरक्षित जागा होती. बॅटरीच्या उजेडात रस्त्यावर पाहू लागलो तर पाण्यातून वाहत येणारे साप दिसू लागले. तसा आमचा जीव टांगणीला लागला. कसेबसे एकदाचे घरी सुरक्षित पोहचलो. तसा जीव भांड्यात पडला. तोवर घरात एक छोटासा साप कोठूनसा अवतीर्ण झाला. आजीने तो तत्परतेने मारला अन् अलगद उचलून बाहेर टाकला. हाश-हुश्श करीत आम्ही तिघे फ्रेश झालो. जीव मुठीत घेऊन मुठभर भात कसाबसा रिचविला अन् अंथरूणावर पडलो. पण काही केल्या झोप येईना. रात्री कौलातून छोटासा किडा किंवा पाल टपकन् आमच्या अंथरूणावर पडायची. त्याच्या आवाजाने तिघेही घाबरून उठायचो. बॅटरीच्या उजेडात खात्री करून घ्यायचो. साप तर नसेल ? मग पुन्हा झोपण्याचा प्रयत्न करायचो. रात्र अक्षरश: जागून काढली. छतावरून काही पडल्याचा अगदी क्षीण आवाजही साप टपकल्याची जाणीव करून द्यायचा.

सकाळी सर्वत्र पाणी कमी झालेले दिसले. बरे वाटले. जीवात जीव आला. निसर्गाने आपले एक वेगळेच रौद्ररूप दाखवून दिले होते. ते अत्यंत उग्र आणि भयावह होते. भविष्यात इथे काय-काय वाढून ठेवलयं कोणास ठाऊक ? माझ्या मनास हूरहूर लागून राहिली. चार दिवस जास्तीचे राहून विकास व रमेश गावी परतले. मी एकटाच उरलो. आता एकट्यानेच लढायचे होते. माझ्या राहण्या-जेवणाची व्यवस्था नव्याने मुणगेकर आजींकडे केली गेली. तब्बल नऊ खोल्यांच्या घरात मुणगेकर आजी- आजोबा एकाकी राहत होते. दोघेही वयस्कर पण खूप प्रेमळ होते. आम्ही तिघे एकत्र झालो.

येथे रोजचा दिवस नवीन असे. नवीन रूग्ण, नवी समस्या, नवीन भाषा, नवा अनुभव. कोकणी-घाटी आचार- विचारांत जमीन-अस्मानाचा फरक जाणवे. मालवणी भाषा ऐकायला कानांना खूप गोड वाटे. मला मालवणी ओ की ठो कळत नव्हते. त्यामुळे मग खूप गमती-जमती होत. समोरील रूग्ण शुध्द मालवणीत बोलू लागला की माझी पंचाईत होई. 'डॉक्टरानू माका ताप येता' असं कोणी म्हंटलं की मग पुढचं सारं जर-तर आणि ठोकताळे ! मी अनुमानाने औषध देऊन मोकळा होई. दुरूस्त नाही झालं तरी फारसं बिघडणार मात्र नाही, या अंदाजाने औषध देई. एकदा मात्र गंमतच झाली. एक वयस्कर आजोबा चेहरा पाडून माझ्याकडे आले. दवाखान्यात मी एकटाच बसलो होतो. त्यावेळी इतर कोणी रूग्ण माझ्यासमोर नव्हते. घाईगडबडीत आजोबा आले अन् समोरील खुर्चीत बसले.

'आजोबा काय त्रास होतोय ?" म्हणून मी विचारलं, तर म्हणाले-

"झाड्याक जाता."

मला काहीच समजले नाही. मी पुन्हा एकवार विचारले. तर त्यांचे पुन:श्च तेच पालुपद "झाड्याक जाता."

मालवणी व्यतिरिक्त त्यांना इतर कोणतीही भाषा येत नव्हती, आणि इकडे तर मालवणी डोक्यावरून जात होतं! मला काहीही उमगत नव्हतं. मी वारंवार विचारतोय हे पाहून अगोदरच थकलेले आजोबा वैतागले होऊन पोटावरून हात फिरवू लागले. चेहरा कसनुसा करू लागले. कुंथण्याची नक्कल करू लागले. शेवटी मी माझ्यापरीने अंदाज बांधला 'एकतर उतरते वय, आतड्यांची कुंथण्याची ताकद

कमी त्यामुळे त्यांना बरेच दिवस संडास साफ झाले नसावे. बध्दकोष्ठतेचा त्रास होत असावा,' असे गृहित धरून मी त्यांना कोठा साफ होण्यासाठीचे औषध दिले. मात्रा समजावून घरी पाठविले. दुसऱ्या दिवशी सकाळी नातवाला सोबत घेऊन आजोबा दवाखान्यात हजर ! आजोबा आज खूपच थकलेले दिसत होते. मला समोर पाहताच कसेतरी बोलले,

"डॉक्टरानू खूपच झाड्याकं जाता, औषधाचा काय गुण येवूक नाय."

मी संभ्रमात पडलो. अंदाज चुकला की काय? त्यातूनही स्वतःला सावरीत आजोबांना धीर देत म्हणालो,

" आजोबा, नका काळजी करू, होईल संडास साफ. थोडा वेळ वाट पाहा. नाही झाले तर देऊ इनिमा. "

माझे बोलणे ऐकून सोबत आलेला नातू चपापला. मला म्हणाला-

"अहो डॉक्टर साहेब, आमच्या आजोबांना अगोदरच हगवण लागलीय अन् इनिमा कशाला देताय ? रात्रभर ते संडासमध्येच बसून आहेत. खुप अशक्तपणा आलायं. एखादी सलाईन तरी लावा. "

नातवाचे खडे बोल ऐकून मी डबल चपापलो. मला चक्कर येणेच बाकी होते. OMG 'झाड्याकं जाता.' याचा अर्थ मला आता चांगलाच उमगला होता. मी कपाळावर हात मारून घेतला. जीवात जीव असेपर्यंत तरी हा शब्द विसरणे आता मला शक्य होणे नव्हते. माझ्या मालवणी भाषाविषयक अज्ञानामुळे प्रारंभीच्या काळात खूप अडचणी निर्माण व्हायच्या. कधी- कधी अशा गमतीशीर घटनाही घडायच्या. तेव्हा हसून-हसून पुरेवाट व्हायची. पण कोणाच्या जीवावर बेतले नाही म्हणून बरे. नाहीतर, बस्ती उजड जाती बसाने से पहले !

या घटनेनंतर मात्र मी कानाला खडा लावला. कोणत्याही परिस्थितीत मालवणी भाषा आपण शिकायचीच. ठाम निश्चय करून तो मी अंमलातही आणला. पुढील तीन-चार महिन्यात मालवणी चांगलेच समजू लागले आणि बऱ्यापैकी बोलताही येऊ लागले. भाषेचा अडथळा दूर केल्यानंतर मात्र मी झपाट्याने तिथे 'लोकप्रिय' होऊ लागलो. दिवसेंगणिक रूग्णांची गर्दी वाढू लागली. 'होम-व्हिजीट' साठी बोलवणे येऊ लागले. रात्री-अपरात्री कोणी रूग्णाने बोलाविले तरी मी एका पायावर तयार असे. बॅटरीच्या उजेडात उत्साहात जंगलातील

पायवाट, खाचखळगे तुडवीत असे. कसलेही भय वाटत नसे. उलट रात्र - सहलीची ती पर्वणीच वाटे. कित्येकदा रस्त्यातून दोन-तीन साप ओलांडून जावे लागे. प्रारंभी सर्पांची खूपच भीती वाटायची. पण कालांतराने तीही नष्ट झाली. सत्तरीची मुणगेकर आजी कोणताही सर्प सहज बुकलायची !

नवा प्रदेश, नवी माणसे, नवी संस्कृती. माझ्या दृष्टीने तेथील सारे काही नवनवीन होते. माझे कुतूहल अपार. त्यामुळे तिथे रमायला, स्थिरावयाला मला फारसा वेळ लागला नाही की वेगळे प्रयास करावे लागले नाहीत. नवीन गोष्टींतील कुतूहल माझ्या उत्साहास उधाण आणी. मग काय, लोणच्याप्रत मी तिथे चांगलाच मुरलो ! कोकणी माणसे खूप गोड, प्रेमळ, लाघवी स्वभावाची. त्यांच्या बोलीभाषेतही खूप गोडवा असे. मालवणीचा लहेजा काही औरच जाणवे. कोणी एखादा अस्खलित मालवणी बोलू लागला की ऐकतच राहावेसे वाटे. अत्यंत सरळ, साध्या स्वभावाची प्रामाणिक माणसे. भांडण नाही की, तंटा बखेडा नाही. कोणाला मुद्दामहून फसविणे नाही. पैशाचा व्यवहार तर अगदी चोख. कोणाकडे पैस मिंधे नाही. त्यामुळे माझी उधारी तिथे कधी साचलीच नाही. एखाद्याचे मत नाही पटले तर प्रतिक्रिया न देता आपल्या मार्गाने शांतपणे निघून जातील ही माणसे. कधीही कडक, कडवट, उर्मट, उलट उत्तरे देणार नाहीत. मारामारी, शिवीगाळ असला प्रकार करणार नाहीत. पण हो, एकदा का मन दुखावलं तर हयातीत तुमची पायरीही चढणार नाहीत, असा स्वाभिमानी स्वभाव ! त्यामुळे या लोकांना खूप जपावे लागे. मी दक्ष होतो. त्यांची मने जपत होतो. उणं-अधिक पाहत होतो. 'मौनम सर्वथ:' हा गुण तेथील सर्वांच्या रक्तातच असावा जणू. प्राणीमात्रातही तो अवतरला होता की काय कोणास ठाऊक? कारण तिथे कुत्र्यांना भुंकताना कधी मी ऐकले नाही, की त्यांची कळवंड कधी पाहिली नाही.

म्हातारी ताराबाई घरी एकटीच असे. घरातील सर्वजण कामानिमित्त मुंबईत असत. ती लंगडी घालत दवाखान्यात यायची. तिचा एक गुडघा खूप दुखायचा. ती आली की प्रथम दवाखान्याच्या चौकटीतच उभा राहून विचारी, "झीला पैसे नाय हत, एक तारखेक मनीआर्डर येवूची आसा. इली की तुचा जा काय बिल व्हतला ता देतलंय. काय समजलस."

क्षणभर थांबून माझं निरीक्षण करायची. मी हसलो की हळूच आत यायची.

"मेले गुडघे फार मोडून गेले असत. काय ता औषध दी बरं." म्हणत समोरील खुर्चीवर स्थानापन्न व्हायची.

"ताराई, एकीकडे मला मुलासमान मानतेस अन् पैशाचा विषय का बरं काढतेस." मी तिला रागवायचो. व्यवस्थित तपासणी करुन यथायोग्य औषधोपचार करायचो. मेडिकलमधून लिहून दिलेली औषधे आणायला तिच्याकडे पैसे नसायचे. मग तेही मी माझ्या खिशातून द्यायचो. तेव्हा... ताराबाईच्या डोळ्यातले दोन टपोरे मोती अलगद जमिनीवर टपकायचे. पुढचं सर्व बोलणं मग डोळ्यातून व्हायचं.

अशा कित्येक ताराबाई तिथे घराघरातून होत्या. त्यांचा चरितार्थ मुंबईवरुन चाकरमान्यांनी पाठविलेल्या मनीऑर्डर वरच चालायच. प्रत्येक घरातील कर्ती पुरुष मंडळी त्यांच्या बायाबापड्यांसह मुंबईत मुक्काम करुन असत. गावाकडे उत्पन्नाचे कोणतेही भक्कम साधन नसल्याने 'घाण्याचा बैल' होण्यासाठी ते सर्व मुंबईस जात. गणेशोत्सवाच्या दिवसांत मात्र आवर्जून गावी येत. पण इतरवेळी संपूर्ण वर्षभर या म्हाताऱ्या माणसांसमवेत सोबतीला कोणीच नसे. सर्व एकाकी पडत. 'आ' वासून अंगावर येणारी मोकळी घरे त्यांना खायला उठत. उतरत्या वयाची आधारकाठी भाकरीचा चंद्र शोधण्याच्या नादात दूरदेशी गेलेली असे. समोर संध्याछाया दाटलेल्या असताना इकडे हया पिकल्या पानांची कोण घालमेल होत असेल कोणास ठाऊक ? कोकणात येऊन कित्येक ताराबाईंचा मी 'झील' (मुलगा) झालो होतो. दिवस असेच सरत होते. कोकण मातीशी भावबंध जुळत होते. नाती नव्याने अंकुरत होती. माणुसकीची नाळ घट्ट विणली जात होती. अंमळ भेदाभेद सरुन तिथे आता उरली होती एकच जात....मानव जात ! मी मनापासून तिथे रमलो होतो. रुग्ण येत होते. बरे होत होते. उपचार असा नव्हताच. अंतरीचं देणं होतं, ते दिलं घेतलं जात होतं. मी तेथीलचं एक होऊन राहिलो होतो.

मला आठवते काही महिन्यानंतरची ती गोष्ट. एकदा एक रूग्ण माझ्याकडे आला होता. त्याच्या पायाला कसलीशी मोठी जखम झालेली. बरेच दिवस उपचार न केल्यामुळे तीत अक्षरश: किडे पडले होते. उग्र घाणेरडा दर्प येत होता. जखम पाहून किळस वाटू लागली. अशा जखमेला ड्रेसिंग करायचे या कल्पनेनेच मळमळायला सुरूवात झाली. खूप वाईटरित्या चिघळलेली जखम आणि उग्र,

घाणेरडा दर्प यामुळे जखमेला हात लावायची इच्छा होईना. शेवटी मनाचा हिय्या करून हाती चिमटा घेतला आणि कसेतरी जखमेतील वळवळणारे किडे एकेक करून बाहेर काढले. मलमपट्टी करून एकदाचा त्याला मोकळा केला अन् मीही झालो. त्या दिवशी रात्री जेवण उरकून मी अंथरूणावर लवंडलो. लवकर झोप येईना म्हणून शिळावलेलं दैनिक उगीचच पुन्हा-पुन्हा चाळत होतो. तितक्यात कोपऱ्यातील एका बातमीने माझे लक्ष वेधले. थोर समाजसेवक बाबा आमटेंना पुरस्कार मिळाल्याची ती बातमी होती. बातमी वाचली आणि मी विचारग्रस्त झालो. विचारांचे काहूर मनात दाटू लागले. हळूहळू अस्वस्थता वाढू लागली. वाढत्या बैचेनीसवे मन सैरावैरा धावू लागले. "अरे एवढा मोठा युगपुरुष, जो कधीही डॉक्टर नव्हता, वैद्यकीय क्षेत्रातील य:किंचितही ज्ञान त्यास नव्हते आणि तरीही त्याने एका संपूर्ण सडलेल्या, अंगभर किडे पडलेल्या कुष्टरोगी माणसाच्या जखमांना कसा बरे हात लावला असेल? आपल्या उघड्या हातांनी त्या जखमा कशा बरे धुतल्या असतील ? त्याला त्याची किळस वाटली नसेल का?" वैद्यकीय क्षेत्राशी दुरान्वयेही संबंध नसताना त्या मरणासन्न कुष्ठरोग्याच्या जखमांना त्यांनी मलमपट्टी केली. त्याच्यावर यथायोग्य उपचार केले. इतकेच नव्हे तर त्याला हातांवर उचलून स्वतःच्या घरी आणून ठेवले आणि पुढे तो जीवंत असेपर्यंत त्याची मनोभावे सेवाही केली.

माझी अस्वस्थता वाढली होती. झोप तर केव्हाचीच उडाली होती. कूस बदलूनही उपयोग होत नव्हता. मनात असंख्य विचार डोकावत होते. 'या जगात कितीतरी लोक जन्माला येतात अन् मरुनही जातात. जन्माला येताना सर्वत्र ती सारखीच निपजलेली असतात. पण त्यातील केवळ हाताच्या बोटावर मोजता येतील इतपतचं माणसं खऱ्या अर्थाने मोठी होतात, महान होतात. मानवी जीवनाच्या प्रयोजनाचा अन्वयार्थ सांगून जातात. आणि बाकीचा सारा कळप खुजाच राहतो. हे असं का होत असाव बरं? माझी अस्वस्थता वाढतच चालली. भले आता काहीही होवो, या बाबाला एकदा भेटायलाचं हवं. बाबा आमटे नावाचं अजब रसायन स्व: डोळ्यांनी पहायला, अनुभवायला हवचं. माझ्या मनानं उचल खाल्ली. आमटेंना भेटायचंच्, मी मनात ठाम निश्चय बांधला. मला आठवतयं, गावाकडे मराठी शाळेत शिकत असताना सातवीच्या मराठी विषयाच्या पाठ्यपुस्तकात 'आनंदवन' नावाचा धडा शिकावयांस होता. खरेतर तेव्हा पासून

माझ्या सुप्त मनात 'बाबांनी' घर केलं होतं. जपलेल्या स्मृतींना आज जणू मूर्त स्वरूपच लाभत होतं. मी शांतपणे झोपी गेलो.

दिवसांमागून दिवस सरत होते. माझा वैद्यकीय व्यवसाय उत्तम सुरु होताच. पण मनातील विचार गप्प बसू देत नव्हते. एके दिवशी एका अवचित क्षणी मी मनाचा ठाम निर्धार केला. निर्णय पक्का झाला अन्... चांगला चाललेला वैद्यकीय संसार मोडून मी आनंदवनाची वाट धरली. जरुरी साहित्य व कपडे यांनी बॅग भरली खरी, पण आनंदवनाला जायचं कसे ? वास्तविक तिथला पत्ताच माझ्याकडे नव्हता. ओळखीतल्या काही जणांकडे मी चौकशी केली. 'वर्धा-चंद्रपूर या बाजूला आनंदवन कोठेतरी आहे' एवढीच माहिती मिळाली. एवढ्याश्या जुजबी माहितीवर भाळून मी प्रवासास सुरुवात केली. रडत-रखडत, चौकशी करत-करत दोन दिवसांनी एकदाचा मी वर्धा स्टेशनवर येवून पोहचलो. स्टेशनमधून बाहेर पडलो. एका ठिकाणी आनंदवनाच्या पत्त्याविषयी विचारले तेव्हा 'वरोरा' हे ठिकाण समजले. वरोरा म्हणजे चंद्रपूर जिल्ह्यातील तालुक्याचे एक ठिकाण होते. वर्धा बसस्टँडवरुन पुन्हा वरोरा येथे जाणारी बस पकडली. दोन तासांनी वरोरा येथे पोहचलो. पुन्हा वरोरा स्टँडवरती चौकशी केली अन् 'आनंदवन' येथेच असल्याची खात्री करुन घेतली. वरोऱ्याच्या गावकुसाबाहेरील विस्तीर्ण अशा माळरानावर 'आनंदवन' वसलं होतं. मी पायीच गावकुसाबाहेरच्या आनंदवनाकडे निघालो. दुपार झाली होती....पंधरा मिनिटे चालल्यानंतर डाव्या हाताला एक लोखंडी कमान उभी असलेली दिसली. 'आनंदवन' नावाचा मोठ्ठा नामफलक पाहताक्षणीच अंगावर रोमांच खडे राहीले. माझ्या स्वप्नातलं गाव आता समोर उभ होतं.

एखादी हरवलेली मौल्यवान वस्तू बऱ्याच शोधाअंती सापडावी अन् मनास विलक्षण आनंद व्हावा, अंग शहारून जावे अगदी तसेच मला झाले होते. मनात उचंबळून येणाऱ्या भावनांना आवरीत मी गेटकडे वळलो. आतमध्ये प्रवेश केला आणि चालू लागलो. मनात उगाचच धाकधूक वाढलेली. कसं असेल आनंदवन, कशी असतील इथली माणसं अन् कसे दिसत असतील बाबा आमटे ? मनातला कल्लोळ काही केल्या शमत नव्हता. त्याच तंद्रीत मी चालत होतो. चालत-चालत बराचसा आनंदवनाच्या अंतर्भागात पोहोचलो होतो आणि....अचानक समोरील ते दृश्य पाहून मी हादरलोच. जागेवरच थबकलो. समोर पाहतो तर काय....जिकडे

पाहावे तिकडे हातापायांची बोटे झडलेली किळसवाणी भयंकर विद्रूप माणसंच माणसं ! एखाद्या भयपटातील दृश्य शोभावे असाच प्रसंग होता तो. मी जागच्या जागी स्तब्ध होऊन समोरील ती कुरूप माणसं पाहत होतो. कोणी आपल्या लंगड्या पण ठाम चालीने आपली वाट तुडवीत चाललेला. कोणी काठीचा आधार घेतलेला तर कोणी चाकाच्या खुर्चीलाच आपली सखी मानलेला. यातील बऱ्याच जणांच्या हातापायावर बँडेज बांधलेलं दिसत होतं. नानाविध प्रकारची माणसं समोर वावरत होती. कोणाच्या हातावर, कोणाच्या पायावर, कोणाच्या नाकावर तर कोणाच्या डोळ्यावर नियती रूसलेली दिसत होती. पण तरीही ते सर्वजण शांत, धीरगंभीर होते. आपापल्या कामात तल्लीन झाले होते. देहभान विसरून काम करीत होते. अत्यंत शिस्तबध्द, कसलाही गोंधळ नाही की गडबड नाही. सगळीकडे नीरव शांतता माखलेली. पुरातन वास्तुतल्या भग्नमूर्त्या सजीव होऊन सर्वत्र वावरत होत्या जणू ! स्वतःतील अपुरेपणाचं शल्य शांतपणे पचवून नियतीला जाब विचारण्यासाठी सज्ज झालेली ही सारी माणसं !

थोड्याच वेळात मी भानावर आलो आणि तसाच पुढे चालत राहिलो. काही अंतर पुढे गेलो तेव्हा डाव्या बाजूच्या एका इमारतीवर लिहिलेल्या दोन ओळींनी माझं लक्ष वेधलं गेलं. बाबा आमटेंच्या अत्यंत समर्पक ओळी तिथे रेखाटल्या होत्या-

"हाथ लगे निर्माण में
नही मारने, नही मांगने"

आता आनंदवनातील मुख्य कार्यालयात येवून मी पोहोचलो होतो. तिथे काही कर्मचारी कामात व्यस्त होते. नेमके काय विचारावे ? या विचारात होतो. मी नुसताच खाकरलो. त्यांच्यापैकी एकाचे लक्ष माझ्याकडे वळले. अनाहूतपणे प्रकटलेल्या पाहुण्याचे त्याला अजिबात कुतूहल वाटले नसावे. कारण असे अनुभव त्यांना सवयीचे असावेत. माझ्याकडे पाहत तो म्हणाला-

"कोण हवयं आपल्याला ?"

“बाबांना भेटण्यासाठी आलोय.”

“कोठून आलात आपण?”

"'कोकणातून"

"ठीक आहे, बसा."

समोरील एका खुर्चीवर मी बसलो. त्याने प्यायला पाणी दिले. अधिकची विचारपूसही केली. 'बाबांना भेटण्याअगोदर तुम्ही विकासभाऊंना म्हणजे डॉ. विकास आमटेंना भेटा' असे त्याने मला सुचविले. शेजारीच त्यांचे निवासस्थान आहे, असेही त्याने आवर्जून सांगितले. ऑफीसमधील दुसऱ्या एका इसमास जवळ बोलावून त्याने मला विकासभाऊंकडे घेऊन जाण्याविषयी फर्मान सोडले. मी माझी बॅग घेऊन त्याच्या मागोमाग चालू लागलो. मुख्य ऑफीसच्या पूर्वेलाच त्यांचे निवासस्थान होते. आनंदवनमध्ये प्रवेश केल्यापासून एक गोष्ट मला प्रकर्षाने जाणवत होती ती म्हणजे, तिथे सर्वत्र खूपच स्वच्छता आणि टापटीपपणा दिसत होता. जो अगदी नजरेत भरावा असाच होता. कोठेही घाण, अजागळपणा, अस्ताव्यस्तता यांचा नामोनिशाणही नव्हता. मी सगळीकडे भान हरपून पाहत होतो.

लवकरच आम्ही नजीकच्या विकासभाऊंच्या निवासस्थानी पोहोचलो. समोरील एका कोचावर तक्क्याला रेलून विकासभाऊ बसलेले होते. कसल्यातरी कामाची फाईल चाळत होते. चेहरा गंभीर पण शांत होता. समोर जाताच मी त्यांना नमस्कार केला. त्यांनी मान वर करून माझ्याकडे पाहिले अन् शेजारी कोचवर बसण्याचा इशारा केला. हातातील फाईल बाजूस ठेवली आणि अगदी आस्थेवाईकपणे माझी विचारपूस सुरु केली.

"कोठून आलात आपण ?"

"सांगलीजवळच्या औदुंबरहून" मी माझ्या मूळ गावाचे नांव सांगितले.

"येण्यापूर्वी आमच्याशी पत्रव्यवहार केला होता का?" विकासभाऊंच्या या प्रश्नाने मात्र मी हादरलोच.

"नाही" मी केविलवाण्या स्वरात म्हणालो.

विकासभाऊंच्या चेहऱ्यावर आता नाराजी स्पष्ट दिसू लागली. त्यांचेही बरोबरच होते म्हणा. कारण तिथे नेहमीच देश-विदेशातून अनेक पाहुणे येत असणार. त्यांची व्यवस्था करताना त्यांना नक्कीच प्रयास पडत असणार. त्यात

माझ्यासारख्या उपटसुंभ, आगंतुक पाहुण्याची व्यवस्था त्यांनी कशी करावी? पूर्वकल्पना असल्यास नियोजन व्यवस्थित करता येते. हे मला समजायला हवे होते. पण मी तरी काय करणार ? जिथे मला आनंदवनाचा पत्ताच माहित नव्हता तिथे पूर्वकल्पना मी कशी अन् कोणास देणार? आणि आजच्यासारखे मोबाईल, इंटरनेट या सुविधा त्या काळी सार्वत्रिक झाल्या नव्हत्या.

"सर मला आनंदवनाचा पत्ता बिलकुल माहित नव्हता. त्यामुळे पत्रव्यवहार करता नाही आला. माफी असावी. बाबांना भेटण्याच्या ओढीने पत्ता विचारीत, शोध घेत इथवर आलोय. खरेच मला पत्ता माहित नव्हता." मी नम्रपणे माझी अडचण त्यांना सांगीतली. तसे ते हसले. काहीच बोलले नाहीत. पण पुढच्याच क्षणी त्यांनी फोन करून एकास बोलाविले आणि माझी सर्व व्यवस्था यथायोग्य लावून दिली. माझी बॅगसुध्दा परस्पर खोलीत नेऊन ठेवण्याची व्यवस्था केली. जेवणाची व चहा नाष्ट्याचीही सोय होईल, काळजी करू नका असे आवर्जून सांगितले. आता कुठे माझ्या जीवात जीव आला. हायसे वाटले. मोठी अडचण दूर झाली होती. मी एक दीर्घ श्वास घेतला आणि बिनघोर, बिनधास्त झालो. खोलीत जाऊन थोडावेळ विश्रांती घेतली. ताजातवाना झालो. आता अगदी प्रसन्न वाटत होते. प्रवासाचा क्षीण कोठल्या कोठे पळाला होता. आता एकच ओढ मनास लागून राहिली होती.... बाबा आमटेंना भेटण्याची ! झटपट कपडे करून मी खोलीबाहेर पडलो. सावल्या आता लांबल्या होत्या. सूर्य मावळतीकडे झुकत होता. भर दुपारचे कडक व्रत सूर्याने केव्हाचेच सोडले होते !

मी ऑफीस समोरील चौकात आलो. समोर रस्त्यावर एक इसम उभा होता. त्याची देहयष्टी लक्ष वेधून घेणारी होती. उंचपुरा, दणकट बांधा, कसलेलं शरीर, वृध्द असूनही न झुकलेला पाठीचा कणा, ताठ मान, वर्षानुवर्षे डोक्यात साचलेल्या नानाविध अनुभवांची साक्ष देणारे डोईवरील विस्कटलेले सफेद केस, अंगात पांढऱ्याशुभ्र खादीचा दंडका आणि भरजार खादीचीच अर्धी चड्डी, कमरेला कसलेला कमरपट्टा आणि हाती लाकडी काठी धारण केलेला मोठा धिप्पाड माणूस स्वतःला रस्त्यात रोवल्यागत उभा होता. भगवान शंकराचा जणू अवतारच भासत होता. या विलक्षण इसमाने माझे लक्ष वेधून घेतले नसते तरच नवल ! मी चुंबकाप्रमाणे त्याच्याकडे ओढला गेलो. जवळ जावून पाहतो तो काय

आश्चर्य, स्वयं बाबा आमटेचं साक्षात समोर ! माझा तर विश्वासच बसेना. कारण यापूर्वी मी त्यांना केवळ वर्तमानपत्रातून कधीतरी पाहिलेलं.

नेहमीच्या सवयीप्रमाणे सायंकाळी फिरायला जायच्या तयारीत ते उभे होते. माझ्या सुदैवाने त्यावेळी तिथे विकासभाऊ त्यांच्याशी बोलत उभे होते. मी जवळ गेलो आणि बाबांना मनोभावे नमस्कार केला. विकासभाऊंनी बाबांशी माझी ओळख करून दिली. बाबांनी मला एकवार अपादमस्तक न्याहाळले. "चल, येतोस फिरायला?" औपचारीकता तिथेच संपली होती. मी आनंदाने होकार भरला. ज्याची प्रतिमा मी बालपणापासून मनात साठविली होती तोच माणूस आज समोर प्रत्यक्षात उभा होता. माझं स्वप्न आज सत्यात उतरलं होतं. प्रतिमेहून किती साधा अन् सोपा माणूस !

२६ डिसेंबर १९१४ रोजी वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथे बाबा आमटेंचा जन्म झाला होता. आई लक्ष्मीबाई व वडिल देवीदास यांची एकूण आठ अपत्ये, पैकी बाबा हे त्यांचे तिसरे अपत्य. दोघांच्या पोटी जन्मलेल्या आठ अपत्यात सहा मुली आणि दोन मुले होती. त्यापैकी तिसरे अपत्य जरा विलक्षण म्हणूनच जन्मास आलेलं असावं ! खरेतर बाबा आमटेंचे बाबा हे नाव खरे नाही. काळाच्या ओघात लोकांनी बहाल केलेलं ते नाव आहे. त्यांचे खरे नाव मुरलीधर देवीदास आमटे असे आहे. वास्तविक आमटे कुटुंबिय हे मुळचे चंद्रपूर जिल्ह्यातील गोरजा गावचे, जे वरोरा नजीक वसले आहे. पण, बाबांची कर्मभूमी ठरली ते ठिकाण म्हणजे आनंदवन, जे चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा या तालुक्याच्या गावी आहे. आमटे कुटुंबीय त्याकाळी अत्यंत सधन, गर्भश्रीमंत होते पण तितकेच ते कर्मठ ब्राम्हणी कुटुंब म्हणून ओळखले जायचे. बाबांचे वडिल ब्रिटीश आमदनीत एका प्रतिष्ठीत पदावर नोकरीस होते. त्याकाळी त्यांच्याकडे जवळपास ४५० एकर जमीन होती. शेतीवाडीतून अमाप मिळकत होत होती. धनधान्य, संपत्ती, पैसा-अडका, दागदागिने या गोष्टींची कसलीही कमतरता नव्हती. धनलक्ष्मीची मुक्त हस्ते जणू उधळणच होत होती. एकंदरीत आमटे कुटुंबिय जहागीरदार होतं, असं म्हंटलं तरी वावगं ठरणार नव्हतं. देव-देवतांच्या प्रतिमा पाहिल्या की, आपल्या सहजच लक्षात येईल सर्व देव-देवता या दागिन्यांनी मढलेल्या आहेत. केवळ एकच देवता अशी आहे की जिच्या शरीरावर कोणताही दागिना तुम्हांस दिसणार नाही, तो देव म्हणजे महादेव ! सर्वशक्तीमान असूनही निष्कांचन, वैरागी ! बाबा

आमटेंच्या बाबतही भविष्यात असेच होणार होते हे केवळ त्या नियतीलाच ठावूक असावे ? साधनाताई या बाबांच्या पत्नी पूर्वाश्रमीच्या इंदुताई घुले या नावाने परिचित होत्या. त्या केवळ बाबांच्या पत्नीच नव्हे तर सहयोगी, सखी आणि सचिवही होत्या. बाबांच्या कार्याचा अविभाज्य भाग होत्या. प्रत्येक कामात त्यांचा सिंहाचा वाटा होता. नागपूरच्या प्रतिष्ठीत महामहोपाध्याय कृष्णशात्री घुले यांच्या घराण्यात त्यांचा जन्म झालेला. समृध्द, सुखवस्तू घराणे पण कर्मठपणाला इथेही तसूभर कमी नव्हती ! बाबा आणि साधनाताई यांना दोन मुले. एक विकास आणि दुसरे प्रकाश. दोघेही पुढे एम.बी.बी.एस डॉक्टर झाले. डॉ. विकास यांचा विवाह डॉ. भारती यांच्याशी तर डॉ. प्रकाश यांचा विवाह डॉ. मंदाकिनी यांच्याशी झाला. या दोघीही एम.बी.बी.एस. डॉक्टर आणि या सर्वांची काही मुले पुढे डॉक्टर झाली आहेत. सर्व आमटे कुटुंबिय मानवतेच्या सेवेत समर्पित झाले आहे. समाजसेवेच्या क्षेत्रातील ही अत्यंत दुर्मिळ घटना आहे.

त्या सायंकाळी आनंदवनातील एका कमी वर्दळीच्या रस्त्यावरुन मी आणि बाबा निघालो होतो. बाबा आमटेंशी ही माझी पहिलीच भेट होती. आमचे पूर्वजन्मीचे काही नाते असावे असेचं वाटत होते. अनोळखीपणाचा लवलेश पुसट होत चालला होता. होय, आनंदवनातील ती रम्य सायंकाळ आजही मला नेमकी आठवते. गप्पा मारीत आम्ही चाललो होतो. बाबांना माझे कौतुक आणि थोडेसे आश्चर्यही वाटत होते. इतक्या दूरवर हा एकटाच केवळ आपल्याला भेटण्यासाठी इकडे आला आहे. त्यांनी आपुलकीने माझी आणखी विचारपूस चालवली होती. त्यांच्या मनात माझ्या विषयी अनेक प्रश्न उमटलेले असावेत. ते त्यांच्या चेहऱ्यावरुन मला स्पष्टपणे दिसत होते. त्यांनी मला सहजच विचारले, 'तुझे इकडे येण्याचे प्रयोजन काय ?' तेव्हा मी त्यांना कोकणातील ओपीडीत घडलेला प्रसंग आणि त्या अनुषंगाने मनात उमटलेले ते सारे विचार नेमकेपणाने सांगितले. सर्व ऐकल्यावर ते गालातल्या गालात हसत राहिले. नंतर काही वेळ आम्ही न बोलता असेच चालत होतो. आता बाबांचा चेहरा थोडा गंभीर आणि विचार मग्न झालेला दिसत होता. मीही गप्पच होतो. एका क्षणी त्यांची तंद्री भंग पावली आणि माझ्याकडे पाहत ते बोलु लागले, " हे बघ प्रमोद, आज समाजसेवा म्हणजे केवळ एक फॅशन झाली आहे. जो तो उठतो आणि समाजसेवा करायला धावतो. गळ्यात एखादा टाय अडकवून वर्तमान पत्रात

एकदाचा फोटो छापून आला की यांची समाजसेवा संपलेली असते. त्या विषयापुरता पडदा पडलेला असतो. उद्या पुन्हा नवीन ढोंग ! अशा लोकांनी हे क्षेत्र अगढ़ी बदनाम करुन सोडलेलं आहे. सेवेची ओढ आंतरिक असावी लागते. त्याची आराधना करावी लागते. कधी जीवनाची समीधा वाहावी लागते. हे असं उप उपरं ढोंग काही कामाचं नसतं. समाजसेवा ही खरेच खूप अवघड गोष्ट आहे. तू इकडे आलायसं ते ठीक आहे पण खऱ्या सेवेचा अर्थ तुला उमगणार नाही. इथे टिकून राहणं खूप अवघड आहे. सहा महिने इथे थांबून बघ म्हणजे कळेल तुला, समाजसेवा नेमकी काय गोष्ट असते ती. थांबशील काय सहा महिने ?"

"हो मी नक्की थांबेन." समोरुन अचानक आलेल्या प्रश्नावर मी ताडकन् बोलून गेलो. खरेतरं मी आनंदवनातील बाबा आमटे या व्यक्तीला केवळ भेटण्यासाठी म्हणून आलो होतो. इथे वास्तव्यासाठी नक्कीच नव्हे. पण.... आता अगदीच ध्यानीमनी नसताना भावनेच्या भरात पटकन होकार देऊन बसलो होतो. काही वेळाने मी भानावर आलो. पण त्याचा आता काय उपयोग होता? टाईमिंग तर चुकलेच होते. मग आता करायचे तरी काय? मी चिंतेत पडलो. विचारग्रस्त झालो. काही केल्या काहीच उमगेना. अनावधानाने बोलून गेलेल्या शब्दांचे उत्तरदायित्व तर स्वीकारावे लागणारच होते. त्या क्षणी मी मनाची वज्रमूठ बांधली. निर्धार पक्का केला. तेव्हा.... कोकणातील ती माझी ओपीडी ..... माझ्यावर अव्यक्त प्रेम करणारी ती देवभोळी प्रामाणिक माणसं.... तो रम्य सागरी किनारा.... ती माडांची भरगच्च हिरवाई.... हे सारं सारं काळीज कापीत माझ्या नजरेपल्याड झालं. घरदार, सगेसोयरे, मित्रमंडळी सारेचं बंध कसे तुटल्यागत झाले. क्षणात सगळा गोतावळा दूर-दूर जाताना दिसू लागला. मनाची घालमेल झाली. मन आक्रंदू लागलं. डोळ्याच्या कडा पाणावल्या. टपोरे मोती मातीत मिसळले. पण.... मी पुनश्च: सावरलो. मनाची समजूत घातली. मन शांत झाले. अन् मग पुढच्याच क्षणी राहिलो तसाच.... अगदी तसाच त्यांच्यातीलच एक होऊन गेलो. प्रत्येकाच्याच आयुष्यात असे काही निर्णायक क्षण येत असतात. आपण ठरवतो एक अन् घडतं वेगळचं ! आकलनापलिकडचं !

आजही मला चांगलाच आठवतोय आनंदवनातील माझा तो पहिला दिवस ! प्रवासाने मी अगदी थकलो होतो. दोन दिवसांच्या प्रवासाने दमछाक झाली होती. क्षीण आला होता. झोपेची नितांत गरज होती. सायंकाळचे सात वाजलेले.

आनंदवनातील रात्रीच्या भोजनाची ती वेळ होती. मेसच्या घंटीचा आवाज कानात निनादत होता आणि इकडेही माझ्या पोटात कावळ्यांनी चांगलाच सूर धरला होता. मला कडाडून भूक लागलेली. कधी एकदाचे ताटावर जावून बसतोय असे झालेले.

"मेस कोठे आहे ?" मी एकास विचारले. त्याने अंगुलीनिर्देश केलेल्या दिशेकडे मी झेपावलो. थोडे अंतर जाताच घंटीचा आवाज तीव्र होत असल्याचे जाणवू लागले. आनंदवनात काम करणारे सर्व कार्यकर्ते तसेच तिथे येणारे देश-विदेशातील पाहुणे अन् माझ्यासारखे अवचित गण यांच्यासाठी एक कायमस्वरूपी भोजनगृह तिथे होते. भोजन झाल्यानंतर सर्वांनी आपापली ताटे स्वच्छ धुऊन ठेवायची हा तिथला प्रघात होता. त्यात कोणासही सवलत नसे. मग तो मंत्री असो की विदेशी पाहुणा सर्वांना समान नियम असे. एकदा बडे प्रस्थ असणाऱ्या एका राजकीय व्यक्तीने असेच खरकटे ताट ठेवले होते. बाबांच्या निदर्शनास ही गोष्ट येताच त्यांनी त्याला परत बोलावून ताट धुवावयास भाग पाडले होते. सर्वांसाठी शिस्त म्हणजे शिस्त. कोणाचीही गय केली जात नसे. एकदा पंतप्रधान पदावर असताना इंदिराजी गांधींनी आनंदवनास भेट दिली होती. तेव्हा एका विषयाच्या अनुषंगाने विचार करताना बाबांनी इंदिरेलाही खडे बोल सुनावले होते.

मी हात स्वच्छ धुतले अन् भोजनगृहात गेलो. तिथे टेबल आणि खुर्च्या ओळीने मांडल्या होत्या. हॉल बराचसा विस्तृत अन् हवेशीर होता. आखीव-रेखीव पंगत तिथे बसलेली दिसत होती. सर्वत्र खूप स्वच्छता दिसत होती. टापटिपपणा नजरेत भरत होता. एकंदरीत आतील वातावरण अगदी प्रसन्न प्रफुल्लित करणारं होतं. मी समोरील एका खुर्चीचा ताबा घेतला. शर्टच्या बाह्या मागे घेऊन सरसावून बसलो. जेवण कधी एकदाचे येते, असे झाले होते आणि हो, काही क्षणातच जेवण आले. वाढपी लोक वाढण्यासाठी एकापाठोपाठ एक येवू लागले. प्रत्येक वाढप्याच्या हातात वेगळा पदार्थ दिसत होता. पोळी, भाजी, आमटी, भात, लोणचे असे सर्वजण ठरल्या क्रमाने येवू लागले. जेवण साधेचं पण सात्विक होते. पण.... वाढपी जस-जसे जवळ येवू लागले. तस-तसे अचानक मला मळमळू लागले. सर्वांगास घम फुटला. उलटी होते की काय असे वाटू लागले. कारण जेवण वाढणाऱ्या वाढपी लोकांची परिस्थिती थोडी वेगळी असल्याचे दिसत होते. काही वाढण्यांच्या हाताची बोटे थोटी झालेली, तर काहींच्या हाताचे केवळ पंजेच

शिल्लक होते. चौकोनी रेषाहीन पंजे ! काहींच्या अंगावर भाजलेल्या जखमांचे व्रण स्पष्ट दिसत होते. तर काहींची नाकेच जागेवर नव्हती. गरम अन्न ताटात वाढले जात होते. पण मी खुर्चीत थंडगार पडलो होतो. काही केल्या माझा हात जेवणाच्या ताटाकडे जाईना. अंगात त्राण नसल्यासारखे वाटत होते. दृष्टीक्षेपातील जिवंत शिल्पेच जणू समोर फिरत होती. ती काही केल्या नजरेआड होईनात. काय करावे सुचत नव्हते. नजर उचलून एकवार पंक्तीकडे पाहिले तर सर्वांनी शांतपणे जेवावयास सुरुवातही केलेली. मीच एकटा स्तब्ध होतो. खावे की न खावे या एकाच विवंचनेत अडकलो होतो. पोटात ढवळत होते. मग तसाच बसून राहिलो. समोरील एकजण माझ्याकडे विचित्र नजरेने पाहत असल्याचे माझ्या लक्षात आले. त्याच्या चेहऱ्यावर मला भले मोठे प्रश्नचिन्ह दिसत होते. मी ओशाळलो. लाज म्हणा किंवा नाईलाज, मनाचा दगड केला अन् एक छोटासा घास जड अंत:करणाने पोटात ढकलला. कसे तरी आणखी चार घास खाल्ले. ताटावरून उठलो अन् पळतच खोली गाठली. बाथरूममध्ये जावून भडाभड उलटी केली. सारी मळमळ ओकून टाकली मग थोडे बरे वाटले. फ्रेश होवून बाथरुमबाहेर आलो. हाश् - हूश्श् करत बेडवर आडवा झालो अन् तसाच अर्धपोटी उपाशी झोपलो.

सकाळी लवकर उठलो. फिरून आलो, आंघोळ आटोपून आनंदवनातील दैनंदिन गोष्टींचे निरीक्षण करीत फिरत राहिलो. यात बराच वेळ गेला. सकाळचे ११ वाजले होते. जेवणाची वेळ झालेली. कालचा प्रसंग विसरून मी पुन्हा भोजनगृहाकडे वळलो. आसनस्थ झालो पण.... पुन्हा तोच प्रकार, अगदी तसाच अनुभव. काही केल्या जेवण घशाखाली उतरेना. खरेतर भोजनालयात खूपच स्वच्छता राखली गेली होती. टापटिपपणा तर नजरेत भरावा असाच होता. स्वच्छतेचे, आरोग्याचे सर्व नियम अगदी काटेकोरपणे पाळले गेले होते. तरीही काही केल्या तेथील जेवण माझ्या गळी उतरेना. भूक तर खूपच लागली होती. रात्रीही उपाशी झोपलेलो. भूकेने जीव व्याकूळ झाला होता. अशक्तपणा जाणवत होता. आसपास कोठे एखादे हॉटेल वगैरे आहे का याचीही चाचपणी केली. परंतू दूरवर कोठेही ते दृष्टीक्षेपात आले नव्हते. मी पूरता निराश झालो होतो. नाईलाजास्तव दोन घास खावून उठलो. पुढील दोन दिवस असेच गेले. मी

दररोज सकाळ-सायंकाळ भोजनगृहात जायचो पण उपाशी-अर्धपाटी राहूनच परत यायचो.

तिसऱ्या दिवशी मी भोजनगृहात गेलो. पंगतीला नुकतीच सुरुवात झालेली होती. समोर पाहिले तर खुद बाबा आमटे एक पाय खुर्चीत ठेवून उभे राहूनच जेवण करीत होते. केळीच्या छोट्याश्या पानावर त्यांना वाढण्यात आलेलं होतं. उभे राहूनच त्यांचं उदरभरण चाललेलं असे. उभ्यानेच जेवण करण्याचा त्यांचा हा कसला अजब प्रकार होता? मला काहीच समजेना. पण नंतर पुढे केव्हातरी मला समजले की, एकतर उभे राहून किंवा झोपूनच त्यांना भोजन करावं लागतं. कारण मणक्याच्या प्रचंड त्रासामुळे खुर्चीवर बसताच येत नाही. पूर्वी मणक्याचे फार मोठे ऑपरेशन करण्यात आले होते. सदा सर्वकाळ या दोनच अवस्थेत त्यांना दिवसकंठावे लागत होते. आजपावेतो त्यांच्यावर एकूण २५ विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या होत्या. आज त्यांचे वय होते अवघे ८७ वर्षे !

"इतका महान किर्तीवंत माणूस पण तितक्याच साधेपणाने याच भोजनगृहात भोजन घेत आहे. रोज तेच ते एकसुरी अन्न खातो आहे. पचवतो आहे. त्याची अगदी लहानशीही तक्रार नाही की कसली नाराजी नाही. अखंड, अव्याहतपणे हे सुरु आहे. गेल्या ५० वर्षात स्वत:ची स्वतंत्र अशी चूल त्याने कधी पेटविलेली नाही. कधी जीभेसाठी म्हणून कोणत्या हॉटेलात गेला नाही. विचार करा, माणूस म्हटलं की कधीतरी त्याला काही आवडीचं, चांगलं-चुंगल खायची इच्छा ही होणारचं. पण वर्षानुवर्षे न कंटाळता हा 'बाबा' आपल्या सर्व इच्छा-आकांशा बाजूला ठेवून या सार्वजनिक भोजनगृहात जेवत आहे. कधीतरी त्याला स्वत:ला काही आवडीचं खाव अशी इच्छा झाली नसेल का? मला खरेच त्याचे आश्चर्य वाटत होते. त्यागाचं मुर्तीमंत उदाहरण याहून आणखी वेगळ काय असू शकेल ? खरचं बाबा महान होता !"

त्या दिवशीच्या पंगतीला माझ्या शेजारी फ्रान्सहून आलेले दोन परदेशी पाहुणे बसले होते. त्यांचीही जेवणाबाबत कसलीही तक्रार नव्हती. अगदी प्रसन्न वदनाने आणि चक्क भारतीय पध्दतीने बोटे चाखत, जेवणाचा पुरेपूर आस्वाद घेत दोघेही जेवत होते. त्यांचे जेवण पूर्ण झाले तेव्हा त्यांच्या ताटात अन्नाचा एक कणही मागे शिल्लक नव्हता. इतक्या मनोभावे ते जेवले होते. एकंदरीत

तिथे बसलेल्या प्रत्येकाला ते जेवण आवडत होते. तर मग मीच एकटा असा कोण लागून राहिलो होतो? ते माझे मलाच आता कळेनासे झाले होते. यःकिंचितही नाराजीचा सूर चेहऱ्यावर न उमटता प्रसन्न वदनाने ते सर्वजण जेवणाचा आनंद घेत होते. मग तिथे केवळ मलाचं का मळमळतं होतं? होय, कारण अगदी उघडच होतं. कधी-कधी बाबा म्हणायचेत्.... " महारोग हा केवळ शरीरालाच होतो असं नाही तर कधी कधी तो मनालाही बाधित करतो." काही माणसांच्याबाबत घृणा ही त्यांच्या मनातच वसलेली असते. माझ्याबाबतही काहीसे तसेच झाले होते. पुढच्याच क्षणी एका झटक्यात माझ्या मनातील सगळी मळमळ आणि किल्मिषं नष्ट झाली. सारे कुविचार झटकून मी जागा झालो आणि पोटभर जेवलो. आता माझे मन तृप्त-शांत-निर्विकार झाले होते. त्यानंतर पुढे वर्षभर मी सोमनाथ प्रकल्पात असेपर्यंतच्या काळात पूर्णत: बरा झालेला एक कुष्ठरोगी बांधव नेहमी पंगतीला माझ्या शेजारी बसून जेवायचा. पाणी पिण्यासाठी दोघांत एकच तांब्या-भांडे असायचे. पण बोटे झडलेल्या त्याची मला कधीही किळस, घृणा वाटली नाही. आजही तो माझा चांगला मित्र आहे.

आनंदवनातील भोजनालयात त्यादिवशी माझ्या शेजारी जेवणाऱ्या त्या दोन परदेशी पाहुण्यांविषयी एक गोष्ट मला आवर्जुन सांगावयास हवी. आनंदवन पाहण्यासाठी म्हणून ते जोडपे इथे आले होते. आज पंगतीला माझ्या शेजारी बसले होते. नेहमी काटे-चमच्यांनी जेवणारे हे युरोपियन लोक या ठिकाणी मात्र चक्क हाताने जेवत होते ! तेही अगदी सराईतपणे बोटे चाखत ! तेल-मीठ-मसाले आणि तिखटाचा सढळ हस्ते वापर केलेले भारतीय जेवण सवय नसतानाही ते व्यवस्थितपणे खात होते. 'अन्न हे पुर्णब्रम्ह' जाणून शेवटी अन्नाचा एक कणही त्यांनी शिल्लक ठेवला नव्हता. संपूर्ण ताट व्यवस्थित साफसूफ केलं होतं ! त्यावेळी त्यांच्या त्या वर्तणूकीवरून मला जाणवलं की, आम्ही भारतीय लोक खूप नाटकं करतो. उणं-दुणं काढतो. परिस्थिती थोडीशी जरी प्रतिकुल असली तरी लगेच नाराज होतो. नाकदुऱ्या काढू लागतो. नावे ठेवू लागतो. टिका-टिप्पणी करतो. कमतरतेचाच वेध घेऊ लागतो. अर्धा ग्लास भरलेला नाही, हेच पाहत राहतो. 'तडजोड' हा शब्द आम्हा भारतीयांच्या रक्तातचं नसावा जणू ! याउलट युरोपियन लोक जगाच्या कानाकोपऱ्यात कोठेही जाऊ देत ते तेथील परिस्थितीशी पटकन् समरस होतील. प्रसंगी तडजोड स्वीकारतील. आहार-विहार, आमची

संस्कृती यांच्याशी जुळवून घेतील. पण कोणत्याही परिस्थितीत यशस्वी होऊनच दाखवतील. एकीकडे आम्ही त्यांच्या भोगवादी, चंगळवादी संस्कृतीला नावे ठेवणार, कमी कपड्यातील बायाबापड्यांना चर्चेचा विषय बनविणार आणि दुसरीकडे मात्र आम्ही रस्त्यावर वाट्टेल तिथे थुंकणार, लघवी करणार, कचरा फेकणार, अवास्तव कसेही वागणार, खोटे बोलणार, नियतीच्या गप्पा मारणार... ही आमची संस्कृती ! आणि... म्हणे हिंदु संस्कृती जगात महान ! त्यांच्यातील चांगल्या गुणांचे, माणुसकीच्या वर्तणुकीचे, चांगल्या सार्वजनिक संस्कारांचे आम्हांस वावडे असते. बाकी काहीही असो. त्यादिवशीच्या भोजनालयातील त्या प्रसंगाने मला बरेच काही शिकविले. जगातील कोणत्याही ठिकाणचे अन्न आपल्याला पचविता आले पाहिजे. हा आत्मविश्वास त्यानिमित्ताने माझ्या ठायी निर्माण झाला. हे मात्र अगदी खरे !

आनंदवनात मी आता चांगलाच रूळलो होतो. तेथील दैनंदिन व्यवहार हळूहळू का होईना माझ्या पचनी पडत होते. दररोज सकाळी लवकर उठून आनंदवन परिसर पाहण्यासाठी मी बाहेर पडायचो. माझ्यासाठी सर्वस्वी नवीन असणारा तो परिसर फिरताना मनात अनेक प्रकारच्या भावना दाटून येत. एका ओसाड माळरानावर आनंदाचं वनचं जणू फुलविलं होतं. माणसाच्या मनातला स्वाभिमान एकदा का जागा झाला की तो कोठच्या कोठे पोहोचू शकतो, याचं ते मूर्तीमंत उदाहरण होतं. समाज आणि आप्तेष्टांनी बहिष्कृत केलेल्या, टाकून दिलेल्या, हातापायांची बोटे झडलेल्या विद्रूप लोकांनी एकत्र येऊन इथे श्रमाचा अक्षरशः मळा फुलविला होता !

सन १९५१ साली आनंदवन प्रकल्पाची स्थापना करण्यात आलेली होती. आचार्य विनोबा भावेंच्या शुभहस्ते उद्घाटन करण्यात आलं होतं. त्याकाळी लावण्यात आलेल्या त्या इवल्याशा रोपट्याचं आज एका प्रचंड वटवृक्षात रूपांतर झालेलं आहे. हे तेव्हा कोणाच्या ध्यानीमनीही नसेल. जवळपास चारशे एकर जमीनीवर हा टोलेजंग वटवृक्ष सलगपणे पहुडलाय ! पाच हजार कुष्ठरोग्यांचं एक महाकाय गावचं या ठिकाणी वसलं आहे. खरेतर प्रत्यक्ष डोळ्यांनीच हे सर्व पहायला हवं, म्हणजे खात्री पटल्यावाचून राहात नाही. आपल्या समाजाचा घटक असणाऱ्या कुष्ठरोगी बांधवांना आपल्याच समाजापासून वेगळे होऊन दूर कोठेतरी वसाहत करून राहावे लागणे किंवा मजबूरीने तसे राहण्यास भाग पडणे ही गोष्ट

कोणत्याही प्रगत मानवी समूहास भूषणावह नाही. वास्तविक त्यांनी इतरत्र कोठेही जाण्यापेक्षा याच समाजात आपल्या लोकांसमवेत राहावयास हवे. तशी व्यवस्था आणि समाजधारणा आपल्याकडे असावयास हवी होती. परंतु दुर्दैवाने वस्तुस्थिती तशी नाही आहे. लोकांनी स्वत:हून पुढे यायला हवे होते. कुष्ठरोग आणि कुष्ठरोगी यांना समजून घ्यायला हवे होते. या आजारांमागील शास्त्रीय सत्य जाणून घ्यायचा किमान प्रयत्न तरी करावयास हवा होता. त्यांच्या व्यथा-वेदना समजावून घ्यायला हव्या होत्या. प्रेमाने, आपुलकीने त्यांची विचारपूस करावयास हवी होती. पण तसे काही झाले नाही. उलट त्यांना प्रचंड शारिरीक, मानसिक त्रास दिला गेला. कुष्ठरोगी हा टिंगल-टवाळीचा विषय बनविला गेला. एवढेच नव्हे तर त्यांना समाजाच्या सर्वच स्तरातून हद्दपार करण्यात धन्यता मानली गेली. विचार करा, या लोकांच्या मनाची काय अवस्था झाली असेल ? माझा कोणताही दोष नसताना केवळ एका विशिष्ट प्रकारच्या रोगामुळे आपल्याच लोकांनी मला नाकारावे, यासारखी वेदनादायक गोष्ट आणखी कोणती असू शकेल ?

खरेतरं कोणताही आजार कोणास मागून मिळत नसतो. शेवटी कुष्टरोगी सुध्दा आपल्यासारखी माणसेच आहेत. त्यांनाही मन-भावना आहेत, याचे भान ठेवावयास हवे. त्यांना जगण्याची संधी द्यायला हवी. आम्ही महारोग समजून घ्यायला हवा. त्याचबरोबर प्रथमतः हा महारोग आम्ही आमच्या मनातूनच हद्दपार करावयास हवा. हे जोपर्यंत घडत नाही तोपर्यंत आनंदवन नावाचा प्रकल्प एक कलंकित डाग म्हणून सर्व समाजाच्या माथी बिलगून राहील. कोणत्याही सुसंस्कृत, संवेदनशील समाजास तो डाग खचितच भूषणावह असणार नाही.

आनंदवन येथे एक सुसज्ज असे रूग्णालयही आहे. याठिकाणी प्रकल्पातील सर्व कुष्ठरोग्यांवर यथायोग्य उपचार केले जातात. यातीलच काही कुष्ठरोग्यांना प्राथमिक उपचारांचे प्रशिक्षण देऊन आरोग्यदूत म्हणून प्रशिक्षीत करण्यात आलेले आहे. हॉस्पिटलमध्ये येणाऱ्या आपल्याच कुष्ठबांधवांच्या मलमपट्ट्या बांधणे, औषधे देणे, बऱ्या न होणाऱ्या जखमांची काळजी कशी घ्यायची हे त्यांना शिकविणे ही सर्व कामे आरोग्यदूत चोखपणे करीत असतात. दररोज स्वच्छ मलमपट्टी व औषधोपचार केल्यामुळे जखमांचा सकृतदर्शनी किळसवाणा प्रकार

येथे पहायला मिळत नाही. कुष्ठरोग्यांच्या जखमा वर्षानुवर्षे भरून येत नाहीत. २०-३० वर्षापासूनच्या जखमा अंगावर बाळगणारे कित्येक लोकही मी इथे पाहिले. पण कोठेही जखमांतून वाहणारा पू किंवा रक्तस्त्राव, दुर्गंधी असा प्रकार मला अजिबात दिसला नाही. बाबा आमटेंनी स्वतःच सांगितलेली एक गोष्ट मला आजही आठवतेय. अगदी सुरूवातीच्या काळात आनंदवनातील कुष्ठरोग्यांना तपासायला, औषधोपचार करायला बाहेरील कोणीही डॉक्टर यायचा नाही. कारण तेव्हा समाजामध्ये एकूणच महारोगा विषयी प्रचंड भीतीचे वातावरण होतं. पण पुढे असेच एक डॉक्टर महाशय खूप विनंत्या-आर्जवे केल्यानंतर आनंदवनात यायला तयार झाले. ते तपासणीला यायचे पण पेशंटला अजिबात स्पर्श सुध्दा करायचे नाहीत. दूरूनच औषधे द्यायचे. घरी गेल्यावर ते स्वतः आंघोळ तर करायचेच पण ज्या सायकलीवरून यायचे त्या सायकलीला सुद्धा साबण लावून आंघोळ घालीत असतं. बाबांना त्यांचे असे वर्तन पुढे समजले तेव्हा ते खिन्न झाले. त्या डॉक्टरविषयी त्यांचे मन बदलले. कुष्ठरोग्यांच्या शरीराला आजार झाला होता, पण इकडे डॉक्टरांच्या मनाला त्याची बाधा झाली होती. ज्याच्या मनालाच कुष्ठरोग जडलाय तो इतरांची कसली सेवा करणार ? कुष्ठरोग काय केवळ शरीरालाच होतो ? कधी-कधी मनालाही त्याची बाधा होते. डॉक्टर एक प्रतिनिधिक उदाहरण होते. बाबांनी डॉक्टरांना लवकरच नारळ दिला.

कुष्ठरोगी बांधवांच्या मुला-मुलींना पुढील शिक्षण घेता यावे यासाठी येथे कला-वाणिज्य-विज्ञान महाविद्यालय उभारण्यात आले आहे. इतकेच नाही तर एक कृषीमहाविद्यालयही येथे सुरू करण्यात आलेले आहे. केवळ आनंदवन प्रकल्पातीलच नव्हे तर पंचक्रोशीतील मुलेही शिक्षणासाठी येथे येत असतात. मी आनंदवनमध्ये होतो त्याकाळी म्हणजे १९९९-२००० या वर्षात तिथे जवळपास २५०० विद्यार्थी शिक्षण घेत होते. अंध व मुकबधीर मुलांसाठी विशेष शाळाही येथे चालविली जाते. साधारण २२५ पेक्षाही अधिक विशेष विद्यार्थी तिथे स्वतःतील सुप्त सृजनशीलतेचा शोध घेत आहेत. विकास भाऊंनी यातील काही मुलांचे सुप्तगुण हेरून अंध-मुक-कर्णबधीर मुलांचा एक ऑर्केस्ट्रा तयार केला आहे. महाराष्ट्रात विविध ठिकाणी या आर्केस्ट्राचे संगीत रजनीचे कार्यक्रम करून आनंदवनासाठी मदतनिधी गोळा केला जातो. आजपावेतो महाराष्ट्रात विविध ठिकाणी बरेचसे कार्यक्रम झालेले आहेत. ही गोष्ट चमत्कारापेक्षा कमी नाही.

अनाथ-निराधार मुलांसाठी एक 'गोकुळधाम' ही येथे स्थापण्यात आले आहे. प्रकल्पबाहेरील अनाथ, गोरगरीब मुलांची सर्व प्रकारची सोय इथे करण्यात येते. अपंग लोकांसाठीही येथे सोय करण्यात आली आहे. प्रकल्पातील तसेच प्रकल्पाबाहेर जे प्रौढ अपंग आहेत त्यांच्यासाठी व्यवसाय प्रशिक्षण केंद्र याठिकाणी चालविण्यात येते. जेणेकरून ते शिक्षण घेऊन परत आपल्या मूळ गावी जावेत आणि तिथेच व्यवसाय निर्माण करून स्वतःच्या पायावर उभे राहावेत. अपंग असले तरी स्व-पायावर उभे राहून स्वाभिमानाने त्यांना जगता आले पाहिजे, भिकेच्या दयेवर `जगण्याची पाळी त्यांच्यावर येवू नये म्हणून हा सारा खटाटोप करण्यात आला आहे. बाबांनी 'संधीनिकेतन' असे अत्यंत समर्पक नाव या प्रकल्पास बहाल केलं आहे ! तसेच ग्रामीण भागातील अशिक्षीत युवकांना प्रशिक्षण देण्यासाठी युवाग्रामची स्थापना करण्यात आली आहे. असे केंद्र स्थापन करण्यापाठीमागे बाबांच्या मनात भविष्यातील दूरदृष्टीचा मोठा विचार होता. युवकांच्या हाताला कामचं नाही मिळाले तर ती व्यसनाकडे वळण्याची शक्यता दाट असते. तसे झाले की युवक आणि त्यांचे सर्व कुटुंबीय यांची वाताहात होण्यास फारसा वेळ लागत नाही. यासाठीच बाबांनी युवकांच्या हातास काम मिळावे या भावनेने 'युवाग्राम' प्रकल्प स्थापीला होता. युवकांच्या हातास काम मिळाले तर ती व्यसनाकडे वळणार नाहीत. व्यसनाधीनता कमी झाली तर त्या युवकांबरोबरच त्यांचे कुटुंबीय, समाज यांचा विनाश टळेल आणि पर्यायाने राष्ट्राची उन्नती होईल, असा उदात्त विचार बाबांनी केला होता. हळूहळू का होईना सर्वांचाच विकास होत जाईल अशी त्यांची भावना होती. युवाक्रांती दलाचे संस्थापक डॉ. कुमार सप्तर्षी हे सुद्धा एकेकाळी बाबासोबत या प्रकल्पाच्या यशस्वीतेसाठी काम करीत होते. पण या योजनेस म्हणावे तसे यश लाभले नाही हे दुर्दैवच ! व्यसनामुळे समाजाची झालेली अधोगती आजकाल आपण पाहतो आहोतच.

आनंदवनात याशिवाय हातमाग, यंत्रमाग, सुतारकाम, लोहारकाम, चर्मालय, दुग्धशाळा, कुक्कुटपालन असे अनेकविध प्रकारचे व्यवसाय चालविले जातात. सार्वजनिक कार्यक्रमामध्ये वावरत असताना अभिनेता नाना पाटेकरच्या अंगावर दिसणारे कपडे याच आनंदवनातील कुष्ठबांधवानी विणलेले असतात.दैनंदिन जीवनात जगण्यासाठी म्हणून ज्या-ज्या गोष्टींची गरज माणसाला असते त्या-

त्या सर्व गोष्टी इथेच तयार केल्या जातात. केवळ साखर आणि चहा पावडर बाहेरून मागविण्यात येते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

आनंदवनाच्या एकूण क्षेत्रफळापैकी १२० एकर जमीन शेतीसाठी वापरण्यात आली आहे. इथे आधुनिक पद्धतीने शेती केली जाते. शेतीसाठी लागणारे पाणी पावसाळ्यात आनंदवनातील छोट्या कृत्रिम तलावातून साठविले जाते आणि पुढे वर्षभर ते उपयोगात आणले जाते. त्यासाठी पाणी वापराच्या सुधारीत पद्धतींचा अवलंब केला जातो. जवळपास सर्वप्रकारची धान्ये आणि भाजीपाला येथे पिकविला जातो. यातून आनंदवन आणि इतर प्रकल्पांची गरज भागविली जाते. पंचवीस वेगवेगळ्या वृक्षांची लागवड व त्यासंबंधीचे संशोधनही इथे चालते. शिवाय मोठ्या प्रमाणावर फळशेतीही केली जाते. केळी, संत्री, आंबा, चिक्कू, पपई इतकेच नव्हे तर चक्क द्राक्ष बागही इथे लावण्यात आली आहे. सर्व फळांचे भरघोस उत्पन्न घेतले जाते. संपूर्ण प्रकल्पाची गरज भागून शिल्लक राहिलेला भाजीपाला, फळे, दूध इत्यादी बाजारात विक्रीसाठी पाठविले जाते. विशेष म्हणजे येथे मत्स्यशेतीही केली जाते. लिलाव करून मासे विक्रीसाठी मार्केटमध्ये पाठविले जातात. □□□□□□□□□□□□ □□□□□□□□□□□□□ □□□□□ □□ □□□□□□□□□ □□□□□□□ □□□□□□ □□□□□□□ □□□□□ □□□□□ □□□ □□□□□□□ □□□□□□ □□□□ □□□. □□□□□□□□□ □□□□ □□ □□□□□□□□□□□□□ □□□□ □□□□□□□□ □□□□□ □□□□. □□ □□□ □□□□□ □□□ □□□□□ □□□. □□ □□□□□□□□□□□ □□□□□□□□□ □□□□□□□ मानसिकता बरीचशी बदलेली आहे. मी जेव्हा आनंदवनाबाहेर फिरलो तेव्हा तेथील बऱ्याचशा हॉटेलमधून आनंदवनातील दूधाचा रतीब लावल्याचे आढळून आले. अशा बदलत्या वातावरणाची अनेक उदाहरणे देता येतील. प्रकल्पातील कुष्ठबांधव बाहेरील लोकांत आता सहजपणे वावरतात. लोकांकडूनही त्यांना सन्मानाची वागणूक मिळत असते. अनेक गोष्टींची परस्पर देवाण-घेवाण होत असते. स्थानिक लोकांच्या मनात आनंदवनातील कुष्ठरोगी बांधवांप्रती असणारा पूर्वग्रह दूषित दृष्टीकोन आणि पूर्वापार अढी कमी झाल्यामुळे कुष्ठरोगी बांधवांच्या मनातं आता नवीन आत्मविश्वास जागविला गेला आहे. हेच बाबा आमटेंच्या कार्याचं मोठ यश आहे !

खरेतरं या सर्व गोष्टी प्रत्यक्षात या ठिकाणी येवूनच पहायला हव्यात. ज्यांचे मन संवेदनशील आहे तो आतून हेलावून गेल्याशिवाय राहत नाही हे

नक्कीच ! मी तर मुद्दामहून असं म्हणेन की, जे लोक देवदर्शनासाठी विविध तीर्थक्षेत्रांना भेटी देत असतात किंवा दरवर्षी न चुकता पंढरीची वारी करीत असतात त्यांनी किमान एकदा तरी आनंदवनाची वारी करावी. खरा देव आणि धर्म तुम्हांस येथेच भेटेल. प्रत्येक पालकांनी आपल्या मुलांना घेऊन किमान एकदा तरी आनंदवन, सोमनाथ, हेमकलसा हे प्रकल्प आवर्जून पाहायलाच हवेत. मानवी जीवनातील दुःख, वेदना काय असतात याची प्रचिती मुलांना लहानपणीच आली की भविष्यातील रस्ता ते कधीच चुकणार नाहीत. त्यांच्या मोठेपणी आयुष्यात येणाऱ्या संकटांना ते सहजपणे सामोरे जातील. यायोगे तशी क्षमता त्यांच्या ठायी निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही, हे मी या ठिकाणी अगदी खात्रीपूर्वक सांगू इच्छितो.

आनंदवनात मी आता छानसा रूळलो होतो. समुद्रास ओहोटी लागावी आणि तो शांत व्हावा तसे माझे अस्वस्थ मन आता शांत झाले होते. मनातील सर्व चिंता, घोर, अस्वस्थ करणारे विचार ही सारी किल्मीषं नष्ट होऊन मन अगदी स्वच्छ, निर्मळ झाले होते. खूप प्रसन्न वाटत होते. दिवस छान सरत होते. एके दिवशी सोमनाथ प्रकल्पातील एक प्रमुख कार्यकर्ते श्री. हरीभाऊ बढे येथे आलेले. त्यांच्याशी ओळख झाली. काही कामानिमित्त ते इकडे आले होते. चार दिवस थांबून परतणार होते. या चार दिवसात आमची चांगली मैत्री जमली. ते स्वतः एक कुष्ठरोगी होते. खूप वर्षांपासून सोमनाथमध्ये राहत होते. सोमनाथ प्रकल्पाविषयी बरीचशी माहिती मला त्यांच्याकडून समजली. ती ऐकून माझ्या मनात सोमनाथ प्रकल्प पाहण्याची इच्छा खूप प्रबळ झाली. असेच एक दिवस आम्ही गप्पा मारत बसलो होतो. गप्पांच्या ओघात हरीभाऊ सहजपणे मला म्हणाले, "आमच्या सोमनाथ प्रकल्पात बऱ्याच दिवसांपासून कोणी डॉक्टर उपलब्ध नाही. आम्हाला डॉक्टरांची फार गरज आहे. ते नसल्यामुळे आमची खूपच गैरसोय होते आहे. तेव्हा तुम्हीच येता का तिकडे?”

मी थोडा विचारात पडलो. काय उत्तर द्यावे सुचेनासे झाले. खरेतर मलाही सोमनाथ प्रकल्प पाहण्याची तीव्र इच्छा होतीच. अखेर त्या ओढीने मी होकार भरला.

"ठीक आहे हरीभाऊ, मी जरूर येईन".

पण लगेचच लक्षात आले किमान विकासभाऊंना विचारावयास तरी हवे होते. म्हणून मग मीच हरीभाऊंना म्हणालो, "माझी काही हरकत नाही हरीभाऊ पण, तुम्ही अगोदर विकासभाऊंशी बोलून घ्या. त्यांची परवानगी असेल तर मला काहीच अडचण असणार नाही. "

"हो मी बोलेन विकासभाऊंशी, तुम्ही निश्चिंत असा." हरीभाऊ तात्काळ उत्तरले.

रात्रीचे जेवण आटोपून मी अंथरूणावर पडलो होतो. बराच वेळ झाला तरी झोप येईना. डोळे सताड उघडेच. 'कदाचित उद्या आपल्याला सोमनाथला जावे लागेल.' मनास या गोष्टीची हुरहुर लागून राहिली. 'कोकणातून सुरू झालेला आपला हा प्रवास आपल्याला आणखी कोठे घेऊन जाणार आहे, कोण जाणे?' भविष्याच्या गर्द काळोखात काय दडले आहे याचा काहीच थांगपत्ता लागत नव्हता. खोलीभर दाटलेल्या अंधारात माझे मन चाचपडू लागले. काही केल्या झोपच येईना. झोपेसाठी म्हणून कूस बदलली आणि अचानक.... गावांहून आलेलं ते मामेभावाचं पत्र आठवलं. कालच आनंदवनच्या पत्त्यावर विकास नावाच्या मामेभावाने पत्र धाडलं होतं. पत्रातून तो माझ्यावर खूपच रागावला होता. कमालीचा नाराज झाला होता.

प्रिय प्रमोद,

कोकणात उत्तम चाललेला तुझा दवाखाना अचानकपणे बंद करून तू आनंदवनात निघून गेलास. खूप वाईट वाटले. अरे, किमान मला तरी त्याची पूर्वकल्पना द्यायला हवी होतीस. कोणास काहीच कल्पना न देता गेल्यामुळे सर्वांना मानसिक धक्का बसला आहे. आई खूप रडत आहे. सदैव तुझीच आठवण काढत आहे. तू कोठल्या तरी बाबाच्या आश्रमात जावून सन्याशी झाला आहेस. याचा तिला प्रचंड मानसिक धक्का बसला आहे. त्याला एकदा इकडे परत घेऊन या. आपण त्याचे लग्न लावून देवू, असे सारखे म्हणत आहे. तिला समजावणे कठिण होवून बसले आहे. 'आपला पोरगा वाया गेला' असेच तीला वाटत आहे. एकतर तुझे लग्नाचे वय आणि त्यात तू न सांगता निघून गेल्यामुळे इकडील सर्व नातेवाईक आणि मित्रमंडळीत तुझ्याबद्दल प्रचंड गैरसमज पसरला आहे. 'पोराच्या डोक्यावर परिणाम झाल्यामुळे पोरगं दूरवरच्या एका बाबाच्या आश्रमात जावून राहिलं आहे. ब्रम्हचारी राहण्याची शपथ घेतली आहे म्हणे.' असेच सर्वजण

तुझ्याबद्दल बोलत आहेत. याचा मानसिक धक्का तुझ्या आईस बसला आहे. ती खूपच चिंताग्रस्त आहे.

मलाही असाच धक्का बसला आहे. परंतू तू असे वेगळे काही करशील असे वाटत नाही. तुझ्याबद्दल मला खात्री आहे. तू कोणाचेही ऐकणार नाहीस हेही मला चांगलेच माहित आहे. तुझ्या ध्यास, ध्येय जगापेक्षा थोडे वेगळे असेलही, मी तुला त्यापासून परावृत्त करू इच्छित नाही. परंतू तू थोडा आमचाही विचार करावास, असे मला वाटते. तू ताबडतोब गावी निघून ये. प्रथम लग्न कर आणि त्यानंतर तुला जे काही करायचे असेल ते कर किंवा कोठेही जा. आम्ही अडविणार नाही. सध्या सर्वजण तुझ्याच काळजीत आहोत. ऐकशील ना माझं ? वाट पाहत आहे.

कळावे,

तुझा मामेभाऊ,

विकास.

पत्र वाचून मला हसावे की रडावे तेच कळेना. मी मनाशीच हसलो. माझ्या निश्चयावर मी ठाम होतो.

सकाळी उगवत्या प्रहरी हरीभाऊ मला उठवायलाच आले. रात्री पुरेशी झोप न झाल्याने मी अजूनही झोपेतच होतो. डोकं जड झालेलं. दारावरची थाप ऐकून कसेतरी उठलो आणि दार उघडलं. समोर हरीभाऊ प्रसन्न वदनाने उभे होते.

"डॉक्टर, चला आवरा, आपल्याला सोमनाथला जायचंय."

"पण...विकासभाऊंशी..." मी अजूनही अर्धवट झोपेतच होतो.

"हो, मी रात्रीच त्यांच्याशी बोललोय," हरीभाऊ अजीजीने म्हणाले.

"ठीक आहे. मी लगेचच आवरतो." म्हणून दार लोटले.

आंघोळ वगैरे आटोपून मी माझी बॅग भरली आणि सोमनाथला जायला तयार झालो. कारणपरत्वे आनंदवनपर्यंतचा हा प्रवास पुढे सोमनाथपर्यंत लांबणार आहे, याची कल्पना मी कधी स्वप्नातही केली नव्हती. खरेचं, आपण ठरवतो एक अन् घडतं ते वेगळचं ! सोमनाथला जावे की नको? माझी द्विधा मनःस्थिती झालेली खरी पण, अस्वस्थ मनाच्या लाटांवर स्वार होवून मी सोमनाथला केव्हा येऊन

धडकलो ते माझे मलाच कळले नाही. शेवटी एका डॉक्टरची त्याठिकाणी भासणारी उणीव माझ्या रूपाने भरून निघतेय, याचेच मोठे मानसिक समाधान त्यादिवशी मला होतं.

१९६७ साली सोमनाथ प्रकल्पाची स्थापना करण्यात आली होती. चंद्रपूर जिल्ह्यात 'मूल' नावाचा एक तालुका आहे. तेथून सुमारे दहा किलोमीटर अंतरावर डोंगराळ परिसरात हा प्रकल्प विराजमान आहे. प्रकल्पाच्या जवळील गर्द झाडीत 'श्री. सोमनाथाचे' प्राचीन देवालय वसले आहे. त्याच्या नावावरूनच या प्रकल्पास बाबांनी 'सोमनाथ प्रकल्प' असे नाव दिले आहे. शहरी आणि मानवी वस्तीपासून दूर डोंगराळ भागात हा प्रकल्प वसला आहे. येथे जाण्यासाठी वाहनाची सोय पूर्वी नव्हती. मूलहून पुढे पायीच चालत जावे लागे. आता मात्र तिथे चांगला रस्ता तयार करण्यात आला असून प्रकल्पाची वाहनेही उपलब्ध आहेत. तब्बल १३०० एकर क्षेत्रावर हा अवाढव्य प्रकल्प आहे. हा प्रकल्प सुरू करण्याचे महत्वाचे कारण म्हणजे, त्याकाळी देशाच्या विविध भागातून कुष्ठरोगी आनंदवन येथे वास्तव्यास येत होते. दिवसेंदिवस त्यांची संख्या वाढत होती. या सर्वांचे उदरभरण करण्यात अडचण निर्माण झाली होती. धान्य, भाजीपाला व इतर जीवनावश्यक वस्तूंची गरच वाढतच चालली होती. अन्नधान्य पिकविण्यासाठी आणखी जमीन हवी होती. ती आनंदवन येथे पुरेशी उपलब्ध नव्हती. त्यासाठी बाबांनी तत्कालीन महाराष्ट्र शासनाकडे अतिरिक्त जमीनीची मागणी केली होती. शासनानेही याची त्वरीत दखल घेऊन सुमारे १५०० एकर जमीन देऊ केली होती. पण ही सर्व जमीन डोंगराळ भागात होती आणि शेतीसाठी ती सर्वस्वी अयोग्य व नापीक होती. डोंगराळ भाग, जंगली झाडे, काटेरी झाडेझुडपे यांनी व्यापलेली जमीन साफ करून शेतीयोग्य करावी लागणार होती. शासनाने जणू एक आव्हानचं कुष्ठरोग्यांसमोर उभे केले होते. बाबा आणि कुष्ठरोगी बांधव यांच्यासाठी तो जिकिरीचा आणि मोठा कसोटीचा काळ होता. समोर समस्येचा उभा पाषाण होता.

खरेतरं बाबांच्या मनात सोमनाथला शेतीसोबतच एक 'वर्कर्स युनिव्हर्सिटी' (workers university) स्थापन करण्याची तीव्र इच्छा होती. ही एक अफलातून संकल्पना होती. शेतीविषयक प्रकल्पाबरोबरच इतरही काही तंत्रशिक्षणाचे प्रगत असे प्रकल्प त्यांना इथे सुरू करावयाचे होते. आसपासच्या

खेड्यातील शेतकरी व युवकांना इकडे बोलावून त्यांना त्यांच्या आवडीनिवडीप्रमाणे शेतीविषयक किंवा लघुउद्योगासाठीचे प्रगत असे शिक्षण द्यायचे. जेणेकरून पुढे ते आपापल्या शेतीमध्ये किंवा गावांमध्ये या शिक्षणाचा वापर करून चांगल्या पध्दतीने उपजिविका करु शकतील. शेती आणि उद्योगधंदे - व्यवसायाचे मळे फुलवू शकतील. शेती, फलोत्पादन, पशुपालन, दुग्धव्यवसाय, यंत्र दुरुस्ती यासारखी अनेक कामे नवीन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शिकविल्यामुळे उत्पादन वाढून स्वयंरोजगाराच्या अनेकविध संधी निर्माण होतील. त्यायोगे आपसुकच त्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न सुटेल, बेरोजगारी कमी होईल. समाजविघातक कृत्ये करणाऱ्या, दिशाहीन भरकटलेल्या, व्यसनाधीन तरुणांना अशा कार्याकडे वळविल्यामुळे एक जटील सामाजिक समस्याही आपोआपच सुटण्यास मदत होईल आणि असे कार्य सातत्याने करीत राहिल्याने समाजाच्या सर्व थरातील, जातीधर्मातील लोक हळूहळू एकत्र येतील. सामाजिक सलोख्याचे, बंधुभावाचे वातावरण निर्माण होवून एका संपन्न राष्ट्राची उभारणी आपसूक होईल. मानवी मूल्यांचे उत्थान होईल. अशी सारी आस बाबांना लागुन राहिली होती.

सोमनाथ प्रकल्पाशेजारी 'मारोडा' नावाचे एक खेडे आहे. मूलहुन सोमनाथला येताना या गावातूनच यावे लागते. सोमनाथ प्रकल्प सुरू होण्याच्या अगदी सुरूवातीच्या काळात या गावातील लोकांनी बाबांना खूप त्रास दिला होता. सोमनाथ मंदिराजवळ एक प्रकल्प सुरू होतोय आणि तिथे महारोग्यांची वसाहत होणार आहे, हे समजल्यावर मारोडा गावातील लोकांनी प्रकल्पास प्रचंड विरोध सुरू केला होता. बाबा आणि त्यांच्या सहकारी कुष्ठबांधवांवर दगडफेक झाली होती. मारहाणीचाही प्रसंग उद्भवला होता.

सोमनाथ मंदिराजवळून एक नैसर्गिक झरा वाहत होता. तो झरा सोमनाथ प्रकल्पा अंतर्गत येणार होता. या नैसर्गिक झऱ्याचे पाणी वापरून सोमनाथला नंदनवन फुलविण्याचे बाबांचे स्वप्न होते. पण अडचणीची गोष्ट म्हणजे हाच झग पुढे वाहत मारोडा गावी जात होता. त्यामुळे तेथील गावकऱ्यांचा मोठा गैरसमज झाला होता की, याच झऱ्याचे पाणी पिऊन आपणालाही महारोग होणार. त्यामुळे त्यांनी या प्रकल्पास प्रचंड विरोध सुरु केला. तत्सम काळाचा विचार करता असे होणे स्वाभाविकच होते. मारोडा गाववासियांनी त्यासाठी मोठे जनआंदोलन उभे केले होते. यात मग काही कारस्थानी राजकारणीही उतरले

होते. परिणामी बाबांना २०० एकर जमीन आणि तो झरा अक्षरशः सोडून द्यावा लागला. तरीही त्यांनी धीर सोडला नाही. मनी बाळगलेल्या स्वप्नांचा चुराडा होतो की काय असे त्यांना आता वाटू लागले होते. मागेडा गाववासियांच्या सततच्या त्रासामुळे ते उद्वीग्न झाले होते. एकांतात गाळलेल्या अश्रुतून एक कविता पुढे जन्मास आली. तीत ते म्हणतात -

" जहाजाबरोबर स्वतःला बुडवून घेणारे कर्णधार जिथे असतात,
तिथेचं बुडता देश वाचविणाऱ्या नाविकांच्या पिढ्या जन्म घेतात.
वाट पाहणाऱ्या किनाऱ्यांना...
आणि लाटांच्या उग्र कल्लोळाला कळू द्या,
मी अजून जहाज सोडलेले नाही..."

सोमनाथ प्रकल्प क्षेत्रफळाच्या बावत विस्तृत असला तरी इथे केवळ ५५० कुष्ठबांधवांची वस्ती आहे ! प्रत्येकाला कामे नेमून दिलेली आहेत. नित्यनियमाने ती पार पाडली जातात. सर्वांचा दिवस सकाळी लवकर सुरू होतो. सकाळी बरोबर सहा वाजता चहा-नाष्ट्याची वेळ असते. त्यानंतर नेमून दिलेल्या कामास सुरूवात होते. अकरा वाजता जेवणासाठी सुट्टी होते. दुपारी काही काळ विश्रांती घेतली जाते. त्यानंतर दुपारी दोन वाजता चहासाठी बेल वाजते, चहानंतर पुन्हा कामास सुरुवात होते. रात्रीचे जेवण सात वाजता आटोपले जाते. रात्री लवकर झोपून पहाटे लवकर उठण्याचा प्रघात तिथे कसोशीने पाळला जातो. याबाबत बाबा शिस्तीचे कडक आहेत. कामात कोणी हयगय केली तर त्यांना अजिबात खपत नसे. स्वभाव अतिशय शिघ्रकोपी असल्यामुळे त्यांच्यापुढे कोणाचीही डाळ शिजत नसे. सोमनाथचा प्रकल्प निर्बीड-निर्जन जंगलाचा, निकृष्ट प्रतीची जमीन, पाण्याची कमतरता, अपुरी साधने, अपुरे मनुष्यबळ, पैशाची कमतरता असे सारे असूनही श्रमाचे मळे फुलविण्याचा चमत्कार येथे घडला आहे ! सतरा छोटे तलाव आणि काही विहिरी श्रमदानातून उभारण्यात आल्या आहेत. ज्यात पावसाचे पाणी अडवून साठविले जाते, हेच पाणी वापरून पुढे वर्षभर शेती केली जाते. ऊस, सोयाबिन, जवस, भात, विविध प्रकारचा भाजीपाला याचबरोबर संत्री, केळी यासारख्या फळांचे उत्पादन येथे घेतले जाते. आनंदवन, हेमलकसा, अशोकवन या व इतर प्रकल्पांची गरज भागावी म्हणून सोमनाथची योजना बाबांनी आखली

होती. आज या सर्वांची दैनंदिन गरज भागून दररोज एक ट्रक भाजीपाला व फळे लोकल मार्केटमध्ये विक्रीसाठी पाठविला जातो.सोमनाथ येथे कुष्टवांधवांना राहण्यासाठी शांतीसदन, श्रमसदन, तृप्तीसदन अशा तीन वसाहती निर्माण केल्या आहेत. १३०० एकर क्षेत्रात या वसाहती एकमेकांपासून दूर अंतरावर उभारण्यात आल्या आहेत. त्यामागील हेतू असा की, सकाळी उठून शेतीच्या कामांना लवकर सुरुवात करता यावी. उगाच येण्या-जाण्यात वेळ खर्च होऊ नये. येथील बहुतांशी कुष्टबांधवांना कमी-अधिक प्रमाणात अपंगत्व जडले आहे. त्याकारणाने त्यांच्या हालचाली थोड्या मंद असतात. त्यामुळे शेतीकामावर येण्या-जाण्याकरिता वेळ लागू शकतो. हे ध्यानात घेवून त्यांच्या वसाहती शेतीलगत वेगवेगळ्या ठिकाणी स्थापिल्या आहेत. तसेच त्यामुळे आसपासच्या शेतीपिकांवर सहज लक्ष राहते व पिकांची नासधूस टळली जाते. कारण आजूबाजूस जंगल असल्याने रात्रीच्या वेळी जंगली प्राण्यांपासून शेतीचे बरेचदा नुकसान होत असते.शेतीची अवजारे, ट्रॅक्टर व इतर वाहने यांची दुरूस्ती व देखभाल, दुग्धशाळा, पशुसंगोपन, कुक्कुट -पालन या सारखे छोटे-मोठे अनेक उद्योग आनंदवनाप्रमाणे याठिकाणीही सुरू असतात. संपूर्ण प्रकल्प स्वयंभू आहे. अभिमानाने ऊर दाटून यावा असे विधायक कार्य कुष्ठबांधवांनी या ठिकाणी उभे केले आहे. नियतीने केलेल्या क्रूर थट्टेचा आणि समाजाने दिलेल्या हीन वागणूकीचा बदला कुष्ठबांधवानी इथे घेतला आहे ! बोटे नसलेल्या थोट्या हातांची ही किमया पाहण्यासाठी तुम्हाला येथे जरूर यावे लागेल.

हाथ लगे निर्माण में...

नही मारने, नही मांगने...

आनंदवन असो किंवा सोमनाथ, बाबा आमटेंचा हा प्रचंड उपद्व्याप पाहिला की, त्यांच्याच तोंडून निघालेल्या काही गहन उद्गारांची प्रचिती लक्षात आल्यावाचून राहत नाही. बाबांच्या तोंडून निघालेल्या प्रत्येक शब्दातून 'ज्वाला आणि फुले' गुंफून येतात. काही शब्द दरवळतात तर काही धगधगतात. यातील काही शब्द तर मनावर कायमचेचं कोरले जातात. उदाहरणार्थ काही वाक्ये पाहिली तर आपल्या ते सहजचं लक्षात येईल -

* दान माणसाला नादान बनविते !

* अपंगांना संधी द्या, भीक नको !

* जातीवंत बी कोठेही पडले तरी उगवायला लाजत नाही !

* भान राखून योजना आखायच्या अन् बेभान होऊन काम करायचं !

* शोषणाने जो समृध्द होतो तो जगाला शाश्वत अंधार देतो !

* वेदनेचा वर नसलेले शरीर उन्मत्त होतं. यातनाहीनांना स्वप्ने नसतात !

* वेदनेची आच जाणवत नसेल तर शिक्षणाला अर्थ नसतो !

* सुळासाठी छाती पुढे केल्याशिवाय मुकूटासाठी मस्तक पुढे करता येत नाही !

* प्रेममय जीवन हवे असेल तर जीवनाची प्रीती टाकून दिली पाहीजे !

* आपल्या प्रपंचाची कोंडी फोडून जो समाजाचा प्रपंच आपला करतो तोच खरा वानप्रस्थी !

* वेदनेच्या गडद अंध:कारात उतरण्याची देवदुतासारखी हिंमत आजच्या तरुण पिढीने जागवावयास हवी !

* काळाच्या पत्थरावर सतत धडक्या घेतो तोच खरा युवा होय !

* तरुण असे हवेत की, जे वाऱ्या-वादळात, रखरखाटात, गारठ्यात व टोळधाडीत धरित्रीचा पान्हा बेभान भोगू शकतील !

* तुकड्या-तुकड्यांवरील आसक्ती काढून ती संपूर्ण राष्ट्राच्या कामी लावणारे जे असतील ते माझे असतील !

* Think not of what has left Think of What is left.

- बाबा आमटे

'दो आंखे बारह हाथ' हा व्ही. शांताराम यांचा जुना हिंदी चित्रपट आपणा सर्वांना आठवत असेलच. अगदी तशीच घटना सोमनाथ प्रकल्प सुरु करतेवेळी येथे घडली होती. फरक इतकाच होता की, चित्रपटात ते सारे कैदी होते आणि इथे सारे कुष्ठरोगी होते ! सोमनाथ प्रकल्प सुरु करतेवेळी बाबा केवळ सहा कुष्ठबांधवांना सोबत घेऊन येथे आले होते. सर्व संकटांना तोंड देत याच सहा जणांनी पुढे अक्षरश: इतिहास रचला. त्यापैकी एक होते शंकर दादा जुमडे ! त्यांचा स्वभाव अतिशय शीघ्रकोपी होता. कोणत्याही कामाबाबत अतिशय कडक

शिस्त आणि काटेकोर नियोजन असे. बाबांनी सोमनाथ प्रकल्पाची जबाबदारी त्यांच्यावरच सोपविली होती. पुढे त्यांनी ती अतिशय उत्तमरीत्या सांभाळून दाखविली. बाबा नेहमी त्यांना सोमनाथ विद्यापीठाचे 'कुलगुरु' म्हणायचेत. अशा या शंकरदादांचा सहवास मला सोमनाथमध्ये मिळाला. ते सतत अष्टसावधानी असायचे. रोज सायंकाळी जेवण आटोपून आम्ही गप्पा मारत बसायचो. सोमनाथ विषयी बरीचशी माहिती मला त्यांच्याच तोंडून समजली. तसेच बाबांच्या स्वभावाचे अनेक पैलू मला शंकरदादांकडून कळाले. शंकरदादा बाहेरून काटेरी स्वभावाचे भासत असले तरी ते अत्यंत संवेदनशील मनाचे होते. अशा या शंकरदादांचे शरीर सतत कंप पावायचे. उतारवयात त्यांना पार्किंसनने ग्रासले होते. कधी अचानक अस्वस्थता खूप वाढायची. संपूर्ण शरीर गदगदा हलविल्यासारखे व्हायचे. सर्वांगास दरदरून घाम फुटायचा. श्वास फुलायचा. मग मात्र ते खूप बेचैन व्हायचेत. आयुष्यभर धडपडलेल्या या व्यक्तीने शेवटच्या श्वासापर्यंत धडपडत राहावे यासाठीच जणू पार्किंसनची व्यवस्था नियतीने त्यांच्यासाठी केली होती की काय कोणास ठावूक ? एखादे कार्य सफल होण्यात अनेकांचे बहुमूल्य योगदान असते. काहींचे योगदान लक्षात येते पण काहींचे मात्र ते कधीच लक्षात येत नाही. मी सोमनाथ सोडल्यानंतर काही वर्षांनी शंकरदादांची विचारपूस करावी म्हणून एकदा सहजच फोन केला होता पण.. हे जग सोडून ते कायमचेच निघून गेले होते. धडपड निमाली होती.

सोमनाथ प्रकल्पामध्ये काम करीत असताना एक गोष्ट मला प्रकर्षाने जाणवली ती म्हणजे तेथील कामाची शिस्त आणि नियोजनबद्ध वेळापत्रक. वेळेचं गणित येथील प्रत्येकाच्या मेंदूतच जणू फिट्ट केलेलं ! त्यामुळे प्रत्येक काम तिथे वेळेवर पार पाडले जाई. प्रत्येक कामात एक स्वयंशासित शिस्त असे. प्रत्येकास कामे नेमून दिलेली असत. शेतीची आवड असणाऱ्यांना शेतीची कामे तर पशुपालन, हातमाग, वाहन दुरुस्ती, चर्मकारिता अशा कामांचे आवडीप्रमाणे वाटप झालेले असे. सर्वांचा दिवस सकाळी अगदी लवकर सुरू व्हायचा. तो रात्री अंधार पडेपर्यंत सुरू राहायचा. सारी कामे अगदी यंत्रवत होत असत. सकाळी लवकर उठून कामाला सुरूवात केल्यामुळे कामाचा उरक झपाट्याने होई. बाबांनी सुरूवातीपासूनच वेळेबाबतचा असा काटेकोर नियम त्यांच्या प्रत्येक प्रकल्पामध्ये राबविला होता. त्यामुळे कामाबाबत कोणाचीही तक्रार, कुरबूर चालत नसे.

हलगर्जीपणा खपवून घेतला जात नसे. परंतू प्रत्येक नियमास एखादा अपवाद हा असतोच. याठिकाणी माझे काहीसे तसेच झाले होते. वेळेच्या बाबतीत मी थोडासा निर्धास्त व हलगर्जीपणे वागत होतो. वेळेचे नियोजन आपल्यासाठी नाहीच जणू या थाटात मी तिथे वागत होतो. सकाळचे आठ वाजले तरी मी दवाखान्यात पोहोचलेला नसायचो. मग कोणीतरी मला उठवायला यायचा. माझी गडबड व्हायची. धांदल उडायची. कधीकधी आंघोळ न करताच मी ओपीडीत जाऊन बसत असे. बरेचशे पेशंट्स रांगेने नंबर लावून बसलेले असायचे. लवकर औषधोपचार घेऊन कामाकडे जाण्याची घाई त्यांना झालेली असायची. पण माझ्या उशीरा येण्याने त्यांचा नेमका खोळंबा व्हायचा. मला सर्वजण अक्षरश: वैतागायचेत. कधी हा बाबा दवाखान्यात येतोय असे त्यांना झालेले असायचे.

"डॉक्टर, तुम्ही सकाळी लवकर येत जा." त्यातील खूप वैतागलेले काहीजण मला म्हणत. मी गालातल्या गालात हसे.

"हो, मी उद्यापासून नक्की लवकर येत जाईन. काळजी करु नका." - मी त्यांना आश्वस्थ करी.

पण.... उद्या माझ्याबाबत कधी उजाडायचाच नाही. सकाळी लवकर उठणे मला काही जमायचेचं नाही. लवकर उठण्याचा खूप निर्धार करायचो पण प्रत्येकवेळी येरे माझ्या मागल्या व्हायचेचं. 'सूर्यवंशी' हया माझ्या आडनावाप्रमाणे मी खूप उशीरापर्यंत घोरत पडलेलो असायचो आणि उद्याचे टायमिंग हमखास चुकलेले असायचे. कधीकधी बाबा सोमनाथला काही दिवसांसाठी येत असत. नित्यनियमाप्रमाणे लवकर उठून ते फिरून येत. मी अंगावर ऊन येईपर्यंत लोळत पडलेला पाहून ते हसायचे. सोबतच्या कार्यकर्त्यांला आपल्या पहाडी आवाजात मुद्दामहून विचारत, 'अरे सूर्यवंशी उठले का?' जेव्हा हे मला कळायचे तेव्हा मी खूप ओशाळायचो. मनास खंत लागून राहायची. एके दिवशी तडकाफडकी तालुक्याच्या गावी गेलो आणि एक छोटेसे गजर करणारे घड्याळ घेऊन आलो. उद्या लवकर उठायचेचं या निर्धाराने पहाटे पाचचा गजर लावून निवांतपणे झोपी गेलो. सकाळी उठलो तर गजर केव्हाचाच होऊन गेला होता. सूर्यवंशीचे टायमिंग चुकलेलेच होते. कधीतरी एखादे दिवशी भल्या पहाटे जाग यायची तेव्हा पटकन उठायचो. अंघोळ वगैरे आटोपून सर्वांच्या अगोदर ओपीडीत हजर व्हायचो. तो संपूर्ण दिवस जग जिंकल्याच्या अविर्भावात वावरायचो ! उद्याही आपण

आजच्यासारखे लवकर उठायचे असा ठाम निर्धार करुन झोपी जायचो.... पण व्यर्थ !

माझा दिनक्रम असाच सुरु होता. दररोज सकाळी उशीराने ओपीडीत जायचो. सर्वजण वैतागायचेत. सॉरी बोलून मी ओपीडीसी सुरवात करे. माझ्यासोबत तिथे मदतनीस म्हणून नेताजी, दिगंबर आणि दामू असे तिघेजण काम करीत असत. तिघेही पूर्णत: बरे झालेले कुष्ठरोगीच होते. हाताची काही बोटे आणि नाकाचा शेंडा एवढ्यावरचं त्यांचे भागले होते. मात्र ओपीडी कामात हे तिघेही पूर्वीपासून तरबेज होते. अगदी इंजेक्शन देणे, सलाईन लावणे, औषध देणे, ड्रेसिंग करणे आदी कामे ते स्वतःहून करीत असत. दररोज किमान ७०-८० पेशंट्स होतं. अनेक कुष्ठरोगी वीस-तीस वर्ष जुन्या कधीही बऱ्या न होणाऱ्या जखमा घेऊन ड्रेसिंगसाठी येत. सुरुवातीला अशा जखमा पाहवत मला शिशारी यायची. त्या जखमा पहावत नसत. हातांची झडलेली थोटी बोटे, झिजलेलं बसकं नाकं, बऱ्या न होणाऱ्या जखमा, तांबूस तेलकट त्वचा हे सारं पाहून मला मळमळायचं, अन्नावरची वासनाच उडायची. पण काही कालावधीनंतर या गोष्टींची खूप सवय झाली. जखमांचे तर काहीच वाटेनासे झाले. सराईतपणे मी ड्रेसिंग करू लागलो. त्यांचा हात हातात घेवून त्यांना दिलासा देऊ लागलो. त्यांचा हात हातात घेतला की, त्यांच्या डोळ्यात चटकन् पाणी येई. कारण आजपर्यंत त्यांचा हातच काय त्यांना कोणी स्पर्शही केलेला नसे. हळू हळू त्यांचा माझ्यावर खूप विश्वास बसला. गावाकडील मनातील बराचश्या गोष्टी मला ते सांगू लागले. आता मी त्यांच्यातीलच एक झालो होतो.

कुष्ठरोग हा 'मायकोबॅक्टेरीयम लेप्री' (mycobacterium leprae) नावाच्या जीवाणूमुळे होतो असे आधुनिक शास्त्र सांगते. या जंतूचा शोध डॉ. हॅन्सन यांनी १८७३ मध्ये लावला होता. म्हणून यास 'हॅन्सनस् डिसिज' असेही म्हणतात. मराठीत आपण महारोग किंवा कुष्ठरोग असे म्हणतो. या आजारात नसांवर (nerves) परिणाम होऊन संवेदना नष्ट होतात. त्यामुळे जखमा कधी होतात हे समजतच नाही. हातापायांची बोटे हळूहळू झडत जातात त्यामुळे लवकर लक्षात येत नाही किंवा दुर्लक्ष केले जाते. जखमा कितीही मोठ्या असल्या तरी वेदना जाणवत नाहीत. त्यामुळे आजाराचे गांभीर्यच लक्षात येत नाही. एकदा का हा आजार बळावला की, हातापायांची बोटे, नाक, चेहरा यात कायमस्वरुपी

विकृती निर्माण होते. झालेले नुकसान पुन्हा भरून येत नाही. पर्यायाने सदर व्यक्तीची वाताहात होण्यास सुरुवात होते. एकदा का कुष्ठरोग जडला की कुटूंब आणि समाज अवहेलना सुरु होते. बहिष्कृत केले जाते. कोठेही थारा मिळत नाही. याचा प्रचंड मोठा मानसिक ताण संबंधित व्यक्तीला सहन करावा लागतो. सर्वत्र केवळ उपेक्षा आणि उपेक्षाच वाट्यास येते. त्यांच्या उभ्या आयुष्याशी नियतीने मांडलेला हा खेळ असतो. मी.... आणि.... मीच का?.... माझ्याच नशिबी ही भयंकर शिक्षा का?.... असा कोणता अपराध माझ्या हातून घडला होता? पूर्वजन्मीचं पाप की .... आणखी काही.... काहीच समजत नाही.... नेमकं उत्तर कधी त्यांना भेटतच नाही.... मग पुढे आयुष्य केवळ धकत राहतं.... न् आशा न् अपेक्षा ललाटी केवळ निराशा आणि निराशेचाच खेळ.... मनाची किती घालमेल होत असेल या अभागी जीवांची ?....वेदनेच्या नुसत्या इंगळ्या डसत असतील....असलं कसलं हे जीणं,यांच्याच वाट्यास यावं ? ....शरीरं तर आता बधीरच होत चाललयं पण.... मनातील वेदनेचं काय?.... वेदनांचे कढ आता सोसायचेत तरी किती ?....हे भोग भोगायचेत तरी किती ?.... बिचाऱ्यांच्या वेदनाचं आता मुक्या झाल्या होत्या.... मला आठवतयं, त्यादिवशी एकजण टाचेला नव्याने झालेली जखम दाखवायला ओपीडीत आला होता. मी विचारलं, "जखम कशी झाली?"

"रात्री झोपेत उंदरानं टाच खाल्ली नव्हं" तो हसतच म्हणाला. मी बधीर झालो. पुढे काय बोलावे तेच सुचेना. रात्री झोपेत असताना उंदराने त्याची टाच खाल्ली होती.... आणि त्याची त्याला कसलीही जाणीव झालेली नव्हती. सकाळी लाल रंगाचे अंथरुण पाहिल्यानंतर तो जागा झाला होता ! अशा अनेक विचित्र घटना त्यांच्याबाबत तिथे घडायच्या पण त्यांच्यासाठी त्या आता नित्याचाचं भाग झाल्या होत्या. असेच एकदा एक कुष्ठरोगी पायाची जखम घेवुन आला. ते थंडीचे दिवस होते. थंडीपासून बचाव करण्यासाठी त्याने शेकोटी पेटवली होती. दिवसभराच्या श्रमाने तो अगोदर थकला होता. पहाटे कधीतरी त्याची झोप लागली. सकाळी उशीरा जाग आली. जेव्हा जाग आली तेव्हा त्याच्या लक्षात आले.... पायाचा कोळसा झालाय ते !

कडक वैदर्भिय उन्हात डांबरी रस्त्यावरुन चालताना पायांच्या तळव्यांना आलेले फोड फुटून गेले तरी या अभाग्यांना ते समजायचचं नाही. 'तळव्यांची

चामडी खरपूस भाजली गेलीय' हे तळव्याकडे लक्ष गेलं तरचं समजायचं. चुलीवरचं तप्त भांडं त्यांच्या हातांना कधी भाजायचचं नाही. दोन्ही हात जेव्हा कधी नजरेत येत तेव्हाच त्यांना कळायचं की, आपले हात खरपूस भाजून निघालेत ते ! नियतीनं त्यांच्या उभ्या आयुष्याशी मांडलेला हा खेळ पाहून माझ मन उदास व्हायचं. मानवी जीवनातील निरर्थकता मनात घर करुन राहायची. कोणाकडे किती पैसा - आडका, सोने-नाणे, बंगला गाडी ? या गोष्टीची आपण सतत तुलना करत असतो. पण इतरांच्या आयुष्यातील दुःखाची, वेदनांची तुलना आपण कधीही करत नाही. खरेतर ती व्हायला हवी. इतरांचे प्रश्न, अडीअडचणी, गुंतागुंत याची जाणीव आपल्याला नसते. आणि जाणून घेण्याची तसदीही आपण घेत नाही. औताला जुंपलेल्या चाकोरीतील बैलासारखी आपली अवस्था झालेली असते. तेच आपलं आयुष्य बनलेलं असतं. जेव्हा कधी दुसऱ्याच्या वेदनांशी आपली जातकुळी तादात्म पावेल तेव्हाच खऱ्या अर्थाने मानवी आयुष्याच्या प्रयोजनाचा अर्थ आपणांस उमगेल. आणि तेव्हाच कुठे जगण्याचे संदर्भ बदलतील. आपला समाज अधिकाधिक प्रगल्भतेच्या दिशेने वाटचाल करु लागेल. अधिकाधिक सुखी-समृध्द होण्याची शक्यता बळावेल. सध्याच्या ताण-तणावापासून मुक्ती मिळेल. जीवनाचा खराखुरा अर्थ समजेल. प्रेममय जीवन हवे असेल तर जीवनाची प्रीती टाकून दिली पाहीजे, असे बाबा आमटे म्हणतात ते काय उगीचचं नव्हे!

आक्काताई नावाची एक नवीन कुष्ठरोगी स्त्री सोमनाथला काही महिन्यापूर्वी दाखल झाली होती. ती नेमकी कोठून आली होती ते माहित नव्हतं. तिचे संपूर्ण नाव देखील कोणास माहित नव्हतं. तिच्या पूर्वायुष्याविषयी इथे फारसं कोणास माहित नव्हतं. सर्वांसाठी तशी ती अनभिज्ञच होती. तिच्या कुटुंबियांनी तिला वाळीत टाकलेलं असावं, म्हणूनच तर ती आपलं गांव सोडून इथे आली होती. अंगभर कुष्ठरोग आणि डोईवर वाढलेल्या जटांचे ओझे वागवत ती बहिष्कृता सोमनाथ मध्ये दाखल झाली होती. प्रकल्पामध्ये येणाऱ्या कोणाही नवीन व्यक्तीला त्याचा पूर्वेतिहास विचारायचा नाही, असा बाबांचा शिरस्ता होता. अडचणीत असणाऱ्या समोरच्या व्यक्तीला समजून घ्यायचं. त्याला नव्याने आयुष्य जगण्याची संधी द्यायची. आत्मनिर्भर होण्यास मदत करायची. त्याचा आत्मसन्मान जागृत करायचा. त्याला इतकं प्रेम द्यायचं की, त्याच्यातील 'खरा

माणूस' जागा व्हायला हवा. या जगात आपलंही कोणी आहे याची जाणीव त्यास व्हायला हवी. समाजाने, कुटुंबाने टाकलेल्या निराधार, पिडीत, बेघर, दुःखी लोकांसाठी सोमनाथ किंवा आनंदवन सारखी जागा अख्या जगात कोठे शोधूनही सापडणार नाही. आक्काताईही अशीच एके दिवशी अवचित आली अन् येथीलच एक होऊन गेली. एका निष्पाप, निराधारास अनेक निराधाराचा भक्कम आधार लाभला !

आक्काताई दररोज न चुकता दवाखान्यात यायची. मानदुखी एवढी एकच तक्रार असे. त्यासाठी दररोज तिला वेदनाशामक औषध हवे असायचे. वेदनाशामक औषध तिची मानसिक गरज बनली होती. बऱ्याच दिवसांपासून ती वेदनाशामक औषधे घेत होती, परंतु तिची मानदुखी मात्र काही केल्या कमी होत नव्हती. योग्य निदान व्हावे आणि त्या अनुषंगाने पुढील उपचार व्हावेत यासाठी तिला अस्थिरोग तज्ञाकडे पाठवावे, असे माझे मत बनले. एक दिवस हे मी तिला सविस्तर समजावले व अस्थिरोग तज्ञाकडे पाठविण्यासाठी चिठ्ठी लिहू लागलो. तितक्यात माझे लक्ष तिच्या जटांकडे गेले अन् त्याक्षणी माझी ट्युब पेटली. एक विचार मनात तरळला. काही क्षण मी तसाच बसून राहिलो. कसे बोलावे, तिला कसे समजवावे याच विचारात गढून गेलो. खरेतर तिच्या जटा खूप वजनदार होत्या. दिवसभर डोकीवर ते ओ वाहवत तिला शेतावर काम करावे लागे आणि रात्री जटांमुळे झोपही नीट मिळत नसे. रात्रभर मान अवघडायची अन् दिवसभर दुखत राहायची. जटांमुळे बिचारी हैराण झाली होती. मनाशी ठाम निर्धार करून मी तिला म्हणालो,

'"आक्काताई जटा कापायला हव्यात." ती एकदम दचकली. डोळे विस्फारून माझ्याकडे पाहू लागली. तिचा चेहरा भयग्रस्त झाला होता.

"डाक्टरसायब, काय बोलतायसा हे? जटा कधी कापत्यात व्हयं ? देवीच्या जटा हाईत त्या. आई यल्लमाच्या. उगाच कायबी अभद्र बोलू नगासा. आईचा कोप व्हईल!"

ती काकुळतीला येवून बोलत होती. नाराजीची झालर चेहऱ्यावर स्पष्टपणे उमटलेली दिसत होती. स्वर आर्त झाला होता. तरीही मनाचा ठाम निर्धार बांधून

मी पुन्हा तिला म्हणालो, "जटा कापल्याशिवाय तुझी मानदुखी थांबणार नाही आक्काताई. '

"नगं...नगं तसं बोलू नगासा, डाक्टरसाब, यल्लूआईच्या जटा हैत त्या...' स्वतःला सावरीत ती बोलली.

"हो, ठीक आहे, पण मला एक सांगा आक्काताई, तुम्ही देवीची एवढी उपासना करताय, पूजाअर्चा करतायं, डोईवर तिच्या जटांचं ओझं वाहताय आणि तरीही तिने तुम्हालांच बरं हा महारोग दिलायं, हे कसं काय? ज्या कुटुंबासाठी तुम्ही इतके कष्ट उपसले, राब-राब राबलात त्यांनी तुम्हालाच घरातून हाकलून लावलं. तुमच्या मनाचा थोडाही विचार केला नाही. उपकारांची जाणीव ठेवली नाही. रस्तोरस्ती फिरायला भाग पाडलं. आज ते तिकडे सुखात आयुष्य कंठत असतील आणि तुम्ही इकडे वणवण भटकताय. मग त्यांना तुमच्या देवीने काही शिक्षा दिली आहे? तुमच्या अंगात किमान देवीचा अंश आहे याचंही भान त्यांना असू नये ? देवी आजपर्यंत त्यांच्यावर का कोपली नाही? जटांसह हा महारोग नेमका तुमच्याचं वाट्यास कसा काय आला बरं? सांगा पाहू." मी थोडं संतापूनच बोलत होतो. ती शांत, निश्चल बसून होती. काही बोलत नव्हती. पण माझे बोलणे मात्र लक्षपूर्वक ऐकत होती. मी पुढे काही बोलणार तोच ती पट्कन उठली अन् निघून गेली. मी गोंधळलो. अरेच्चा ! ही अशी अचानक का बरे निघून गेली असेल? मी तिच्या भावना दुखावल्या होत्या. वास्तविक मी असे बोलायला नको होते. माझे बोलणे तिच्या जिव्हारी लागले होते. तिचा पडलेला चेहराच तसे सांगत होता. इकडे मलाही फार वाईट वाटले. क्षणभर विचार केला अन् मनातला विचार झटकून टाकला. जाऊदे गेली तर गेली. तिच्या भल्यासाठीच तर मी बोलत होतो. मला अनेकदा असा प्रत्यय आलेला आहे. आपण देवधर्माबाबत जरासे काही वेगळे बोललो, वेगळा विचार मांडला तर लगेच लोकांच्या भावना दुखावतात. त्यांना पटकन् राग येतो. समोरचा माणूस धर्मविरोधी, पापी, अनैतिक आहे असे त्यांना वाटू लागते. बालपणापासून मनावर झालेल्या देव आणि धर्म या संकल्पनेचा पगडा प्रचंड असतो. तो सहजासहजी खरवटून काढता येत नाही. एकदा का देव-धर्म संकल्पनेचा कोष स्वतःभोवती विणला की त्या कोषातच त्यांना सुरक्षितता लाभत असते. पण नाण्याला दुसरीही बाजू असते हे त्यांच्या

लक्षातच येत नसते. बुध्दीप्रामाण्यवाद, वैज्ञानिक दृष्टीकोन हे शब्द त्यांच्या खिजगणीतही नसतात.

असेच काही दिवस सरले. आक्काताईने आता दवाखान्यात येणेच बंद केले होते. मलाही तिचा विसर पडला होता. मी माझ्या दैनंदिन कामात व्यस्त झालो होतो. पण.... अचानक एके दिवशी ती माझ्यासमोर येऊन उभी राहिली. मी काही बोलणार तोच् ती म्हणाली -

"डाक्टर माझ्या जटा आज सोडवायच्या हैत." मी गडबडलो, गोंधळून गेलो. ती काय म्हणतेय तेच मला उमगेना. काही दिवसांपूर्वी रागाने अवचित निघून तर गेली होती आणि आज अचानक चक्क जटा सोडवायची भाषा करत होती. मी तिला शांतपणे विचारले-

"आक्काताई खरेचं का तुमच्या जटा सोडवायच्या आहेत ?"

"व्हयं सोडवायच्या हैत. कापायच्या न्हाईत."

तिच्या स्वरात ठाम निर्धार जाणवत होता. मी स्वतःशीच हसलो, अन् तिला म्हणालो, "ठिक आहे जटा सोडवूया आपण, पण... तुमचा निर्णय पक्का आहे ना ?"

"व्हयं," ती ठसक्यात बोलली.

एखाद्याच्या जटा सोडविण्याचा हा माझा पहिलाच अनुभव होता. अंगात उत्साह संचारला होता. जवळच्याच स्टुलावर तिला बसविले. एका छोट्याशा कात्रीने तिच्या जटा सोडविण्याचा प्रयत्न करू लागलो. पण कसले काय, कंगवा केसात घुसतच नव्हता आणि कात्रीही मोडते की काय असे वाटू लागले. एकही जट विलग होत नव्हती. मानेवर एखादा दगड लोंबकळत असल्याचा भास होत होता ! जटा बऱ्याच वर्षापासून असाव्यात. अतिशय कठिण, एखाद्या दगडासारख्या घट्ट झाल्या होत्या. माझी खटपट सुरूच होती.... आणि इकडे कात्री - कंगव्याने मान टाकली. कंगवा मोडला, कात्री वाकली. सारे प्रयत्न व्यर्थ ! मी हाशहुश् करीत होतो. घामाघूम झालो होतो. काही केल्या आक्काताईच्या जटा विलग होत नव्हत्या. आता तीही घाबरली होती. शंका-कुशंकांनी माझ्याही मनात घर केलं होतं. पण मी शांत होतो किंवा शांत असल्याचं नाटक करीत होतो. काही क्षण मी विचार केला. हातातील शस्त्रे बाजूस ठेवली आणि तिला म्हणालो,

“आक्काताई जटा काही विलग होत नाहीत. संपूर्ण जटा कापूनचं टाकायला हव्यात. काय करूया ?"

" नाहीत सुटत तर कापा मग,” ती चाचरत म्हणाली.

मी टेलरकडची मोठी कात्री मागवली. माझे काम आता सोपे झाले होते. जटा सोडवत न बसता संपूर्ण कापायच्या तर होत्या. कात्री हाती येता मजबूतीची खात्री केली अन् पुढच्याच क्षणी जटा डोईवेगळ्या केल्या. तितक्याच नाभिक हस्तकौशल्याने एक छानसा बॉबकटही मारला. तिचा हा वेगळा 'लुक' पाहून मी स्वतःवरच जाम खुश झालो. आक्काताईला उठवून एका आरशासमोर उभे केले. आपले नवे "रूपडं" ती न्याहाळू लागली. स्वत: तून अलग झालेली ती, तिच्याच समोर उभी होती. दोघीत मूकसंवाद सुरू होता. आपलचं नवीन रूपडं न्याहाळून ती छानशी लाजली. चेहऱ्यावर ओसंडून वाहणारा विलक्षण आनंद पदराआड लपवित म्हणाली,

"डाक्टर आता लई बरं वाटतया बघा लई झ्याक ."

परंपरागत चुकीच्या श्रद्धांचे जोखड मानेवर वागवून जगणारे अनेक देवभोळे लोक आपल्या अवतीभोवती असतात. ते बदलू शकतात. परिवर्तन घडू शकतं. फक्त गरज असते ती सातत्याने प्रबोधन करण्याची.

त्यादिवशी आक्काताईच्या चेहऱ्यावर विलसणारा तो आनंद मला अंतर्यामी विलक्षण समाधान देऊन गेला !

गेल्या दहा वर्षांपासून बाबांनी नर्मदा बचाव आंदोलनाचा व्यापही पाठी लावून घेतला होता. मेधा पाटकरांच्या नर्मदा बचाव आंदोलनात त्यांनी उडी घेतली होती. नर्मदा बचाव आंदोलनाबाबत प्रचंड वैचारिक मतभेद असूनही बाबा सर्वसामान्यांच्या हक्काच्या बाजूने उभे राहिले होते. त्यासाठी गेल्या दहा वर्षापासून ते आनंदवन सोडून मध्यप्रदेशातील कसरावद येथे जाऊन राहिले होते. नर्मदा तीरावर एक छोटीशी झोपडी बांधून तिथे साधनाताईसह राहत होते. गेली दहा वर्षे आनंदवनला ते फिरकलेसुद्धा नव्हते. आनंदवन व इतर सर्वच गोष्टींचा उभयतांनी जणू त्यागच केला होता. शेवटी महत्प्रयासाने त्यांचे मन वळवून दहा वर्षाच्या प्रदीर्घ कालावधीनंतर त्यांना आनंदवनला परत आणण्यात यश आले होते.

सध्या साधनाताईसह ते आठ दिवसांच्या विश्रांतीसाठी सोमनाथला आले होते. गेल्या काही वर्षात उभयतांची बरीच धावपळ झाली होती. त्यांना विश्रांतीची सक्त गरज होती. बाबांचे वयही झाले होते. सध्या ते ८७ वर्षांचे होते !

बाबा आले की संबंधित प्रकल्पातील वातावरण एकदम बदलायचं. प्रसन्न, प्रफुल्लीत व्हायचं. मरगळ दूर होऊन सर्वांचीचं मने उल्हासीत होत. त्यांच्या व्यक्तीमत्वाचं वलयंही तसचं होतं. समोरील व्यक्ती भारावून जायची. दणकट शरीरयष्टी, पहाडी आवाज, करारी बाणा असं त्यांच भारदस्त व्यक्तिमत्व होतं. तेथील प्रत्येक कुष्ठबांधवांच्या हृदयात बाबांची प्रतिमा कोरली गेली होती. बाबा म्हणजे त्यांच्यासाठी देवाचं खरंखुरं रूप होतं. रंजल्या-गांजल्या जीवांचा तो तारणहार होता. ज्यांच्या आयुष्याची मदार कटोऱ्यातील भीकेवर टिकून होती, त्यांच्याठायी स्फुलिंग चेतविणारा तो एक महान देवदूत होता ! त्यामुळेच तर ते जिथे-जिथे प्रस्थान ठेवत तिथे-तिथे आनंदास उधाण येई. आताही अगदी तसचं वातावरण सोमनाथला अनुभवास येत होतं. सर्वत्र उत्साहास उधाण आलं होतं !

एका सायंकाळी मी बाबांसमवेत पायमोकळे करायला गेलो होतो. आम्ही दोघेच होतो. रस्ता निर्मनुष्य जंगलातला होता. गप्पा मारत आम्ही चाललो होतो. त्यांचं बोलणं, त्यांचे विचार म्हणजे माझ्यासाठी पर्वणीच होती. त्यांच्या प्रत्येक शब्दाला अनुभवाची झालर होती. त्यांचे विचारचं त्याची साक्ष देत होते. त्यांचे प्रत्येक वाक्य मी लक्षपूर्वक ऐकत होतो. वेळ खूप मजेत सरत होता. मी समृद्ध होऊन राहिलो होतो. चालता-चालता एका लहानशा ओढ्यापाशी बाबांनी मला थांबवलं. ओढ्याकाठच्या एका छोट्याशा झाडावर त्यांची नजर स्थिरावली होती. ते बेलाचं झाड होतं. त्याची पाने त्यांना हवी होती. घसरणीला असणाऱ्या इतर झाडा-झुडपांचा आधार घेत मी पुढे झालो. काही पाने तोडून मी वरती आलो. मनात सहज विचार आला, ही ओंजळभर पाने यांना कशाला बरे हवी असतील? काहीच उमगेना म्हणून उत्सुकतेपोटी मी बाबानां विचारलं, "बाबा, ही बेलाची पाने तुम्हांस कशाला हवीत बरं?"

“देवपूजेला.” ते ताडकन् बोलले.

मी दचकलोच...आणि गोंधळूनही गेलो. कारण एकतर बाबा विचारांचे पक्के नास्तिक होते. कर्मकांडाच्या किंवा देवधर्माच्या भानगडीत ते कधी पडले नव्हते.

केवळ कर्मयोगावर त्यांचा ठाम विश्वास होता आणि हा त्यांचा पूर्वेतिहास होता. पण.... आता तर ते बेलाची पाने चक्क देवपूजेसाठी नेत होते. हा तर पूर्णतः विरोधाभास दिसत होता. त्यांच्या आचार-विचारांतील असा का विपर्यास माझ्या मनास खटकत होता. मी पुरता गोंधळून गेलो. बाबांविषयी मी बरेच काही वाचून ऐकून होतो. आणि आता माझ्यासमोर तर सर्व विपरीत घडत होतं. हे कसं शक्य आहे ? मला काहीच समजेना. अखेर धीर एकवटून मी त्यांना विचारलचं -

"बाबा,तुम्ही तर नास्तिक विचारांचे पक्के आहात. मग ही देवपूजा कसली?"

माझ्या प्रश्नावर त्यांनी काही एक उत्तर दिले नाही. त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले अस्वस्थ भाव मला स्पष्टपणे जाणवू लागले. मी ओशाळलो. अरेरे, आपण असा भलताच प्रश्न त्यांना विचारायला नको होता. नक्कीच त्यांना प्रशस्त वाटले नसणार. मी त्यांचा अवमान केला होता. खरेतर एखाद्याच्या खाजगी जीवनात डोकावणारा असा हा प्रश्न होता. पण माझ्याकडून तो आता अनावधानाने विचारला गेला होता. मला वाईट वाटले. पण आता बाण धनुष्यातून तर केव्हाचाच् सुटला होता. बाबांनी एकवार माझ्याकडे पाहिले अन् स्मितहास्य केले. मला थोडे बरे वाटले, थोडा धीर बळावला. विषय बदलून आम्ही पुढे चालत राहिलो. परतायला बराच उशीर झाला होता. अंधार बळावला होता. ती ओंजळभर बेलाची पाने हातातून निसटू पाहत होती.

असेच दिवसांमागून दिवस सरत होते. दुपारपर्यंत ओपीडी पाहून उरलेल्या वेळात प्रकल्पातील इतरही कामे करण्याचा प्रयत्न करीत होतो. नवीन ओळखी होत होत्या. तेथील दैनंदिन कामाचे स्वरुप लक्षात येत होते. सर्वजण आपापले काम इमानेइतबारे पार पाडीत होते. त्यांच्याशी चर्चा करताना वैयक्तिक जीवनात त्यांनी भोगलेल्या दुःखाची कल्पना येत होती. बाबा आमटे या व्यक्ती विषयी सर्वांच्या मनात अतीव आदराची भावना होती. इकडे येऊन मला सहा महीने झाले होते. आता मी सुध्दा त्यांच्यातीलच एक बनून राहिलो होतो. ओपीडी संपल्यानंतर दुपारी वेळ असायचा. मग कधी 'मूल' या तालुक्याच्या ठिकाणी फिरुन यायचो. तर कधी 'चंद्रपूर' या जिल्हाच्या ठिकाणी भटकंती व्हायची.

एके दिवशी दुपारचे जेवण आटोपून वामकुक्षी घ्यावी म्हणून मी बिछान्यावर लवंडलो होतो. झोप तर लागतच नव्हती. डोक्यात विचारांचे काहूर

माजलेलं. आज पुन्हा गावाकडून पत्र आले होते. मामेभाऊ आणि काही मित्रांनी मला पत्रे लिहिण्याचा जणू सपाटाच लावलेला. या सर्व पत्रांमुळे मी वैतागलो होतो. पण आत्तापर्यंत त्यांच्या कोणत्याचं पत्राचे उत्तर दिले नव्हते. मी निर्विकार होतो. पत्रातून त्यांनी केलेल्या भावनिक आवाहनांनी विचलित झालो नव्हतो की डळमळलोही नव्हतो. पण मनाची घुसमट मात्र होतं होती. या सर्व आप्तेष्टांचे पत्रातून एकच म्हणणे असायचे ते म्हणजे, 'तू प्रथम गावी ये आणि लग्न कर. नंतर तुला जिकडे जावेसे वाटेल तिकडे जा. तुला जसे जगावेसे वाटेल तसे जग. काहीही कर पण.... एकदा इकडे गावी ये.'

मी उलटा-सुलटा विचार करीत बिछान्यावर लोळत होतो. कुशी बदलत होतो पण झोप लागत नव्हती. झोपेऐवजी डोळ्यासमोर गावाकडील मित्रमंडळी, नातेवाईक, कुटुंबिय उभी राहत होती. त्यांच्या समोर मी जिद्दी, कणखर व्रतस्थ असा उभा ठाकलेला, माझा मलाच पाहत होतो.

....तितक्यात दारावर थाप पडली. मी लगबगीने उठलो. दारात माझ्यासोबत ओपीडीत काम करणारा नेताजी उभा होता. अरुणभाऊंचा निरोप घेऊन तो आला होता. 'अरुणभाऊ मेटॅडोर घेऊन हेमलकसाला निघाले आहेत. तुम्ही येणार आहात काय म्हणून त्यांनी विचारले आहे?'

'हो मी नक्की येईन. त्यांना थोडे थांबायला सांग' असे म्हणून मी नेताजीला पिटाळले. पटकन् फ्रेश होऊन कपडे चढवले. खूप दिवसांपासूनची माझी इच्छा लवकरच फलद्रूप होणार होती. मना प्रकाश आमटेंना भेटायचे होते.

१९७३ साली गडचिरोलीच्या घनदाट जंगलात हेमलकसा येथे लोकबिरादरी नावाचा प्रकल्प प्रकाशभाऊंनी सुरू केला होता. गडचिरोली जिल्हा हा एक नक्षलग्रस्त जिल्हा म्हणून ओळखला जातो. तसेच तो आदिवासींचा जिल्हा म्हणूनही महाराष्ट्रभर ओळखला जातो. या जिल्ह्यात भामरागड येथे इंद्रावती, गौतमी व पर्लकोटा अशा तीन नद्यांचा त्रिवेणी संगम आहे. याच त्रिवेणी संगमाच्या निसर्गरम्य परिसरात हेमलकसा प्रकल्प वसविण्यात आला आहे. 'लोकबिरादरी प्रकल्प' या नावाने तो ओळखला जातो. महाराष्ट्र, मध्यप्रदेश आणि आंध्रप्रदेश या तीन राज्यांच्या संयुक्त सीमेवर हा प्रकल्प मानवतेच्या उत्थापनासाठी कार्यरत आहे.

आम्ही सोमनाथहून ठिक चार वाजता एक मेटॅडोर घेऊन निघालो. गाडीच्या केबिनमध्ये अरूण कदम, ड्रायवर विठ्ठल, क्लिनर नंदू व मी असे चौघेजण बसलो होतो. गाडीच्या मागील हौदात तांदूळ व भाजीपाला भरून घेतला होता. जो हेमकलसा प्रकल्पासाठी हवा होता. मूलमार्गे आम्ही भरधाव निघालो आणि विनासायास दोन तासांनी नागेपल्ली या ठिकाणी पोहोचलो. आलापल्लीजवळ नागेपल्ली नावाचे एक गाव आहे. १९७५ साली बाबा आमटेंनी या ठिकाणी एक छोटासा प्रकल्प सुरू केला होता. हा प्रकल्प सुरू करण्याचे महत्वाचे कारण असे की, सोमनाथ ते हेमलकसा हे अंतर थोडे जास्त होते. ते साधारण २५० किमी इतके असावे. वास्तविक त्याकाळी हे अंतर खूपच जास्त होते. कारण त्याकाळी पक्के रस्ते असे नव्हतेच. जो रस्ता होता, तो संपूर्ण जंगलातून जाणार होता. पावसाळ्यात तर रस्त्यांची अवस्था खूपच दयनीय असायची. एका दिवसात हेमलकसा येथे पोहोचता येत नसे. अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तू हेमलकसा येथे पोहोचविणे वेळोवेळी अगत्याचे असे. कारण तो प्रकल्प नुकताच सुरू केला होता. तिथे सर्वच गोष्टींची वानवा होती. म्हणून नागेपल्ली प्रकल्प हा बेसकॅम्प म्हणून वापरायचा अशी बाबांची धारणा होती. नागेपल्लीला सर्व साधनसामग्री संग्रहित करायची आणि तेथून वेळोवेळी गरजेप्रमाणे हेमलकसा येथे पोहचती करायची. असा हेतू मनी धरून नागेपल्लीची स्थापना करण्यात आली होती. जगन मचकले नावाच्या एका अत्यंत आणि प्रामाणिक कष्टाळू कार्यकर्त्याने या प्रकल्पाच्या कामकाजाची जबाबदारी खूप सुरुवातीपासून पार पाडली आहे. अगदी तरूण वयात तो इथे आला होता. गेली कित्येक वर्षे तो राबत होता. ते केवळ समाज सेवेच्या उदात्त भावनेने, कसलीही अपेक्षा न ठेवता, आपले सारे आयुष्य त्याने या प्रकल्पासाठी अक्षरश: वाहिले आहे. असे कार्यकर्ते वेळोवेळी भेटत जाणे हे बाबांचे सौभाग्य होते. अशा समर्पित कार्यकर्त्यामुळेच तर बाबांचे कार्य उभा राहिले होते.

आता आम्ही विश्रांती व जेवणासाठी नागेपल्ली येथे आलो होतो. श्रीयुत जगन मचकले व त्यांच्या सौभाग्यवतींनी आमचे अगदी मनापासून हसतमुखाने स्वागत केले. आम्ही येणार आहोत याची कल्पना उभयतांना अगोदरच फोनवरून देण्यात आली होती. रात्रीचे जेवण आम्ही इथेच घेणार होतो. त्याप्रमाणे रात्री आठ वाजता आम्ही सर्वांनी जेवण उरकले. आणि थोडा वेळ थांबून पुढील

प्रवासास निघालो. हेमलकसा येथे आजच पोहोचायचे असे ठरविले होते. बाहेर पडलो तर आभाळ चांगलेचं दाटून आलेले. वीजांचा लखलखाट सुरू झालेला. दाटून आलेलं आभाळ केव्हा कोसळेल याचा काही नेम नव्हता. वीजांच्या सततच्या कडकडाटाने सर्वांच्याच पोटात भीतीचा गोळा उठलेला. प्रवासा दरम्यान पाऊस कोसळण्याची दाट शक्यता होती. तरीही आम्ही प्रस्थान ठेवलेचं.

आमचा ड्रायव्हर विठ्ठल मोठा धडाडीचा कार्यकर्ता होता. आताही त्याची स्टेअरिंगशी हातघाई चाललेली. केव्हा एकदाचे हेमलकसा येथे पोहोचतोय असे सर्वांना झालेले. संपूर्ण रस्ता जंगलातून जात होता. एकही वाहन येत-जात नव्हते. दोहों बाजूस किर्रर् झाडी होती. उंचचउंच टोलेजंग सागवानाची झाडे सर्वत्र विखुरलेली दिसत होती. या परिस्थितीत पाऊस तेवढा येवू नये असे गाडीतील सर्वांनाच वाटत होते. पण.... शेवटी व्हायचे ते झालेचं. अचानक धुवांधार पाऊस कोसळू लागला. रात्रीचे ९.३० वाजले होते. आमची गाडी सावकाश पुढे सरकत होती. रस्त्याचा वेध घेत होती. पावसाने तुफान बॅटिंग सुरू केली होती. पाच-दहा फूट अंतराच्या पुढील रस्ता दिसत नव्हता. विठ्ठल अस्वस्थ झाला होता. आपला सर्व अनुभव पणास लावून ड्रायव्हिंग करीत होता. पण थोड्याच वेळात समोरील रस्ताच दिसेनासा झाला. आता पाऊस सुपाने ओतत होता. नाइलाजास्तव आम्ही जागेवरच थांबलो. जंगलातल्या त्या रस्त्यावर साधे चिटपाखरूही दिसत नव्हते. संपूर्ण रस्ता निर्मनुष्य, निर्वाहन होता. जिथे एखाद-दुसरे वाहनही इकडून-तिकडे जात नव्हते तिथे रात्रीची वर्दळ ती कोठून दिसणार ? कारण हा संपूर्ण जंगल परिसर नक्षलवाद्यांचा इलाखा होता. इथे हुकूमत होती ती फक्त नक्षलवाद्यांचीचं ! गाडीतील सर्वजण गारठून गेलो होतो. मी तर बर्फचं झालो होतो ! भीतीने सर्वांचीचं गाळण उडालेली. माझ्या मनात भीतीने थैमान घातलेलं. नानाविध वाईट विचार मनात येवू लागले. अचानक झाडीतून बंदुका घेऊन नक्षलवादी येतील आणि सर्वांना बंदी बनवून जंगलात घेऊन जातील अशी भीती सातत्याने वाटू लागली. काळीज धडधडू लागलं. केबिनमध्ये माझ्या शेजारी विरप्पन बसला आहे, असा भास मधूनचं व्हायचा. छातीतील धडधड वाढायची. मी हळूच मान वळवून शेजारी पाहायचो तेव्हा बिनमिशीचे अरूणभाऊ बसलेले दिसायचे. मग जीवात जीव यायचा. उरातील धडधड कमी व्हायची. थोडे बरे वाटायचे. बऱ्याच वेळाने पाऊस कमी झाला आणि इकडे माझ्या मनातील कल्पनेचा खेळही !

साधारण तासाभराने पाऊस ओसरला. समोरील रस्ता आता दृष्टीक्षेपात येवू लागला. आम्ही पुढे निघालो. तोच् गाडी समोरून एक भला मोठा पिवळसर साप जाताना दिसला. अंगावर सर्रकन् काटा उभा राहिला. बापरे ! दैवाचा हा आणखी कसला संकेत होता कोणास ठाऊक? मनात उगीचचं विचार चमकून गेला. मन खुट्टू झालं. नैराश्येच्या ढगांनी पुन्हा गर्दी केली. आम्ही ज्या जंगलातून चाललेलो, त्याठिकाणी नक्षलवाद्यांचा प्रभाव लक्षणीय असला तरी आम्हांस मात्र त्यांचा कोणताही वाईट अनुभव आला नाही हे आमचे सुदैवचं म्हणायचे.

रस्त्याच्या दुतर्फा उंचच उंच झाडे दिसत होती. त्यापैकी बहुतांशी झाडे सागवान वृक्षाची होती. भारतात जे उच्च प्रतीचे सागवान लाकूड मिळते ते याच जंगलात मिळते. याची साक्ष आज पटत होती. इतकी मोठ-मोठाली सागवानाची झाडे आयुष्यात मी प्रथमच पाहात होतो. दोनशे-तीनशे वर्षे वय असणारी यातील बरीचशी झाडे इंग्रजांनी स्वातंत्र्यपूर्व काळात तोडून इंग्लंडला नेली होती. आजही इंग्लंडमधील काही घरातून जे उच्चप्रतीच्या सागवानाचे फर्निचर आढळते ते याच भागातल्या सागवान वृक्षाचे आहे. हे सर्व मला विकासभाऊंनी एकदा सहज गप्पांच्या ओघात सांगितले होते. खरेच त्याची साक्ष आज पटत होती. रात्री ठीक १२ वाजता आम्ही एकदाचे हेमलकसा येथे येऊन पोहोचलो. इथेही पाऊस सुरू झाला होता. लाईटचा पत्ता नव्हता. बॅटरीच्या उजेडात सर्वजण विश्रांतीगृहाकडे वळलो.

'भेटायला ये' असा निरोप घेऊन एकजण सकाळी सात वाजताच गेस्टरूमवर आला होता. बाबांचा निरोप होता. मला भेटायला ते उत्सुक होते. बाबा व साधनाताई दोघेही काही कामानिमित्त हेमलकसा येथे आठ दिवसांपूर्वीच आले होते. आम्ही सोमनाथहून रात्री येथे आलो आहोत, हे त्यांना समजले असावे. मी पटकन् आंघोळ वगैरे आटोपून त्यांना भेटावयास गेलो. प्रकाशभाऊंच्या घरातील व्हरांड्यात बाबा उभे होते. चेहरा काहीसा चिंताग्रस्त भासत होता. मी समोर जावून त्यांना नमस्कार केला. ते प्रसन्न हसले आणि माझ्या दंड धरून थेट प्रकाशभाऊंच्या स्वयंपाकघरात घेऊन गेले. तिथे एक डायनिंग टेबल होते. टेबलाभोवती काही मंडळी अगोदरपासूनच स्थानापन्न झाली होती. त्यात साधनाताई, प्रकाशभाऊ, मुलगा डॉ. दिगंत, मुलगी आरती असे सारेजण होते. बाबांनी मला एका खुर्चीवर बसविले. मी गोंधळून गेलो आणि मनातून थोडा

घाबरलोही. मला काहीच उमगेना. सर्वजण माझ्याकडेचं पाहत होते. माझ्याही नकळत मी सर्वांना नमस्कार केला. प्रकाशभाऊंच्या रूक्ष चेहऱ्यावर आता थोडे स्मित फुलले. साधनाताई कौतुकाने माझ्याकडे पाहत होत्या. त्यांनी माझी जुजबी चौकशी केली. आपुलकीचे चार शब्द ऐकविले. त्यामुळे बराच वेळ अंग चोरून बसलेला मी मग थोडा सैलावलो. आता सर्वांच्याच मनमोकळ्या गप्पा सुरू झाल्या होत्या. फारसे न बोलणारे प्रकाशभाऊंही दिलखुलास बोलू लागले. माझे नवखेपण आता गळून पडले होते. माझ्या शेजारील खुर्चीवर पाय ठेवून बाबा उभे होते. शांतपणे सर्वांचे बोलणे ऐकत होते. तितक्यात किचनमधून मंदाकिनी वहिनी नाष्टा घेऊन आल्या. माझ्याकडे पाहून हलकेसे स्मित केले. मीही त्यांना आदरपूर्वक नमस्कार केला. टेबलवर त्यांनी अगदी व्यवस्थित नाष्टा लावला. नाष्ट्याला गरमागरम पेपर डोसा होता. गेल्या कित्येक महिन्यात मी पेपर डोसा खाल्ला नव्हता. पण आज अनपेक्षित योग आला होता. मंदाकिनी वहिनी सर्वांना आग्रह करून नाष्टा खाऊ घालत होत्या. त्या टेबलापाशी मी मात्र खूपच संकोचलो होतो. कारण माझ्या अगदी निकट उभे राहून बाबांचा नाष्टा चाललेला आणि वारंवार मला वाढण्यासाठी ते मंदाकिनी वहिनींना बजावत होते. 'बाबा आमटेंच्या शेजारी बसून मी न्याहारी करतोय.' हा क्षणच 'फोटोजेनिक' होता. विसरता न येण्याजोगा हा क्षण मी स्वप्नातही कधी पाहिला नव्हता. बाबांच्या प्रेमळ, अगत्यशील पाहुणचाराने मी पुरता ओलाचिंब झालो होतो.अंगीकृत सामर्थ्याने अत्त्युच्च शिखरावर पोहोचलेल्या वैनतेयाने माझ्यासारख्या सामान्याला इतक्या सहजतेने आपलेसे करावे, खरेच मी भाग्यवान होतो ! स्वकर्तृत्वाने मोठी झालेली माणसे इतकी साधी आणि सहज असू शकतात यावर माझा विश्वासच बसत नव्हता.

न्याहरी आटोपून मी बाहेरील व्हरांडयात जावून बसलो असेन इतक्यात पाठोपाठ साधनाताई लगबगीने आल्या. माझ्या समोरील खुर्चीत येवून बसल्या. त्यांना मला काहीतरी सांगायचे असावे असेच वाटत होते. पण काय अन् कसे बोलावे असा गोंधळ त्यांच्या मनात चाललेला असावा. त्यांच्या गोंधळलेल्या चेहऱ्यावरुन ते दिसत होते. 'त्या काय बोलणार आहेत' याची मला प्रचंड उत्सुकता लागून राहिली होती. मी सावरुन बसलो. काही क्षण असेच स्तब्धतेत

गेले. त्यांनी सरळ विषयालाच हात घातला. सहजतेने गप्पा माराव्यात तशा त्या बोलत होत्या, -

"हे बघ प्रमोद, गेल्या पन्नास वर्षात बाबा कधीच बदलला नाही तो या वयात आता कसला बदलणार आहे ? उभ्या आयुष्यात त्याने देव कधी मानला नाही की पूजा-अर्चा, कर्मकांडे कधी केली नाहीत. तो या वयात आता कसली देवपूजा करणार ? त्याची देवावर बिल्कुल श्रद्धा नाही की, विश्वास नाही. फक्त स्वत:च्या कर्मावर त्याचा अतूट विश्वास आहे. पण हो, माझी मात्र देवावर नितांत श्रध्दा आहे बरं. मी दररोज न चुकता देवपूजा करीत असते. त्याशिवाय माझा दिवसचं सुरु होत नाही. मी कधीकधी बाबाला सांगते तेव्हा तो माझ्या देवपूजेसाठी फुले किंवा बेलाची पाने आणून देत असतो. आणि हो.... माझी देवपूजा सुरु असताना बाबा हात जोडून माझ्या शेजारी उभा राहतो, तो केवळ बायकोच्या इच्छेचा अनादर होऊ नये म्हणून, तेव्हा तू मात्र बाबाबद्दल विनाकारण गैरसमज करुन घेऊ नकोस बरं."

साधनाताईंच्या अशा अवचित बोलण्याने मी एकदम चपापलो. अरेच्चा, सहा महिन्यांपूर्वी बाबा आणि माझ्यात घडलेला प्रसंग यांना समजला तरी कसा? त्या वेळी बाबांना बेलाची पाने हवी होती. ती मी त्यांना आणून दिली होती. या घटनेस सहा महिन्यांचा कालावधी लोटला होता. मग साधनाताईंच्या तोंडी हा विषय कसा आला बरे? मी गहन विचारात गुंतलो. पण थोड्याच वेळात माझ्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. ती घटना मला आता चांगलीच स्मरत होती. त्यावेळी मी बाबांच्या नास्तिकतेविषयी प्रश्नचिन्ह उभे केले होते. सहजवृत्तीने त्यांना डिवचले होते. तेव्हाचा तो प्रसंग मी केव्हाच विसरुनही गेलो होतो. पण बाबांच्या मनावर त्याचा ओरखडा उमटला होता. ती घटना त्यांनी चांगलीच लक्षात ठेवली होती आणि आज योग्य वेळ येताच योग्य व्यक्तिमार्फत त्याचे उत्तरही दिले होते. त्या प्रसंगावेळीचं त्यांना मला उत्तर देता आले असते. परंतु त्यांनी अगदी कसोशीने संयम बाळगला होता. मला मात्र त्यांचे खूपचं नवल वाटत होते की, इतका महान माणूस पण माझ्या सारख्या एका सामान्य व्यक्तीचे मतही त्यांनी अत्यंत गांभीर्याने घेतले होते.

'बाबा आमटे' नावाच्या जनमानसातील अलांच्छित प्रतिमेला तडा जावू नये, चुकीचा संदेश लोकांपर्यंत पोहोचू नये आणि आपल्या कथनी आणि करणीत

फरक नाही, हे लोकांना समजावे म्हणून अगदी कसोशीने त्यांनी हा प्रयत्न केला होता. विचार करा, आजपर्यंतच्या आयुष्यात त्यांना क्षणोक्षणी किती दक्षता घ्यावी लागली असेल ? किती यातना, त्रास सहन करावा लागला असेल ? मनातील किती इच्छा, आकांक्षा, आवडी-निवडी यांचा 'होम' करावा लागला असेल ? खरेतरं याची कल्पनाच करवत नाही. बाबांसारखे लोक महान का असतात याचे उत्तर अशा कितीतरी लहान-सहान प्रसंगातून आपल्याला गवसतं आणि थेट काळजाला भिडतं ! धन्य ते बाबा - साधनाताई आणि धन्य-धन्य ते आमटे कुटुंबिय ! अस्सल समाजसेवा ही वाटते तितकी साधी-सोपी गोष्ट नाही. थोर लोकांना आपल्या आचार-विचारांत फारकत ठेवता येत नाही. त्यासाठी त्यांना सदैव दक्ष-जागृत राहावं लागतं. तत्वाने जीवन कंठणाऱ्यांना सदा तारेवरचीच कसरत करावी लागते. नाहीतर 'ऊस डोंगा परि रस नोहे डोंगा, काय भुललासी वरलिया रंगा' हे अनेकदा अनुभवासं येतं. वर्तमानपत्रात फोटो छापून यावा म्हणून चाललेल्या समाजसेवा ह्या पावसाळ्यात उगवणाऱ्या छत्र्याप्रमाणे ठरतात. पावसाचा रतीब संपताच त्या मान टाकतात. 'समाजसेवा म्हणजे फॅशन नव्हे' हे एव्हाना माझ्या चांगलेच ध्यानात आले होते !

थोड्या वेळाने हेमलकसा प्रकल्प पाहण्यासाठी म्हणून मी बाहेर पडलो. १९७३ साली 'लोकबिरादरी प्रकल्प' या नावाने तो सुरु करण्यात आला होता. 'माडीया गोंड' या आदिवासी जमातीच्या विकासासाठी हा प्रकल्प होता. गडचिरोलीच्या खोलवर दुर्गम जंगलात प्रकाशभाऊंनी हा प्रकल्प स्थापून अदिवासींच्या सेवाकार्यास मनोभावे सुरुवात केली होती. नागपूरच्या सरकारी मेडिकल कॉलेज मधून आपले एम.बी.बी.एस.चे शिक्षण पूर्ण करुन प्रकाशभाऊ व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. मंदाकिनी वहिनी हेमलकसाच्या जंगलात राहावयास आले होते. आपल्या शाश्वत भावी सुखासीन आयुष्याचा दोघांनीही त्याग केला होता. येथे एका लहानशा झोपडीत दोघे राहत होते. याच लहानशा झोपडीत एका बाजूला त्यांचा नवा संसार (!) सुरु होता आणि दुसरीकडे याच झोपडीत त्यांनी आपला पहिलावहिला दवाखाना सुरु केला होता.

आजच्या अत्याधुनिक प्रगत अशा मेडीकल विश्वात दिवसेंदिवस रोज नव्या गोष्टींची भर पडत आहे. प्रचंड गतीने विकास होत आहे. नवनवीन संशोधन होत आहे. नवीन यंत्र सामुग्री हाताशी येत आहे. कोणतीही शस्त्रक्रिया अगदी

विनासायास पार पाडता येते आहे. त्यासाठी अत्याधुनिक सुसज्ज अशी ऑपरेशन थिएटर्स उभी केली जात आहेत. जिथे जंतुसंसर्गास किंचितही वाव राहत नाही. त्यामुळे शस्त्रक्रियेच्या यशस्वीतेचा टक्का वाढला आहे. रुग्ण बरे होण्याचे प्रमाण वाढले आहे. आज कोणी मरतो म्हणाला तरी अत्याधुनिक यंत्रणा त्यांस मरु देत नाहीत. ही आज घडीची वास्तविकता आहे.(हॉस्पिटलमधील बिलाचा आकडा पाहून तो जिवंतपणीच मरतो ही गोष्ट अलहिदा !) विचार करा, १९७३ साली हाताशी अशी कोणतीही आधुनिक यंत्रसामुग्री किंवा सुसज्ज ऑपरेशन थिएटर नसतानाही प्रकाशभाऊंनी अनेक लहान-मोठ्या शस्त्रक्रिया आपल्या झोपडीत आणि उघड्यावर अंगणात पेशंटला गोणपाटावर बसवून पार पाडल्या आहेत ! सुरुवातीच्या काळात एखादे जरी अपयश आले असते तर त्यांना तेथून आपला गाशा गुंडाळावा लागला असता. पण अतिशय कौशल्याने आणि आपली विवेकबुद्धी जागृत ठेवून त्यांनी त्यात यश संपादले. विचार करा, एखादा रुग्ण उघड्या अंगणात गोणपाटावर (पोत्यावर) बसला किंवा झोपला आहे आणि त्याची सर्जरी सुरु आहे ! अशा दृश्याची आपणास गंमत वाटेल किंवा आज आपण त्याची कल्पनाही करु शकणार नाही. मात्र हे विदारक सत्य वास्तवात उतरविण्याचे कार्य प्रकाशभाऊंनी लिलया पेलले. त्यासाठी त्यांना अनेक अडीअडचणींचा सामना करावा लागला होता. आज हेमलकसा येथे एकूण चाळीस बेडचे सुसज्ज असे हॉस्पिटल उभे आहे. राज्यातील अनेक ठिकाणांहून येणाऱ्या व आपले ज्ञान आणि हस्तकौशल्य दान करणाऱ्या अनेक सेवाभावी तज्ञ डॉक्टरांच्या मदतीने इथे लहान-मोठ्या विविध शस्त्रक्रिया पार पाडल्या जात आहेत.

एकेकाळी हेमलकसा येथे जाण्यासाठी रस्ता नव्हता की प्रवासाची कोणतीही आधुनिक साधने नव्हती. पायी चालत जंगलातील पायवाट तुडवावी लागे. विजेचा तर प्रश्नच येत नव्हता. कोणत्याही आधुनिक सोयी- सुविधा तिथे नव्हत्या. आधुनिकतेचा वारा तिथे पोहचलेला नव्हता. सर्वत्र सर्वच गोष्टींची वानवा होती. प्रगत नागरी जीवनापासून हे लोक कित्येक कोस दूर होते. विकासाचा प्रकाश त्यांच्यापर्यंत पोहोचलाच नव्हता. तेथील जंगलात कित्येक अदिवासी असे होते की, ज्यांनी साखर कधी पाहिलेली नव्हती की, अंगभर कपडे घातलेला आधुनिक माणूस कधी पाहिलेला नव्हता. कपडे घातलेला माणूस कधी पाहिलेला की ते दूरवर जंगलात पळून जात. अशा टोकाच्या प्रतिकूल परिस्थितीत आयुष्य

कंठणाऱ्या आदिवासींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे म्हणजे काही सामान्य गोष्ट नक्कीच नव्हती. पण प्रकाशभाऊ व मंदाकिनी वहिनींनी हे धनुष्य उचलायचं ठरवलं आणि स्वत:चा संसार गुंडाळून समस्त आदिवासी बांधवांचा संसार मांडला आणि तो उभाही केला. प्रकाशभाऊंना पहिला मुलगा झाला त्यावेळी मंदाकिनी वहिनी बाळंतपणासाठी नागपूर येथे होत्या. आपल्याला मुलगा झाला आहे ही गोष्ट प्रकाशभाऊंना कळायला त्यावेळी तब्बल एक महिना लागला होता. म्हणजेच ते किती दुर्गम भागात काम करीत होते याची सहज कल्पना यावी. आपण आज विचारही करु शकणार नाही अशा अत्यंत टोकाच्या प्रतिकूल परिस्थीतीत गेली पस्तीस वर्षे अव्याहतपणे सर्वस्व झोकून त्यांनी जे काम उभं केलयं त्यास तोड नाही !

आदिवासी लोक म्हणजे जंगलचे अधिपतीच ! एकेकाळी जंगलचे राजे असणारे आदिवासी अजूनही अठराविश्व दारिद्र्यात खितपत पडले आहेत. अज्ञानाचा अंधार तर त्यांच्या पाचवीलाच पुजलेला आहे. अंधश्रद्धेची बात तर पुसायलाच नको. भयंकर अनाकलनीय अंधश्रद्धा जोपासणारा हा समाज प्रगत समाजापासून कोसोयोजने दूर आहे. परंपरागत आभूषणांसोबत कुपोषणाचे अलंकार सर्वांगावर मिरवित दिवस कंठणारे हे लोक पाहिले की, आपण नेमक्या कोणत्या जगात वावरत आहोत याचे भान सहजी सुटावे. आदिवासी समाजातील पुरुषांच्या कमरेला असलेच तर एखादे लंगोटीवजा छोटेसे वस्त्र नाहीतर संपूर्ण श्रीपाद वल्लभ.... अवस्था ! त्यांच्या स्त्रीयांचीही फारशी वेगळी अवस्था नाही. कमरेला टॉवेलसारखे गुंडाळलेले गुडघ्यापर्यंतचे लहानसे वस्त्र आणि वरती छातीचा भाग उघडाच. ब्लाऊज किंवा पोलके असला प्रकार तिथे नाही. त्यांचे दैनंदिन जीवन म्हणजे रोज पशु-पक्ष्यांची शिकार करणे आणि भाजून खाणे. सोबत कधी-कधी किंवा रोजच मोहाच्या फुलांपासून बनविलेली मोहाची दारु प्राशन करणे. शेती करणे, अन्न-धान्य पिकविणे असला प्रकार तिथे नाही. फारतर जंगलातून मिळणारी काही ठराविक फळे व फुले यावरच त्यांची गुजराण होते. त्यात कोणी एखादा आजारी पडलाच तर सोबतीला त्यांच्यातीलच एखाद्या मांत्रिकाच्या मंत्र-तंत्राचा आघोरी उपचार असे. हेच यांचं आयुष्य !

आदिवासींची भाषा म्हणजे माडीया भाषा ही केवळ आदिवासी समाजापुरतीच मर्यादीत आहे. या भाषेचीही एक गंमत आहे. ही केवळ बोलीभाषा

आहे. तिला लिपी नाही किंवा मराठी भाषेसारखी लिखित बाराखडी नाही. त्यामुळे लिहीणे-वाचणे, शाळा-शिक्षण वगैरैचा सुतराम संबंध नाही. माडीया भाषेचा मराठी भाषेशी दुरान्वयेही संबंध नाही. त्यामुळे मग इतरांनी त्यांच्याशी संवाद साधणे ही तर फारचं कठीण गोष्ट. अज्ञान, अंधश्रध्दा, गरीबी, भूक, रोगराई यांनी समृद्ध असलेला असा हा आदिवासी समाज ! या लोकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अजून किती काम करणे आवश्यक आहे हे त्याठिकाणी प्रत्यक्ष जावून पाहिल्यानंतरच लक्षात येते. डॉ. प्रकाश आणि डॉ. मंदाकिनी आमटे या जोडप्याने जेव्हा तिथे प्रत्यक्ष कामास सुरुवात केली असेल तेव्हा त्यांच्यापुढे किती गहन अडचणी उभ्या राहिल्या असतील याची कल्पनाच करवत नाही. आजही अथकपणे उभयता लढत आहेत. त्यांच्या अविश्रांत कष्टाला तोड नाही. खरेच एकमेवाद्‌वितीय असे त्यांचे कार्य आहे !

लोकबिरादरी प्रकल्पांतर्गत जे मुख्य रुग्णालय आहे त्याचे कामकाज प्रकाशभाऊ व मंदाकिनी वहिनींच्या मार्गदर्शन व देखरेखीखाली चालते. याठिकाणी दररोज सरासरी दीडशे ते दोनशे रुग्ण तपासणीसाठी येत असतात. त्यापैकी साधारण चाळीस ते पन्नास रुग्ण पुढील आवश्यक उपचारांसाठी ॲडमिट होत असतात. ॲडमिट झालेले रुग्ण अतिशय शांतपणे पुढील उपचार करुन घेत असतात. खरेतर निसर्गतःच आदिवासींची वेदना सहन करण्याची क्षमता खूप जास्त आहे. त्यामुळे उपचारादरम्यान ते कसलाही गोंधळ किंवा दंगा घालत नाहीत. पण केव्हातरी डोळ्यात, नाकात टाकावयाचे औषध पिऊन टाकतील किंवा सलाईनची बाटली तोंडास लावतील इतकेच ! डॉ. दिगंत म्हणजे प्रकाशभाऊंचा मुलगा यानेही सध्या एमबीबीएस चे शिक्षण पूर्ण केले आहे. आणि तो याच रुग्णालयात आदिवासींच्या सेवेत रुजू झालायं. यानिमित्ताने समाजसेवेचा वारसा आता तिसऱ्या पिढीपर्यंत पोहोचला आहे. बाबा आमटेंची तिसरी पिढी समाजकार्यात सक्रीय झाली आहे. समाजसेवेच्या क्षेत्रातील हे दुर्मिळ असेच उदाहरण ठरावे !

लोकबिरादरीचं रुग्णालय मी फिरुन पाहत होतो. त्यावेळी तिथे एका खोलीत औषधांचा बराचसा मोठा साठा जमा झालेला दिसत होता. एकाचवेळी इतकी औषधे कोठून आणली असावीत ? मनात उत्सुकता चाळवली म्हणून मी तेथीलच एकास विचारले. तेव्हा त्याने सांगितले की, ही औषधे कालच लातूरजवळील

किल्लारी या गावाहून आलेली आहेत. किल्लारी गावचे गावकरी ट्रकभर औषधे घेऊन आले होते. ही सर्व औषधे येथील गोरगरीब आदिवासी बांधवांसाठी मदत म्हणून त्यांनी पाठवली होती. आपणा सर्वांना काही वर्षांपूर्वीचा किल्लारी गावचा महाभयंकर भूकंप आठवत असेलच. त्यावेळी मोठा भूकंप होऊन सारी किल्लारी उद्ध्वस्त झाली होती. गावातील सगळी घरे जमीनदोस्त होऊन त्यात हजारो लोकांचा आणि जनावरांचा बळी गेला होता. निसर्गाने आपले आक्राळ-विक्राळ रुप दाखवून सर्वांना अगदी भयभीत करुन सोडलं होतं. त्या विध्वंसक घटनेत सारं होत्याचं नव्हतं झालं होतं. त्या घटनेवेळी सर्वस्व गमावलेल्या किल्लारी वासीयांच्या मदतीला बाबा व विकासभाऊ धावून गेले होते. आनंदवनवासीयांतर्फे त्यांच्यासाठी शेकडो मोफत घरे बांधून दिली होती. अत्यल्प वेळेत त्यांच्या निवाऱ्याची सोय केली होती. याकामी आनंदवनातील अनेक कुष्ठबांधवाचे मदतीचे हात लाभले होते ! खरेतर आनंदवन आणि किल्लारी येथील अभाग्यांच्या यातना, दुःख वेगेवेगळं होतं. मात्र वेदनेची जातकुळी एकच होती. त्यामुळेच तर वेदनेचं वेदनेशी नातं पटकन जुळलं गेलं ! भूकंपात उद्ध्वस्त झालेली मनं आणि घरं पुन्हा नव्याने उभी राहिली ! जेव्हा प्रकाशभाऊंच्या लोकबिरादरीला औषधांचा तुटवडा जाणवत आहे, ही बातमी किल्लारीवासीयांच्या पर्यंत पोहोचली तेव्हा त्यांनी तातडीने लोकवर्गणीतून लाखो रुपयांची औषधे मदत म्हणून पाठवून दिली. क्षणाचाही विलंब - विचार केला नाही. होय, आता माझ्या नजरे समोर होती ती हीच औषधे ! एकीकडे भूकंपात सारा गाव उद्ध्वस्त झाला आहे.... त्यातून स्वत:ला अजून पुरते सावरायचे आहे.... तरीही किल्लारीवासीयांनी कुष्ठबांधवांच्या उपकारांची जाणीव मनात जपली होती.... आणि वेळ येताच औषधरुपाने त्याची परतफेड केली होती. उपकाराचा पैरा फेडला होता. घासातील घास काढून दिला होता. एक वेदनाच दुसऱ्या वेदनेशी खरं नातं जोडू शकते, हेच खरं ! या निमित्ताने ते इथे पाहायला मिळाले.

दरम्यान डॉ. पांडुरंग पुंगारी याच्याशी ओळख झाली. त्याने मुंबईतून नुकतेच एम.बी.बी.एस.चे शिक्षण पूर्ण केले होते. पांडुरंग हा एका गरीब आदिवासी कुंटुंबातील प्रतिभावान मुलगा, भविष्याचा थांगपत्ता नसलेला. अत्यंत प्रतिकूल, हलाखीच्या परिस्थीतीत लहानाचा मोठा झालेला. अज्ञानाचा घट्ट काळोख सभोवती असताना एका 'प्रकाश' किरणाच्या निर्व्याज साहचर्याने त्याला नेमकी

वाट सापडली आणि तो शिकता झाला. रगडीता कण वाळुचे तेलही गळे.... बघता बघता दगडाचा देव बनला. आदिवासी समाजातील हा मुलगा जो पुढे चक्क एम.बी.बी.एस डॉक्टर झाला. सध्या तो भामरागड येथील आरोग्य केंद्रात आपल्या आदिवासी बांधवांच्या सेवेशी तत्पर आहे. डॉ. पांडुरंग हा आदिवासी समाजातील पहिला डॉक्टर होय.

विचार करा, असा एक समाज या पृथ्वीतलावर आहे की ज्याने साखर कधी पाहिलेली नाही, संपूर्ण कपड्यातील मनुष्य कधी पाहिलेला नाही, संपूर्ण कपड्यातील मनुष्य पाहून भीतीने तो जंगलात पळुन जातो, आधुनिक जगताचा साधा वाराही ज्याला स्पर्शिलेला नाही, अशा या समाजातील एक मुलगा एम.बी.बी.एस डॉक्टर बनतो, सरकारी नोकरी पटकावितो, खरेच हा फार मोठा चमत्कार मानावयास हवा ! हेमलकसा येथे प्रकाशभाऊ आणि मंदाकिनीवहिनींनी असा चमत्कार प्रत्यक्षात घडविला आहे. डॉ. पांडुरंग हे केवळ त्याचे एक प्रातिनिधिक उदाहरण आहे. प्रकाश आणि मंदाकिनी वहिनींच्या परिस्पर्शाने अनेक आदिवासी मुलांच्या आयुष्याचं सोनं झालं आहे ! होय, असाच एक मुलगा स्त्रीरोग तज्ञ (**MBBS-MD-Gynaecologist**) झालायं आणि नागपूरच्या मेडिकल कॉलेजमध्ये चक्क लेक्चरर म्हणून काम करतोय. काही मुले डॉक्टर्स तर काही वकील झाली आहेत. काही मुले पोलिस खात्यात तर काहीजण ग्रामसेवक वगैरे झाली आहेत. काहीजण विविध सरकारी खात्यातून सेवा बजावत आहेत. केवळ कथा-कादंबऱ्या किंवा चित्रपटांतून आढळून याव्यात अशाच या साऱ्या अगम्य घटना आहेत. पण खरेच इथे त्या सत्यात उतरल्या आहेत. आपल्या सुखासीन आयुष्याचा त्याग करणाऱ्या प्रकाशभाऊ,मंदाकिनीवहिनी आणि त्यांच्या जिगरबाज कार्यकर्त्यांमुळेच हे सर्व असाध्य ते साध्य झाले आहे ! अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत असा चमत्कार जिथे घडला आहे त्याठिकाणी किमान एकदातरी पालकांनी आपल्या मुलांना सोबत घेऊन भेट द्यावयास हवी. मुलांवरील संस्कारांचा नि:संशय हा एक भाग होऊ शकतो. पण आजकाल पालकांना एवढा वेळ असतोच कोठे ? आणि असलाच तर एखाद्या पर्यटन स्थळाची ट्रिप किंवा एखाद्या देवदर्शनाची ट्रिप नाहीतर पंढरीची वारी यापलिकडे त्यांची झेप काही जात नाही. जग झपाट्याने बदलतयं, चंगळवाद फोफावतोय. मुले नैराश्येच्या

गर्तेत ढकलली जात आहेत, अशा वेळी पालक म्हणून आम्ही आता अधिकच सजग राहावयास हवे. स्वत:ला परिस्थितीनुरुप बदलायला हवे.

डॉ. पांडुरंग पुंगारींचा निरोप घेऊन मी रुग्णालयाबाहेर पडलो. आता कोठे जावे, काय पाहावे याचा विचार करीत होतो. इतक्यात एका दिशेने मुलांचा फारच किलबिलाट ऐकू येवू लागला. माझी पावले आपसूक तिकडे वळली. आता मी तेथील शाळेच्या आवारात उभा होतो. माझ्यासमोर शाळेची आटोपशीर इमारत उभी होती. समोर मुलांना खेळण्यासाठी विस्तीर्ण पटांगण होते. शाळा भरगच्च होती. मुलांचा उत्साह ओसंडून वाहत होता. शेकडो मुले-मुली तिथे शिकत असल्याचा अंदाज येत होता. सृजनांचा उत्साह अगदी टिपेस पोहोचला होता. कानी पडणारा किलबिलाट आदिवासींच्या उज्वल भविष्याची जणू साक्षच देत होता ! मी पुढे होऊन सर्व शाळा फिरुन पाहिली. प्रत्येक वर्गातून मुले अगदी मन लावून शिकत होती. संधीचं सोनं करीत होती. उज्ज्वल भविष्याची प्रकाशवाट त्यांना गवसली होती. या सर्व मुलांच्या राहण्याची व्यवस्था तेथीलच स्वतंत्र वसतिगृहात करण्यात आलेली होती. शिक्षणाच्या खर्चाची तोशिष मुलांच्या गरीब पालकांना लागू नये याची पुरेपूर दक्षता घेण्यात आली होती. दोन वेळच्या जेवणाची जिथे मारामार तिथे शाळेसाठी, शिक्षणासाठी पैसा कोठून आणणार? लहानांपासून थोरांपर्यंत सर्वचजण अन्न मिळविण्याच्या शोधात दिवसभर जंगलात वणवण भटकणार. मग शाळेत कोण येणार ?

हेमलकशातील माडीया गोड आदिवासी हे सगळ्यात जास्त मागासलेले आहेत. इतर आदिवासी जमातींच्या तुलनेत ते प्रकर्षाने जाणवते. त्यामुळे त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे ही सहज-सोपी गोष्ट नक्कीच नव्हती. अत्यंत कर्मकठिण अशी गोष्ट होती. कारण त्यांची स्वत:ची अशी एक वेगळी संस्कृती आहे. जी ग्रामीण आणि नागर संस्कृतीपेक्षा खूपच भिन्न आहे. जगण्यासाठी, जिवित राहण्यासाठी संघर्ष करुन अन्न मिळविणं, एवढाचं त्यांच्या जीवनातला मतितार्थ आहे. शाळा-शिक्षण-ज्ञान या गोष्टींचा त्यांचा दैनंदिन जीवनाशी दुरान्वयेही संबंध नाही. त्यामुळे शिक्षण कशासाठी घ्यायचे याची जाणीव त्यांना असणे शक्यच नव्हते. याठिकाणी कमालीचे अज्ञान आणि अफाट दारिद्रय आहे. इथे शाळा सुरु करण्याचा मुख्य उद्देश होता तो म्हणजे आदिवासींना त्यांच्या गुलामीची आणि हक्कांची जाणीव करुन देणे. प्रचलित आयुष्यापेक्षा खूप चांगलं

आयुष्य जगता येवू शकतं याची जाणीव त्यांच्या ठायी निर्माण करणं. आणि हे सर्व कार्य केवळ शिक्षणाच्या माध्यमातूनच होऊ शकतं याची पुरेपूर जाणीव प्रकाशभाऊंना होती. या भागात आदिवासींची प्रचंड पिळवणूक होत होती. खरेतर आदिवासी हे येथील जंगलचे राजेचं ! परंतु पेपर मिलवाले व इतर व्यापाऱ्यांनी त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांना अक्षरश: गुलाम बनवून टाकलं होतं. त्यांची येथे प्रचंड पिळवणूक होत होती. वृक्षतोड, करणे, विडीसाठी तेंदूपत्ता गोळा करणे यासारख्या कामासाठी अत्यंत अल्प मोबदल्यात त्यांना प्रचंड राबवून घेतले जात होते. जंगलातील मेवा व्यापारी लोक मातीमोल किंमतीने लुबाडून नेत होते आणि या सर्व गोष्टींची जाणीव ह्या भोळ्या-भाबड्या, गरीब आदिवासींना अजिबातच नव्हती. आदिवासींच्या मुलांना शिक्षण दिल्यास त्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव होऊन पिळवणूक थांबेल अशी प्रकाशभाऊंची मनोमन कामना होती.

पण येथील लोकांची मातृभाषा 'माडीया', जी केवळ आदिवासी समाजापुरतीच मर्यादित आहे. माडीया भाषेव्यतिरिक्त या मुलांना इतर कोणतीही भाषा येत नव्हती. आता माडीया भाषेतून या मुलांना शिक्षण द्यायचे म्हणजे कर्मकठिण गोष्ट. कारण एकतरं या मुलांना केवळ माडीया भाषाच समजणार आणि शाळांतून प्रचलित सर्व अभ्यासक्रम हा प्रमाण मराठी भाषेत असणार. मग या आदिवासी मुलांना शिकवायचे तरी कसे? इकडे प्रकाशभाऊ आणि त्यांच्या सहकाऱ्यांना माडिया भाषा समजत नव्हती. आकलनापलिकडे होती आणि..... हीच खरी अवघड समस्या होती. पण प्रकाशभाऊ आणि त्यावेळच्या त्यांच्या सहकाऱ्यांनी यावर जालीम उपाय शोधला. या सर्वांनी अगोदर माडीया भाषा शिकून घेतली. उच्चार आणि भाषेचा लहेजा समजून घेतला. माडीया भाषेत सर्वजण प्रथम तरबेज झाले. याशिवाय त्यांनी अत्यंत महत्त्वाचे असे एक काम केले, आत्यंतिक कष्टाने 'माडीया-मराठी' शब्दकोष तयार केला ! तरीही हे काम तितके सोपे नव्हते. याऊपरांत त्यांच्या पुढे आणखी एक समस्या ठाण मांडुन उभी होती. शब्दकोश तयार झाल्यानंतर मुलांना शिकवायला सुरुवात केली खरी पण 'अ-आगगाडीचा' हे काही केल्या मुलांच्या डोक्यात शिरेना. कारण जिथे कपडे घातलेला माणूस कधी पाहण्यात नव्हता तिथे आगगाडीची काय कथा ? कोणाच्या बापाने इथे आगगाडी पाहिली होती. आदिवासींचा उर्वरीत जगाशी

संपर्कच नसल्याने 'अ-आगगाडीचा' हे त्यांना समजायचेच नाही. यावर उपाय म्हणून मग मुलांना त्यांच्याच भाषेतील, संस्कृतीतील, दैनंदिन जंगली व्यवहारातील उदाहरणे देऊन शिकवायला सुरुवात केली. याचा परिणाम मात्र चांगला झाला.

वास्तविक 'माडीया - मराठी' हा शब्दकोष तयार करणे आत्यंतिक कष्टाचे, क्लिष्ट आणि सहनशिलतेचा अंत पाहणारे काम होते. परंतु अथक परिश्रमाने शेवटी सर्वांनी मिळून तो गोवर्धन उचललाच. त्यांच्या या कष्टाचे फलित म्हणून अनेक आदिवासी मुले आज डॉक्टर, वकिल, शिक्षक, पोलिस, ग्रामसेवक वैगेरे बनुन समाजात ताठ मानेने जगत आहेत. केवळ आरोग्यसुविधा पुरवून आदिवासींचे जीवनमान उंचावणार नाही तर त्यासाठी शिक्षणाची ज्ञानगंगा त्यांच्यापर्यंत पोहोचवायला हवी हे प्रकाशभाऊ व बाबा आमटे ओळखून होते. आणि म्हणून शिक्षणाची वेळीच व्यवस्था करण्यात आली. आज प्रकाशभाऊंच्या या शाळेमुळे अवघ्या आदिवासींचे जीवनमानच बदलून गेलेयं. आजपावेतो त्यांनी भेदले आदिवासी समाज अज्ञानातील सुख भोगत होता, पण शिक्षणाच्या वज्रघाती अस्त्राने अज्ञानाचे दुष्टचक्र आहे. ज्ञानाचा अद्‌भुत 'प्रकाश' त्यांच्या अवरुद्‌ध जीवनात आता डोकावू लागलाय !

दुपारी जेवण झाल्यावर थोडी विश्रांती घेतली. फ्रेश झालो. क्लिनर नंदूला सोबत घेतले आणि जवळील एका आदिवासी खेड्यावर फिरायला गेलो. आदिवासींची घरे आणि त्यांचे एकंदरीत जीवनमान कसे असते याचे कुतुहल मनात होते. ते सर्व पाहण्याची उत्सुकता मनात साचून राहिली होती.

थोड्याच वेळात आम्ही दोघे एका आदिवासी खेड्यावर पोहोचलो. साधारण पंचवीस-तीस घरांचं ते एक छोटसं गाव होतं. पण दगड विटांनी बांधलेली पक्की घरे कोठे शोधूनही सापडत नव्हती. होती ती झाडाझुडपात लपलेली इवलीशी छोटी घरे. त्यांना घरे तर कशी म्हणावीत ? जंगली लाकुड फाट्याचा वापर करून उभारलेली ठिगळी- बुटकी खोपटीचं ती. या खोपट्यांचा छोटा समूह म्हणजे यांचं गाव. त्या एकाकी जंगली जीवनातील भयावहपणाला या खोपट्याचा तेवढाच एक मानसिक आधार ! आधुनिक सोयी-सुविधांचा साधा लवलेश तिथे नावालाही सापडत नव्हता. वीज-पाणी यांचीही वानवा होती. पक्के रस्ते तर सोडाच छोट्या सडकवाटाही धडश्या नव्हत्या. सगळीकडे केवळ पायवाटाच दिसत होत्या. एक

कसलीशी उदासीनता तिथल्या वातावरणात दाटलेली अनुभवास येत होती. मन खिन्न - उदासवाणं झालं. कसे जगत असतील हे लोक? काय भावना साचन राहिल्या असतील यांच्या मनात कोण जाणे? सुखाचा कवडसा तर त्यांना शोधूनही सापडत नसावा. आपल्याच विश्वात ते मशगुल दिसत होते. सभोवार होतं ते केवळ भयावह दारिद्रय, अज्ञान आणि सोबतीला जागोजागी लटकलेली अंधश्रध्दाळू मनांची चिंबुळली लक्तरं ! तिथल्या घराघरांतून अर्धनग्न स्त्री-पुरुष निवांतपणे बसलेले दिसत होते. भकास उदासवाण्या नजरेने शुन्यात पाहत होते. त्यांचं उभं आयुष्य शुन्यात बंदिस्त झालं होतं. इथे सगळेच जण खंगलेले. त्यांच्या दिसण्यावरून कोणीही त्यांच्या वयाचा अंदाजही बांधू शकणार नाही इतके ते खंगलेले. कुपोषण तर तिथे पाचवीलाच पुजलेलं होतं. त्यांच्या रोजच्या जेवणात खाणं काय तर भात, आंबील, कंदमुळे आणि जंगलातील मिळतील ते प्राणी-पक्षी आणि हो... सोबतीला वारूळ फोडून मिळविलेल्या मुंग्यांची चटणी !

मी आणि नंदू तिथे गेल्यावर ते सर्वजण आम्हांकडे अगदी कुतुहलाने पाहू लागले. त्यांच्यासाठी आम्ही जणू परग्रहावरूनच आलो होतो ! सर्वांच्या हालचाली टिपत आम्ही तसेच पुढे निघालो. तोच एका घराच्या अंगणात थोडी गर्दी दिसली. मी व नंदू जवळ गेलो. तर तिथे एका अविवाहीत मुलीच्या अंगात आलेले होते. ती मधूनच माडीया भाषेतील कसलसं गाणं गात होती. गाणं संपलं की मध्येच आरडाओरडा करी. त्यानंतर उठून शेजारील घरांच्या दारात जाऊन येई. बराच वेळ असा प्रकार सुरु होता. ती कसलं गाणं गात होती, आरडाओरडा करून काय सांगू इच्छित होती आणि शेजारील घरांसमोर वारंवार का जात होती हे आम्हांला काही केल्या उमगत नव्हते. मख्ख चेहऱ्यांनी समोर चाललेला प्रकार पाहत होतो. बराच वेळ त्यांचा हा कार्यक्रम सुरु होता. त्या मुली सोबत अजुनही तीन लहान मुली होत्या. त्यांच्या चेहऱ्यावर बालबोध निरागस भाव विलसत होते. या सर्वजणी आंधळ्या श्रध्देचं गाठोड डोईवर वागवून दारोदार फिरत होत्या. नि:संशय हा सर्व प्रकार त्यांच्या दृष्टिने खूप श्रद्धेचा, भावनेचा असाच होता. 'ही तुमची सगळी अंधश्रद्धा आहे' असे ठणकावून सांगण्याचा मोह मला त्यावेळी झाला खरा पण मी वेळीच सावरलो. नाहीतर अंगभर चेप निघाला असता अन् पळता भुई थोडी झाली असती. समोरील दृश्य पाहत आम्ही बराच वेळ उभे होतो. त्या सर्वजणी स्वत:तच मग्न झाल्या होत्या. परंपरागत श्रद्धा आणि साचत आलेल्या

अज्ञानाचा वारसा मनोभावे पूजीत होत्या. आपण हे सर्व सोपस्कार ज्या देवासाठी करतोय तोच देव आपल्या ललाटी वनवासी जीवन लादतोय, याचं भान त्या निरागसांना कोठून असणार ? बाह्य जगातील ज्ञानप्रकाश अद्यापी त्याच्यापर्यंत पोहचलाच नव्हता. कित्येक पिढ्यान् पिढ्या याचं अंध:काराच्या खाईत लोटल्या गेल्या होत्या. भविष्यात आणखी किती पिढ्यांची समीधा तीत पडणार होती, कोणास ठावे ?

आजूबाजूच्या जवळपास २०० किलोमीटर वर्ग परिसरात कोठेही वैद्यकीय सेवा उपलब्ध नाही. त्यामुळे सर्वच आजार अंगावर काढले जातात. किंवा मांत्रिकाचा सल्ला घेतला जातो. प्रकाशभाऊंचा दवाखाना त्याच्यासाठी फार मोठे वरदानच ठरला आहे. चित्र-विचित्र, नानाविध आजारांनी ग्रासलेले हरत-हेचे रुग्ण आता प्रकाशभाऊंच्या दवाखान्याकडे वळत आहेत. आधुनिक आरोग्यसेवेचे महत्व हळूहळू का होईना त्यांना आता पटू लागले आहे. सुरुवातीच्या काळात प्रकाश-भाऊंच्या दवाखान्याकडे कोणी येत नव्हते, कारण वर्षानुवर्षे चालत आलेल्या प्रथा, रिवाज ते मोडू शकत नव्हते. आजारी पडले की मांत्रिकाकडेच जायचे असा तिथला रिवाज होता. मांत्रिकाऐवजी दवाखान्यात गेलो तर दैवी कोप होईल याची भीती त्यांना प्रचंड प्रमाणावर होती. मांत्रिक हा त्याच्यातील एक मोठं प्रस्थ असे.

कुपोषण, कॉलरा, मलेरिया हे तेथील दादा रोग ! त्यांची नेहमीच तिथे ऊठबैस असे. मलेरियातही सेरेब्रल मलेरिया हा घातक जीवघेणा आजार आदिवासीमध्ये मोठ्या प्रमाणावर आढळतो. या सर्वांची दादागिरी सहन करीत लढत-झगडत आदिवासी कसाबसा या जंगलात जगत असतो.

कॉलराच्या भयावह साथीत गेलेल्या नवऱ्याचे दुःख पाठीवर टाकून पोटच्या दोन मुलांना घेवून उपचारासाठी धावणारी स्त्री प्रकाश- भाऊंच्या दवाखान्यात पोहचते तेव्हा हाती एकच मुल उरलेलं असतं. येताना जंगलातल्या वाटेवर एका मुलाचा बळी कॉलराने घेतलेला असतो. त्याचं पार्थिव झाडाच्या एका बुध्यांशी लपवून ती आलेली असते. हातातील दुसरा मुलगा थोडा ठिक होताच त्याला दवाखान्यात टाकून ती तशीच परत फिरते आणि झाडाखाली लपवून ठेवलेल्या पोटच्या गोळ्याला तिथेच मुठमाती देते. तेव्हा काय कालवाकालव झाली असेल तिच्या अंत:करणात ? अशी ही धीरोदात्त आधुनिक 'हिरकणी' सापडते ती याच आदिवासी खेड्या-पाड्यात. सहनशीलतेचा कडेलोट व्हावा इथे, पण तिचा ना आक्रोश, ना

डोळ्यात पाणी. वर्तमान वस्तूस्थिती स्वीकारण्याची स्थितप्रज्ञ प्रचंड सहनशक्ती इथल्या प्रत्येक आदिवासींच्या ठायी-ठायी भरलेली आहे !

जंगली प्राणी आणि आदिवासी लोक याच्यातील संघर्ष येथे नवीन नाही. दोहोंचा आदिवास एकच असल्याने संघर्ष अटळ असे. बरेचदा एखादा आदिवासी मोहाच्या झाडाची फुले गोळा करण्यासाठी खोलवर जंगलात जाई. याच फुलांपासून तिथे मोहाची दारू बनवली जाते. ही फुले जास्त प्रमाणावर खाल्ली तर एक प्रकारची धुंदी जाणवते. तर ही मोहाची फुले गोळा करण्यासाठी आदिवासी जंगलात जाई आणि फुले वेचण्यात मग्न होई. तेव्हा अचानक एखादे अस्वल पाठीमागुन गुपचुप येवून हल्ला चढवीत असे. मोह फुलांच्या गंधाने अस्वलेही या झाडाकडे आकर्षिक होत. तर कधीकधी भरपेट फुले खाल्लेले अस्वल धुंद होऊन आदिवासीवर हल्ला चढवी. अस्वलाच्या चाव्यानी आणि पंजाच्या नख्यांनी अत्यंत गंभीर, विद्रुप करणाऱ्या जखमा शरीरभर होत. कधीकधी डोक्याची संपूर्ण कवटी उघडी पडलेली जखम अंगणात गोणपाटावर बसून शांतपणे शिवताना प्रकाशभाऊंना अनेकांनी पाहिलं आहे. विशेष म्हणजे त्या जखमा शिवताना आदिवासी अतिशय शांतपणे बसून राहतात. त्यांना कोणतीही भूल दिलेली नसते. तोंडातून वेदनेचा हुंकार नाही की चेहऱ्यावर वेदनेची छटा नाही, की व्हिवळणे नाही. पराकोटीची सहनशिलता आदिवासींच्या ठायी निसर्गत:च दिसून येते. टाके घालताना होणाऱ्या वेदना कमी करण्यासाठी देण्यात येणारे xylocaine सारखे इंजेक्शन येथील आदिवासींच्या रक्तातच असावे जणू !

येथील हे सर्व वातावरण पाहिलं की धक्काच बसतो. मन विषण्ण, उदास होतं. खूप वाईट वाटतं. आदिवासीचं जंगली जीवन आपल्या प्रगत जीवनापेक्षा खूपचं वेगळं, विलक्षण आहे.

कपडे घातलेला आधुनिक माणूस किंवा साखर यांसारख्या गोष्टी ज्यांनी कधी पाहिलेल्या नाहीत, आंघोळीचा साबण म्हणजे खाण्याची वस्तूच समजणारा असा एक समाज आजही आपल्या देशात असावा यासारखे दुसरे वैषम्य ते काय? केवळ वाईट वाटून घेऊनही काही उपयोग नाही. त्यासाठी सातत्याने काही ठोस प्रयत्न जरुर करायला हवेत. आदिवासी हे आपलेच बांधव आहेत. ते काही परग्रहावरुन आलेले नाहीत ही भावना मनी रुजवावयास हवी. त्यांना सोबत घ्यायला हवे. आदिवासी आणि आधुनिक नागरजन यात जे महदंतर आहे ते

मिटविण्यासाठी अथक प्रयत्न करावयास हवेत. त्यासाठी आदिवासी-सोबत जावूनच राहावयास हवे असे कदापिही नाही येनकेन प्रकारे त्यांना बाहेरुनही मदत करता येवू शकते. फक्त यासाठी आपल्याकडे हवे संवेदनशील मन आणि प्रबळ इच्छाशक्ती ! आता अंधार खूप दाटून आला होता. दिवे लागणीची वेळ झाली होती. मी आणि नंदू झपाट्याने परत फिरलो आणि लोकबिरादरी प्रकल्पात आलो. रात्री बराच वेळ झोप लागली नाही. खोबणीत खोलवर गेलेले आदिवासींचे ते भकास डोळे खोलीतल्या अंधारात माझाच वेध घेतायेत, असा भास मला वारंवार होत होता.

सकाळी लवकर जाग आली. बाहेर अजुनही अंधार होता. तांबडे फुटण्यास अवकाश होता. मी उठलो आणि बाहेर फेरफटका मारावयास गेलो. या निसर्गरम्य परिसरातील भल्या सकाळचं वातावरण खूपच प्रसन्न अन् मन मोहवून टाकणारं होतं. येथील हवा अतिशय शुध्द होती. शहरातील हवेशी तुलना करता खूप फरक जाणवत होता. या हवेत मी तासभर फिरलो. मन प्रफुल्लीत झालं. कानी पडणारा पक्षांचा गुंजारव कोणत्याही संगीतापेक्षा श्रेष्ठ होता. मनसोक्त फिरुन परत आलो. मन अगदी फ्रेश झाले. नित्य सवय म्हणुन आंघोळ केली. सकाळची न्याहरी आटोपली. हाताशी भरपूर वेळ होता. मोबाईलचे फॅड यावेळेपर्यंत तरी आलेले नव्हते. काय करावे, वेळ कसा घालवावा या विचारात होतो. याच विचारात रुमला लॉक लावले अन् बाहेर पडलो. समोरच काही अंतरावर एक प्राणिसंग्रहालय दिसत होते. आपसुक माझी पावले तिकडे वळली. अनेक प्रकारच्या जंगली श्वापदांचे ते अनाथालय होते. त्यास अनाथालय म्हणण्याचे कारण म्हणजे हे सर्व प्राणी अनाथ झालेले होते. त्यांना कोणीही आप्तेष्ट उरला नव्हता. आईविना ते पोरके झाले होते. त्यांच्या कथाही अशाच हृदयद्रावक होत्या. या अनाथालयाची सुरुवात अशाच एका अचानक घडलेल्या प्रसंगामुळे झालेली होती. हेमलकसा प्रकल्प सुरु होऊन साधारण सहा महिने झाले असतील. एके सकाळी प्रकाश भाऊ व मंदाकिनी वहिनी फिरुन येत होते. तेव्हा जंगलातुन काही आदिवासी लोक शिकार करुन येताना दिसले. त्यातील दोघा आदिवासींनी एक काठी खांद्यावर पेलली होती. शिकार करुन मारलेली माकडे त्या काठीला टांगली होती. त्यापैकी एका माकडाच्या पोटाला एक लहान पिल्लू घट्ट बिलगुन बसले होते. आपली आई आता जिवंत नाही, हे त्या निरागस पिलाला माहीतच नव्हते. समोरील हे दृश्य

पाहुन उभयतांचे हृदय द्रवले. डोळ्यात पाणी उभे राहिले. त्यांनी ते पिल्लू सांभाळण्यासाठी म्हणून मागीतले, पण ते देण्यास आदिवासींनी नकार दिला. शेवटी 'धान्याच्या बदल्यात माकडाचे पिल्लू' देण्यास ते तयार झाले. प्रकाशभाऊनीं ते पिल्लू घरी आणुन सांभाळले. याच प्रसंगातुन पुढे अनाथालयाची सुरुवात झाली. एकेक करत येथे आता प्राण्यांचे गोकूळ उभे राहिले आहे.

आदिवासी लोकांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ते कधीही शेती करीत नसत. जम नीत नांगर घालुन बी-बियाणं पेरणं त्यातुन उगवलेलं धान्य उदरनिर्वाहासाठी खाणं हे त्यांच्या दृष्टीने पाप होतं. कारण जमीनीला ते आपल्या मातेसमान मानत. मातेवर नांगर कसा चालवायचा? असा त्यांचा भाबडा सवाल असे. त्यामुळे जमीन नांगरून शेती करणे हा उदरनिर्वाहाचा मार्ग त्यांच्यासाठी आपसूकच बंद होई. उदरनिर्वाहासाठी मग जंगलातील प्राण्यांची शिकार करणे हे ओघाने आलेच. वाघ, हरिण, माकड, मोर, उंदिर, साप, बेडूक, चिमण्या-कावळे असे सापडतील ते सर्व प्राणी, पक्षी त्यांच्यासाठी वर्ज्य नसत. त्यामुळे बरेचदा मारल्या गेलेल्या प्राण्यांची पिले अनाथ होतं. अशी अनाथ झालेली पिल्ले प्रकाशभाऊ भूतदयेपोटी दत्तक घेत. या बदल्यात ते आदिवासींना अन्न-धान्य देत असतं. यातूनच पुढे हा गोतावळा वाढत गेला आणि त्याचे रुपांतर प्राण्यांच्या अनाथालयात झाले. अनेकविध प्राण्या-पक्षांचे जणू तेगोकुळच बनले आहे. आपणांस कदाचित आश्चर्य वाटेल माकड, बिवट्या, मुंगुस असे एरव्ही एकमेकांचे शत्रू असणारे हे सर्व प्राणी इथे न भांडता एकत्रितपणे गुण्या-गोविंदाने राहतात. एकमेकांच्या सहवासात खेळतात- बागडतात आणि वाढतात. खरे तर या सर्वांना ऊब हवी असते ती फक्त प्रेमाची अन् मायेची !

सध्या या ठिकाणी एक सिंह, दोन बिबटे, दोन रानडुक्कर, एक अस्वल, काही नीलगायी, भेकर, कोल्हे, तरस, माकडे, मोर, घोरपड, खारूताई, मगरी तसेच अनेक जातीचे सर्प असे सर्वजण वास्तव्यास आहेत. सर्पासाठी वेगळी व्यवस्था आहे. मला अनोळखी असणारे अनेक प्राणी मी येथे पाहिले. नागापेक्षा कित्येक पटींनीं विषारी असणारा 'बँडेड क्रेट' साप था ठिकाणी वास्तव्यास आहे. हा साप आपल्याकडे सहसा सापडत नाही. त्याच्या एका चाव्यात एवढी शक्ती असते की, पूर्ण वाढ झालेला हत्ती सहज मरू शकतो. माणूस तर दवाखान्यापर्यंतही पोहचू शकत नाही. काही मिनीटांतच त्याचा जीव जातो. या विषावरचे ॲन्टीव्हेनम

प्रतिबंधक औषध हे जगाच्या पाठीवर केवळ थायलंड या देशातच मिळते. कारण तिकडे 'बँडेड क्रेट मुबलक प्रमाणात सापडतो.

'गोकुळ'चे सर्वेसर्वा प्रकाशभाऊ या प्राणी आणि सापांना अगदी लिलया हाताळत असतात. त्यांना दररोज लागणारे अन्न, मांस किंवा इतर छोटे प्राणी यांची उपलब्धतता करणे म्हणजे एक मोठेचं दिव्य असते. गडचिरोलीच्या मार्केटमधून मांस विकत आणणं आर्थिकदृष्ट्या परवडणारं नसतं. मग कोंबड्या, बेडूक, उंदीर यांच्यावरच काम भागवायचे किंवा मग आसपासच्या खेड्यापाड्यावर कोणाचा बैल, म्हैस, गाय यासारखा मोठा प्राणी कधी मरतोय याची वाट पाहायची. असा प्राणी मेला की प्रकाशभाऊ पर्यंत वर्दी यायची. मग तो प्राणी वाहनातून प्रकल्पावर घेऊन यायचे आणि स्वत:च त्याचे तुकडे करायचे. कोणताही भाग वाया घालवायचा नाही, अगदी चामडीसुद्धा ! अशा मोठ्या प्राण्याचे मांस मग काही दिवस पुरे. पण हे मांस जास्त दिवस टिकत नसे, लवकर खराब होई. मांस जास्त दिवस टिकावे म्हणून प्रकाशभाऊंनी रॉकेलवर चालणारा एक जुना फ्रिज कोठूनसा विकत आणला होता. जेव्हा हा फ्रिज मांसाने भरला जाई तेव्हा त्यातून रक्तमिश्रित पाणी सर्व घरभर पसरे आणि त्याचा उग्र दर्प घर भरून दरवळत असे. अशाच या दरवळणाऱ्या 'सुगंधी' वातावरणात प्रकाशभाऊ आणि मंदाकिनी वहिनींचा संसार सुरु असे. दोघेही जातीने ब्राम्हण, शुद्ध शाकाहारी पण तरीही त्यांनी हे सर्व कसे सहन केले असेल, याची कल्पनाच करवत नाही.

मी प्राणी संग्रहालयासमोर उभा होतो. थोडे पुढे जावून पाहिलं तर बाजूच्या कोपऱ्यात वनराजाचे भोजन सुरु होते. काही वर्षापूर्वी कोठूनसे एक सिंहाचे पिल्लू इथे आणले होते. तो आता पूर्ण वाढ झालेला वनराज होता. एका लोखंडी घमेल्यात साधारण पाच-सहा किलो मांसाचे तुकडे आणि त्यातच दूध ओतलेलं दिसत होतं. मजेत, जिभल्या चाटत हे वनराज त्यावर ताव मारीत होते ! त्याच पिंजऱ्यात एक बिबट्या आरामात बसला होता. त्याचे भोजन नुकतेच संपले असावे. समोर रिकामे घमेले दिसत होते. हाही असाच अनाथ होता. विलास मनोहर नावाचे गृहस्थ याच प्रकल्पावर काम करीत. ते बाबांचे मानस जावई. त्यांनी याच अनाथ बिबट्यावर 'नेगल' नावाचे एक छानसे पुस्तक लिहिले आहे.

ते खरोखरच वाचनीय आहे. माडिया भाषेत बिबट्याला 'नेगल' म्हणतात. जिज्ञासूंनी ते जरूर वाचावे.

आता दुपारचे बारा वाजले होते. सर्वांचीच जेवणे आटोपत आली होती. मीही जेवण उरकले. दुपारी विश्रांतीसाठी रुमकडे न जाता पुन्हा या अनाथालयाजवळ आलो. समोर पाहिले अन् मला धक्काच बसला. पिंजऱ्यात प्रकाशभाऊ वनराज आणि नेगलशी खेळत होते. तिघांचीही एकमेकांशी दंगामस्ती चाललेली. नेगलचे शेपूट धरून प्रकाशभाऊ त्याला ताकदीने उलटे ओढू पाहत होते. तोही थोडासा उलटा चालायचा अन् मध्येच थांबायचा. त्यालाही मजा येत असावी. हिंसेचा, आक्रमकतेचा साधा लवलेशही तिथे दिसत नव्हता. तक्रारीचा सूर अजिबात उमटत नव्हता. मला खूप आश्चर्य वाटत होते. दोन हिंस्त्र पशू इतक्या निकट असूनही ते प्रकाशभाऊंना काही इजा करत नव्हते. प्रकाशभाऊही अतिशय शांतपणे आणि तितक्याच सहजतेने त्यांच्याशी खेळत होते. मौजमस्ती करीत होते. जणू ते एकमेकांचे सवंगडीच असावेत ! थोड्या वेळाने प्रकाशभाऊंनी एक भला मोठा कंगवा हाती घेतला आणि ते सिंहाची आयाळ विंचरू लागले. त्यालाही खूप बरे वाटत असावे. लडिवाळपणे तो प्रकाशभाऊंना खूप वेळ चाटत राहिला. तितक्यात पाठीमागून नेगल हळूच आला आणि प्रकाशभाऊंच्या पाठीवर बसला. हे सर्व अविश्वसनीय दृश्य मी बाहेर उभा राहून डोळ्यात साठवित होतो. खरेतर समोर जे चालले होते त्यावर माझा विश्वासच बसत नव्हता. निरपेक्ष प्रेम कसं करावं, हे खरेतर प्राण्यांकडूनच शिकायला हवे. थोड्या वेळाने हा सर्व काफिला दुपारच्या स्नानासाठी नदीकडे निघाला. वनराज, नेगल, माकडे, कुत्री असा सर्व लवाजमा प्रकाशभाऊंनी आंघोळीसाठी बाहेर काढला होता. आता तो नदीकडे निवांतपणे रवाना होत होता. आपण खेड्यापाड्यातून पाहतो की, शेतकरी लोक आपली पाळीव जनावरे स्वच्छतेसाठी नदीवर किंवा पाणवठ्यावर घेऊन जात असतात. अगदी तंतोतंत तसेच अनाथालयातील ही सारी जत्रा सोबत घेऊन प्रकाशभाऊ नदीवर निघाले होते. आपणांस आश्चर्य वाटेल, यातील कोणत्याही श्वापदाला साखळदंड किंवा दोरखंड लावलेला नव्हता. तरीही सर्वजण अगदी शांतपणे नदीकडे मार्गक्रमण करीत होते. आपण नेहमी अनुभवतो की, कुत्रे कधीही माकडाला जवळ येवू देत नाही. कारण जन्मजात हाडवैर ! पण इथे मात्र

काही वेगळचं चित्र मी समोर पाहत होतो. एक माकडोबा चक्क कुत्र्याच्या पाठीवर बसून निवांतपणे हलत-डुलत आंघोळीसाठी चालले होते !

प्रकाशभाऊ नेहमी म्हणत, “आपण प्राण्यांवर मनापासून प्रेम केलं तर ते आपल्याला कधीही दगा देत नाहीत. या जगात सगळ्यात दगाबाज प्राणी कोणता असेल तर तो म्हणजे माणूस ! माणूस हा सगळ्यात बेभरवशाचा प्राणी !”

आपल्या सुखासिन आयुष्याच्या स्वप्नांना तिलांजली देऊन दुरच्या निबिड जंगलात आदिवासींच्या दुःखावर मायेची पाखर घालणारे जोडपे म्हणजे प्रकाश व मंदाकिनी आमटे. चोवीस तास डोक्यात वेड घेऊन काम करणारी आणि केवळ दुसऱ्याच्या सुखाचा, विकासाचा विचार करणारी ही जगावेगळी दोन विलक्षण माणसं ! पद, पैसा, प्रतिष्ठा याचा विसर त्यांना केव्हाचाच पडला आहे. त्यांनी मनात आणलं असतं तर एखाद्या मोठ्या शहरात टोलेजंग हॉस्पिटल बांधून खोऱ्याने पैसा कमावला असता. पण 15रण बसली. फणा काढून उभा राहीलेलं पाच-सहा फूटांचं ते धूड पाहून सर्वांची अक्षरशः बोबडी वळली. अन् एकच गोंधळ उडाला. जो-तो दरवाजाकडे सैरावैरा पळू लागला. जेवणाची ताटे विस्कटली गेली. समोर इतका गोंधळ उडूनही नागराजांनी आपली जागा काही सोडली नव्हती. तो तिथेच ठाण मांडून राहीला होता. आम्हां सर्वांची फजिती पाहत होता की काय कोणास ठावूक ? थोड्या वेळाने गलका कमी झाला. दाराबाहेरून, खिडकीतून जो-तो डोळे फाटेस्तोवर नागराजाकडे पाहत होता. पण पूढे यायचे कोणाचेच धाडस होत नव्हते. नागाला भोजनगृहाबाहेर काढावे कसे ? हा एकच प्रश्न तोवर माझ्या मनास छळू लागला होता. बराच वेळ झाला तरी नागराज काही केल्या तेथून निघायचे नावच घेईनात. मी चिंताग्रस्त झालो. पण अचानक कोण जाणे कसे मला कोठूनसे फूकाचे अवसान आले. सापाला कसे पकडतात ते पूर्वी कधीतरी मी टीव्हीवर पाहिले होते. मला ते ओझरते आठवत होते. त्याच आवेशात मी भान हरपून कडाडलो, “हरीभाऊ, एक काठी आणि रिकामे पोते लवकर घेऊन या. मी नागाला पकडतो." सर्वजण चमकले. माझ्याकडे पाहू लागले. सर्वांच्या नजरा आता माझ्यावर खिळल्या होत्या. मोठा विनोद घडावा तसे सर्वजण मला हसू लागले. डॉक्टर अन् साप पकडणार ? हा.s हा.s हा.s कुचेष्टेचे हसू माझ्या कानात काही घुसलेच नाही. कारण इकडे मी आपल्याच विचारात दंग होतो. 'काहीही करुन नागाला पकडायचेच' एवढा एकच विचार त्याक्षणी माझ्या मनात

घोळत होता. नागोबाच्या मानेवर काठी दाबायची अन् दुसऱ्या हाताने त्याला उचलून पोत्यात टाकायचे. फक्त कोणीतरी पोते धरायला हवे होते. सगळा बेत मी मनाशी पक्का केला होता. फक्त त्याबरहुकूम कृती करायची तेवढी बाकी होती. तितक्यात एक काठी आणि रिकामे पोते घेऊन हरीभाऊ धावतच आले. हरीभाऊंना नाग पकडण्याचा सर्व प्लॅन नीट समजावून सांगीतला. त्यांनी मान डोलावली. मी काठी हाती घेतली अन् पुढे सरसावलो. हरीभाऊंच्या हातात रिकामे पोते दिले. त्यांना माझ्या पाठोपाठ हळूवारपणे यायला सांगीतले. आता सर्वांची उत्सुकता शिगेला पोहचली होती. डॉक्टरबाबू नाग कसा पकडतोय हेच सगळ्यांना बघायचे होते. गोंधळ संपून चिडीचूप शांतता पसरली. पिनड्रॉप सायलेन्स् होता. सर्वांची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. मी व हरीभाऊ संथ गतीने नागराजांकडे सरकू लागलो. तिकडे नागराजही नजर रोखून आमचीच वाट पाहत होते जणू ! ये बेटा ये....कधीतरी मधूनच मान डोलावत होते. मोरपिसांच्या हळूवारपणे आम्ही पुढे सरकत होतो. पाच-सहा फूटांचे अंतर आता शिल्लक होते. प्रत्यक्षात कृती करण्याची वेळ आता आली होती. मनाशी ठरविल्या प्रमाणे सारे काही घडवून आणायचेचं, माझा निर्धार ठाम होता. शेवटची एकदा खात्री करावी म्हणून मी हरिभाऊंना हळूच साद घातली, 'हरिभाऊं तयार रहा बरं' पण पाठीमागून हरिभाऊंचा काहीच प्रतिसाद आला नाही. प्रतिसाद का देत नाहीत म्हणून मी मागे वळून पाहीले तर.... हरिभाऊ केव्हांचेचं गायब झाले होते !

आता मात्र मला खरोखरच घाम फूटला. अचानक धीर खचला. पायाखालची जमीन सरकली. फाशीचा दोर गळ्यात अडकवून पायाखालची फळी कोणीतरी काढून घेत आहे असेच वाटू लागले. समोर साक्षात यमराज उभे होते. आता मागे फिरावे तर इज्जतीचा फालूदा अन् पूढे सरकावे तर मरणाशी गाठ. अरे देवा, दुहेरी कैचीत सापडलो. नेमके काय करावे? काहीच समजत नव्हते. खूप कसोटीचा क्षण होता. तितक्यात नागाने फुत्कार टाकीत एक जोरदार फणा माझ्या पुढ्यात हाणला. तसे माझ्या संपूर्ण शरीरास लकवा मारल्यासारखे झाले. नागोबाचा फुत्कार आणि उग्र अवतार पाहून हातातील काठी जमीनीवर केव्हां गळून पडली ते. माझे मला सुध्दा कळले नाही. घामाने चिंब भिजलो होतो अन् जागेवरच थबकलो होतो. पाठीमागून कार्यकर्त्यांचा आवाज काही केल्या थांबेना. नुसता जल्लोष मांडला होता. 'डॉक्टर व्हा पुढे धरा, सावज टप्यात आहे.' एकच

जल्लोष ! पण... कशाचं धरतोय ? धरलं तर चावतंयं अन् सोडलं तरं अब्रुचं खोबरं होतयं, अशी अवस्था झालेली. कोण कोणाचं सावज ? हेच आता कळेनासं झालं होतं. स्थानबध्दतेची शिक्षा झालेल्या कैद्यासारखा मी जागेवरचं स्तब्ध होतो. बराच वेळ आम्ही एकमेकांच्या डोळ्यात पाहत होतो. लकवा मारलेल्या रुग्णागत माझी अवस्था झाली होती. शेवटी नागोबाला माझी दया आली असावी. बिचारा आल्या पावली परत फिरला अन् कोपऱ्यातील छोट्याश्या मोरीत अंतर्धान पावला. माझ्या ईज्जतीचा कचरा होता होता राहिला. अखेर त्याने माझी ईज्जत राखली होती.

सोमनाथला मी राहायचो त्या माझ्या निवास स्थानाशेजारी एक छोटसं प्राणीसंग्रहालय होतं. तिथे दोन बिबटे, एक अस्वल, एक तरस, चार नीलगायी, चार सांबर, दोन मगर व काही माकडे पाळली होती. दिवसातील थोडा वेळ तरी मी न चुकता तिथे जात असे. प्राण्यांच्या हालचाली, गमती-जमती टिपत असे. माकडांच्या तर खूपच करामती चालायच्या. निखळ करमणूक व्हायची. भान विसरायला व्हायचे. मग उरला दिवस अगदी मजेत जायचा.

एका रविवारी सकाळी मी माझ्या खोली बाहेर उभा होतो. साधारणत: सकाळचे नऊ वाजले असावेत. कोण जाणे कसे अचानक एक सांबर प्राणी संग्रहालयातून मुक्त होवून रस्त्यावर आले आणि व्हायला नको तेच घडले. तिथे उपस्थित सर्व श्वान मंडळी त्याच्यावर धावा बोलून गेली. जीव वाचविण्यासाठी सांबर वाट दिसेल तिकडे सैरावैरा धावू लागले.धावता-धावता त्याचा पाय झुडपाआड असणाऱ्या तारेच्या कुंपणामध्ये पुरता अडकला. तोवर कुत्र्यांनी त्याच्यावर एकच हल्लाबोल केला. जीवाच्या आकांताने सांबर ओरडू लागले.कुतरओड सुरु झाली. कुत्र्यांनी लचके तोडायला सुरुवात केली. आपुलेची मरण पाहिले म्याडोळा...जीवन-मरणातील रेषा पुसट होत चालली. जीव वाचविण्यासाठी सांबर धडपडू लागले. समोरील दृश्य पाहून क्षणाचाही विलंब न लावता मी व तेथीलच एक जण विजेच्या चपळाईने तिकडे धावलो. जीवाच्या आकांताने ओरडणाऱ्या सांबराला कुत्र्यांच्या सावटाखालून मुक्त केले. पण तोवर थोडा उशीरच झाला होता. सांबराचा पुढील एक पाय लोंबकळू लागला होता. तो लोंबता पाय पाहून माझ्या मनात पराकोटीचा संताप, चीड, हतबलता, दया, क्षमा, शांती या भावनांचा विविध कल्लोळ एकाच वेळी माजला. धर्म-अधर्म, अस्तिक-

नास्तिक डोक्याचा पार भुगा झाला. स्वत:ला सावरून मित्रांच्या मदतीने सांबराला उचलले आणि पिंजऱ्यात आणून संरक्षित केले.

वास्तविक त्याला आता उपचारांची अहम गरज होती आणि मी जनावरांचा डॉक्टर नव्हतो. जवळपास जनावरांचा डॉक्टर उपलब्ध असण्याची शक्यता जवळपास नव्हतीच. माझ्या बालपणी खेडेगावातून मी पाहत आलो होतो की, कोणाचा हात-पाय फ्रॅक्चर झाला तर गावातीलच एखादा वैदू बांबूच्या कामट्यांनी फ्रॅक्चर झालेल्या ठिकाणी आधार देवून बांधायचा आणि त्यात एक मोरपंख खोचायचा. त्याकाळी खेड्यापाड्यातून चांगले डॉक्टर्स उपलब्ध नसायचे आणि शहरातील डॉक्टरांची फी परवडायची नाही म्हणून मग असे वैदू उपचार केले जात. मीही इथे हाच मार्ग अवलंबिण्याचे ठरविले. जुन्या बांबूच्या कामट्या काढल्या आणि कुष्ठबांधवांच्या मदतीने सांबराचा लोंबकळणारा पाय घट्ट बांधून ठेवला. कामट्यांनी पाय बांधल्यामुळे सांबर जागेवरच पडून राहिलं आणि यथावकाश का होईना फ्रॅक्चर जुळेल, असा माझा कयास होता.

पण...सकाळी उठून पाहतो तो काय मोडलेल्या पायावर भार टाकून सांबरदादा चक्क चालू लागले होते. मला वाईट वाटले. माझा अपेक्षाभंग झाला होता. खरेतर सांबराने इतक्या लवकर चालावे याची मला बिलकुल अपेक्षा नव्हती. समोर सर्व अनपेक्षित घडत होते. घेतलेले कष्ट वाया जाणार होते. सांबराचा पाय आता बरा होणार नाही हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ होते. मी बैचेन झालो. पुढे तीन-चार दिवसांनी पाहिले तर फ्रॅक्चरच्या जागची हाडे चामडी फाडून बाहेर डोकावत होती. तेथील जखम चिघळली होती. त्यातून खूप उग्र दर्प येत होता. पू ठिबकत होता. पिंजऱ्याच्या एका कोपऱ्यात मलूल झालेले सांबर धापा टाकत बसले होते. पुढ्यात चारा तसाच पडलेला दिसत होता. चारा आणि पाणी त्याने वर्ज्य केले होते. मरणाच्या दिशेने त्याचा प्रवास सुरु झाला होता. मरण निश्चित होते, अटळ होते. मला आतून या गोष्टीची जाणीव झाली. मी पुन्हा बैचेन झालो. काय करावे ते काहीच सुचत नव्हते. जनावरांचा डॉक्टरही आसपास कोठे उपलब्ध नव्हता.

शेवटी अपरिहार्यपणे मनाचा ठाम निश्चय करून मी एक निर्णय घेतला. सांबराचा पाय आता धडावेगळा करायला हवा होता. त्याशिवाय त्याचा जीव वाचणार नव्हता. मी भूलीचे इंजेक्शन भरले. फ्रॅक्चरच्या जागी देण्यासाठी गेलो पण सांबराने प्रचंड धडपड केली. काही केल्या इंजेक्शन देता येईना. सगळे प्रयत्न

वाया गेले. शेवटी नाइलाज झाला. मग इतरांच्या मदतीने सांबराला जमीनीवर आडवे केले अन् त्याचा पाय लाकडाच्या एका ओंडक्यावर धरून ठेवला. धार लावलेला कोयता मी उजव्या हातात घेतला. कोयता आणि मन खूप जड भासू लागले. काही केल्या इच्छा होईना. मनाची द्विधा अवस्था होऊ लागली. पण पुढच्याच क्षणी... विद्युवेगाने कोयता खाली आला अन् गरम रक्ताची एक चिळकांडी माझ्या चेहऱ्यावर उडाली. मी डोळे गच्च मिटले. जीवाच्या आकांताने सांबर धडपडत होते. सर्वांच्या तावडीतून सुटू पाहत होते. पण पळणार कसे ? त्याचा पाय आता धडावेगळा झाला होता. 'लेग पीस' पाहून मी शहारलो. कपडे रक्ताने माखले होते. मी डॉक्टर की यमदूत मन बधीर झाले. सांबराने प्रचंड आकांडतांडव मांडला होता. सर्वांच्या तावडीतून ते सुटू पाहत होते. त्याही परिस्थितीत भळभळती जखम मी बँडेजने अगदी घट्ट बांधली आणि प्रथम रक्तस्त्राव थांबविला. अँटिबायोटिकचे इंजेक्शन टोचले. पुढे काही दिवस ते सुरुच ठेवले. वेदनाशामक गोळ्या पूड करून पाजल्या. अन्... आश्चर्य म्हणजे काही दिवसानंतर पायाची जखम पूर्णत: बरी झाली. तो आता हिंडु-फिरु लागला. भले अपंग ही सही पण त्याचा जीव वाचला होता.

खरेतरं 'डॉक्टर आणि कोयता' हे समीकरण कोणालाही न रूचणारं आहे. कोयता काय किंवा सुरा काय तो खाटिकाच्या हातातचं शोभून दिसतो खरा. पण आजकाल डॉक्टर आणि खाटीक यांच्यात व्यवसायाची अदलाबदल झालीय की काय अशी शंका यावी इतपत वातावरण बदललेलं आहे. आमच्या पैकी काही डॉक्टर मंडळींनी हाती सुरा पकडण्याचे कौशल्य इतके अफाट कमावलयं की, मानेवर सुरा फिरवला गेलाय याचा थांगपत्ता खुद्द त्या पेशंटलाही लागत नाही ! काहींना माझ्या या विधानाचा राग येईल, ते स्वाभाविकच आहे. तरीही त्यांचे शिव्याशाप स्वीकारून मी, मंगला गोडबोले व डॉ. वैजयंती खानविलकर यांच्या 'वयात येताना' या पुस्तकातील काही भाग याठिकाणी उधृक्त करू इच्छितो -

“जास्त पैसा मिळवून देणारं काम जास्त मोलाचं नव्हे. तसंच बुद्धिचं काम कुठल्याही शारीरिक कष्टाच्या कामापेक्षा वरच्या दर्जाचंच मानावं असंही नव्हे. 'बुद्धिचं काम करतो' असं म्हणणाऱ्या माणसामध्ये एक प्रकारचा अहंकार असतो. आपण आलतू फालतू कामं करीत नाही. फक्त बुद्धीचीचं कामं करतो असं त्याला सुचवायचं असतं. पण बारा महिने, तेरा काळ खरोखरीनं बुद्धीचा

कस लावणारी, आव्हान देणारी कामं किती असतात? तर फारच थोडी असतात. उदाहरणार्थ, एखादी हुशार मुलगी डॉक्टर होते. डॉक्टरीचा अभ्यास करताना तिला बुद्धी वापरावी लागते हे तर उघडच आहे. तिचा अभ्यासक्रम मोठ्या मुदतीचा असतो. तिला फार वाचन करावं लागतं, स्मरणशक्तीवर खूप भर द्यावा लागतो. पण हे सगळं कधी ? तर एकदा डॉक्टरची पदवी किंवा सनद मिळवेपर्यंत. त्यानंतर वर्षानुवर्षे दवाखान्यात बसून, रोग्यांना तपासताना तिला क्षणोक्षणी बुद्धी पणाला लावावी लागत नसते. पुष्कळसं निदान ती अनुभवानं करते, औषधे सरावानं देते, रोगी बरेही होतात. क्वचित कधी एखादी फार गुंतागुंतीची केस आली, तरच तिला बुद्धीची कसोटी घ्यावी लागते. आणि हे केवळ डॉक्टरी बाबतच नव्हे, तर कुठलाच व्यवसाय हा अष्टौप्रहर बुद्धी झिजवणारा व्यवसाय असत नाही. नाहीतर माणसं तो करूच शकली नसती. सुरूवातीला बुद्धी वापरुन एका किमान पातळीवर आल्यानंतर बहुतेक व्यवसाय चाकोरीतले, तोचतोचपणा असलेले, ठोकताळ्यांवर आधारलेले किंवा पुढे चक्क कंटाळवाणेही होऊ शकतात. बुद्धी लागते ती त्यातल्या कंटाळवाणेपणावर मात करण्यासाठी ! त्यातल्या त्यात नावीन्य आणण्यासाठी."

बुद्धीच्या कामाबद्दलचा हा भ्रम आपल्याकडे अगदी सार्वत्रिक आहे.

आता याठिकाणी उन्हाळा सुरु झाला होता. उन्हाच्या झळा वाढत होत्या. जीवाची घालमेल होत होती.विदर्भ,नागपूरकडे उन्हाळा प्रचंड असतो. अगदी ४७-४८ अंश सेंटिग्रेड पर्यंत तापमान जाऊन पोहोचतं. अशा वातावरणात राहण्याची मला कधीच सवय नव्हती. कारण पश्चिम महाराष्ट्रात उन्हाळ्यातील तापमान फारतर ४०- ४१ अंशापर्यंत पोहचतं. उन्हाळा सुरू होताच इथे अनेकजण सफेद कापड संपूर्ण डोके आणि चेहऱ्याला गुंडाळून फिरतात. मलातर ते कोणी अतिरेकीच भासत. यापूर्वी असा प्रकार मी केव्हाच पाहिला नव्हता. एके दिवशी अरूणभाऊंना मी त्याबाबत विचारलं, तेव्हा ते म्हणाले डोके व चेहरा बांधल्यामुळे जास्त उष्णता जाणवत नाही. पण मला नवल वाटले. कारण डोके, चेहरा संपूर्ण बांधल्यामुळे उष्णतेपासून बचाव कसा काय बरे होत असावा ?

बाहेर कडक वैदेर्भीय ऊन असल्यामुळे कोठे जाणे व्हायचे नाही. मी दिवसभर माझ्या खोलीतच पडून राहायचो. कोळश्याच्या भट्टीत टाकल्यासारखी अवस्था व्हायची. दिवसातून अगदी दोन-तीन वेळा थंड पाण्याने स्नान करूनही काही एक

फायदा व्हायचा नाही. उलट जास्तच उकाडा जाणवायचा. पंख्याचा वाराही असहाय्य व्हायचा. उकळत्या पाण्याच्या वाफा अंगावर घेतल्यासारखे व्हायचे. याच कारणाने विदर्भात अगदी झोपडीतही कुलर सुरू असल्याचे आढळते. माझ्या खोलीत कुलरची व्यवस्था केलेली नव्हती. प्रचंड उकाड्यामुळे दुपारी अस्वस्थ व्हायला व्हायचे. झोप लागायची नाही. जीव अगदी हैराण व्हायचा. यावर मी एक नामी उपाय शोधला. माझ्या खोलीजवळ बाथरूम खूप मोठ्या आकाराचे होते. तसे इथे प्रत्येक निवासस्थानी मोठे बाथरूम असायचे. आनंदवन, सोमनाथला येणाऱ्या पाहुण्यांसाठी बाबांनी मोठ्या आकाराची स्नानगृहे बांधून घेतली होती. दर दिवशी दुपारी संपूर्ण कपड्यानिशी मी बाथरूममध्ये जायचो. थंड पाण्याची बादली डोक्यावर ओतून घ्यायचो आणि ओल्या कपड्यानिशी बाथरूममध्येच झोपायचो. तासाभराने कपडे पूर्णतः वाळायचे. मग मी पुन्हा तोच प्रयोग करीत असे. त्यामुळे उष्णतेची दाहकता कमी जाणवायची. संपूर्ण उन्हाळा मी तिथे अशाप्रकारे सुसह्य केला.

माझ्या खोलीच्या मागील बाजूस आंब्याचे एक डेरेदार झाड होते. मध्यम आकाराचे झाड सदैव भरगच्च हिरवे असायचे. घनदाट गर्द सावली पडायची. उन्हाळ्यात ही सावली वाळवंटातल्या मरुवनाची (ओऍसिसची) आठवण करून द्यायची. सभोवती सूर्य आग ओकत असला तरी या झाडापाशी त्यांचे काही एक चालायचे नाही. आंब्याखाली छानसा थंडावा असायचा. एकदा कडक रखरखत्या दोपहर प्रहरी मी कधीही न पाहिलेले असे एक मनोहारी दृश्य त्या झाडाखाली पाहिले. असे दृश्य यापूर्वी मी कधीही पाहिले नव्हते. त्या डेरेदार वृक्षाच्या सावलीत अनेकविध जातीचे पक्षी एकत्र बसले होते. त्यात कावळे, चिमण्या, सांळुख्या, टिटवी आदि वेगवेगळ्या जातीचे पक्षी होते. सारेजण कोणताही किलबिलाट, भांडण वगैरे न करता शांतपणे एकमेकांना खेटून बसले होते. एरव्ही मात्र ते असे कधीही बसले नसते. समस्त मानव जातीला प्रेरणादायी ठरावे असेच नितांत सुंदर दृश्य होते ते. एखादी राष्ट्रीय आपत्ती यावी अन् आपापसातले सर्व मतभेद, तंटे-बखेडे विसरून विविध जाती-धर्माचे लोक एकत्र यावेत अगदी तसेच लोभसवाणे दृश्य होते ते ! सध्या जागतिक तापमान वाढीचा विषय ऐरणीवर आहे. लोकांनी हा विषय किती गांभीर्याने घेतला आहे ठावूक नाही. मात्र पक्षांनी

तो खूपच गांभीर्याने घेतलला असावा असेच मला वाटत होते. 'ग्लोबल वॉर्मिंग' या विषयावर ती सर्वपक्षीय चिंतन बैठकच भरलेली होती जणू !

सोमनाथ प्रकल्पातील काही जुने-जाणते लोक सांगत, एके वर्षी येथील तापमान ४८ अंश सेंटिग्रेडवर पोहचले होते. हवेतून उडताना अनेक पक्षी अचानक जमीनीवर पडत अन् गतप्राण होत. प्रचंड उष्णता आणि पाण्याविना पक्षी तडफडून मरत होते. करूणाघन बाबांना हे दृश्य पाहवले नाही. त्यांचे मन हळहळले. ताटासारख्या पसरट भांड्यातून पाणी भरून ती बाहेर अंगणात ठेवायला बाबांनी सर्वांना फर्मानच काढले. केवळ कुष्ठरोग्याबद्दलच नव्हे तर पशू-पक्ष्या बद्दलही त्यांच्या मनात अपार दयाभाव वसला होता. ते जितके तामसी, तितकेच संवेदनशील, दयाळू मनाचे होते.

२७ मार्च दुपारी सिलीगुडी (प.बंगाल) येथून तानाजीला फोन आला. तानाजी माझा बालपणीचा मित्र. अकरावीत असतानाच सैन्यात दाखल झाला होता. सध्या त्याचे सिलिगुडी येथे पोस्टिंग झाले होते. मे महिन्यात सुट्टीसाठी तो गावी जाणार होता. जाता- जाता मला भेटण्यासाठी सोमनाथला यायचे ठरवत होता. त्याला दोन महिन्यांची सुट्टी भेटणार होती. तानाजीसोबत माझा नित्य पत्रव्यवहार असायचा. पण खूप वर्षांनी आम्ही भेटणार होतो. मला खूप आनंद झाला. यापूर्वी त्याला मी कोकणातील दवाखाना बंद करून बाबा आमटेंकडे जात आहे असे पत्रातून कळविले होते. सोमनाथला तो मुद्दामच वाट वाकडी करून येणार होता. कदाचित प्रमोदने संन्यास तर घेतला नाही ना? अशी शंका त्यास आली होती. नेमक्या दिवशी तो बिनचूक आला. त्याला घेण्यासाठी मी मूलला गेलो. मला पाहताच त्याचे डोळे पाणावले. तो काहीच बोलला नाही. चेहऱ्यावर स्पष्ट नाराजी उमटली होती. 'प्रमोद संन्याशी बनलाय' याची त्याला पुरेपूर खात्री पटली होती. खादीचे सफेद दंडके व खादीची विजार असे ओबडधोबड शिवलेले कपडे आणि चकाचक भादरलेले डोके अशा अवतारात मी त्याच्या समोर उभा होतो. तानाजी मनातून खूप दुःखी झाला होता. आपल्या मित्राने आता खरेच संन्यास घेतला आहे, याची त्याला खात्री पटली होती. त्याची समजूत काढायला मला बरेच प्रयास पडले. पण कशीबशी समजूत काढली. तेव्हा तो थोडा सैलावला. माझ्याशी मोकळेपणाने बोलू लागला. पण तरीही अधून-मधून माझ्याकडे संशयी नजरेने पाहायचाच. मी मनातल्या मनात हसायचो.

एके दिवशी आम्ही दोघे चंद्रपूरला सिनेमा पाहण्यासाठी गेलो. त्यावेळी 'कहो ना प्यार हैं' हा चित्रपट प्रदर्शित झाला होता, आणि सर्वत्र त्याचा खूप गाजावाजा होत होता. उत्सुकतेपोटी आम्ही सिनेमाला गेलो. सिनेमागृहामध्ये सिनेमा पाहून मलाही खूप दिवस झाले होते. सकाळी अकराच्या दरम्यान चंद्रपूरच्या स्टँडवर उतरलो. तेथून साधारण एक किलोमीटर अंतरावर सिनेमागृह होते, म्हणून आम्ही पायीच निघालो. आजही उन्हाचा कडाका प्रचंड जाणवत होता. घामाने कपडे ओलेचिंब झाले होते. चालताना अचानक माझ्या उजव्या पायात थोड्याशा वेदना जाणवल्या. पण तिकडे सोयीस्कर दुर्लक्ष करून आम्ही चालत राहिलो. पण थोडयाच वेळात थोड्याशा वेदनांचे रूपांतर तीव्र कळात झाले. संपूर्ण पायातून पेटके (क्रॅम्पस्) यायला सुरूवात झाली. पाय आखडला, पाऊल पुढे पडेना. मी रस्त्याकडेला बसलो. असे अचानक काय झाले ते मला समजेनाच. कारण असले दुखणे मी प्रथमच अनुभवित होतो. पण नंतर लक्षात आले, उष्माघातामुळे हे सर्व घडत होते. कोठूनसे तानाजीने सरबत आणून मला पाजले. थोड्या वेळाने वेदना कमी झाल्या. पण पुढील प्रवास रिक्षाने पूर्ण करून एकदाचे आम्ही सिनेमागृहामध्ये धडकलो. तोवर बराचसा सिनेमा संपला होता. समोर हृतिक-अमिषाचा प्रेमरस उतू जात होता. अन् इकडे माझा जीवरस आटला होता. सिनेमागृहामध्ये मी तीन तास गाढ झोपी गेलो !

आठ दिवस राहून तानाजी गावी निघून गेला. तेव्हा गावाकडील आठवणींनी पुन्हा पिच्छा पुरविला. पुढील काही दिवस फारच उदासवाणे गेले.

दरवर्षी १५ ते २२ मे हा कालावधी सोमनाथासाठी विशेष महत्वाचा असतो. कारण या सात दिवसांत येथे श्रमसंस्कार छावणी शिबिर भरविले जाते. १९६८ पासून दरवर्षी कोणताही खंड न पडता आजही हे शिबीर अव्याहतपणे सुरू आहे. शालेय शिक्षणाबरोबरच श्रमाचे आणि संस्कारांचे महत्व युवकांना समजावे यासाठी शिबीराचे आयोजन केले जाते. शिबीरांतून गुणसंपन्न व्यक्तीमत्वे घडावीत अशी बाबांची धारणा होती. हा उदात्त हेतू डोळ्यांसमोर ठेवून या शिबीराची संकल्पना त्यांनी मांडली आणि अस्तित्वातही आणली. जॉर्ज फर्नांडीस, नाना पाटेकर यांसारखे असंख्य दिग्गज याच शिबिराच्या मुशीतून घडले आहेत. राम मनोहर लोहिया, पु.ल. देशपांडे, मोहन धारिया, यदुनाथ थत्ते आदि मान्यवरांचा वरदहस्त या शिबीरास नेहमीच लाभला होता. शिबिरासाठी संपूर्ण

भारतातून, विविध प्रांतातून विद्यार्थी व सामाजिक कार्यकर्ते हजेरी लावत असतात. १९६८ सालच्या पहिल्या वहिल्या शिबीरासाठी देशभरातून तब्बल १५०० शिबीरार्थी येथे आले होते. त्यावेळी सोमनाथ येथे कोणत्याही सोयी-सुविधा नव्हत्या. अगदी रस्तेही धड नव्हते. रानावनातून वाट तुडवीत सारेजण आले होते. निवासासाठी पक्या इमारती नव्हत्या तरी सर्वजण उघड्यावर झोपायचे. हा आठवड्याभराचा काळ मोठ्या उत्साहाने, आनंदाने एकत्रितपणे व्यतित करायचे.

अगदी पहिल्या शिबिरापासून दरवर्षी बाबा व साधनाताई आवर्जून उपस्थित राहत आणि सर्वांची देखभाल करीत. परंतू १९९० पासून सलग दहा वर्षे दोघे शिबिरास अनुपस्थित होते. कारण नर्मदा सरोवर आंदोलनासाठी ते मध्यप्रदेशातील कसरावदला जावून राहिले होते. पण ज्या वर्षी मी सोमनाथला आलेलो नेमके त्याच वर्षी बाबा व साधनाताई प्रदिर्घ कालखंडानंतर शिबिरास उपस्थित राहीले होते. माझ्या दृष्टीने तो बिलवरी योगायोगच होता. या वर्षीच्या शिबिरासाठी आम्ही सोमनाथमधील कार्यकर्त्यांनीं जय्यत तयारी केली होती.एकूण ९०० शिबिरार्थी आलेले होते. त्यात बहुसंख्य महाराष्ट्रीयन होते. दिल्ली, मणिपूर, केरळ आदि राज्यातूनही काही मुले-मुली आलेले. कोल्हापूरहून 'हेल्पर्स ऑफ हॅन्डीकॅप' संस्थेचे ९ अपंग विदयार्थी आले होते. चाकाच्या खुर्ची शिवाय हालचाल करू न शकणारी एक मुलगीही त्यात होती. या सर्वांना घेऊन रेल्वेने डॉ. शरद शिंदे, सौ. शर्वरी शिंदे, श्री. राजाभाऊ व सौ. माधुरी गडमुडशिंगीकर आदि प्रभृती इतक्या दूर आले होते. मला त्यांचे विशेष कौतुक वाटत होते कारण, कौटुंबिक जबाबदारीचे ओझे डोक्यावर असतानाही स्वतःची लहान मुले घरी ठेवून चौघे आले होते. दैनंदिन जीवनाला काही काळ बगल देऊन, समाजासाठी फूल ना फूलाची पाकळी परत देण्याचा त्यांचा प्रयास खरेच कौतुकास पात्र होता. हे सर्वजण आपल्या 'अस्सल कोल्हापूरी' स्वभावामुळे सर्व शिबिरभर विशेष ऊठून दिसत होते.

सर्व शिबिरार्थीना पहाटे पाच वाजताच उठावे लागे. सहापर्यंत प्रात:विधी व चहापान आटोपून सकाळी आठ वाजेपर्यंत श्रमदानाचे काम करावे लागे. पाट खणणे, बांध घालणे, तळी खोल करणे, गाळ काढणे अशी कामे करावी लागत. आठ वाजता नाष्टा होई. त्यानंतर पुन्हा दहा वाजेपर्यंत श्रमदान चाले. दहा ते अकरा हा वेळ आंघोळ, कपडे धुणे अशा वैयक्तिक स्वच्छतेच्या कामाकरीता

दिला जाई. त्यानंतर अकरा ते बारा वाजेपर्यंत जेवण व दुपारी दोन वाजेपर्यंत विश्रांती घेतली जाई. दोन नंतर सायंकाळी सहा पर्यंत बौद्धिक चर्चा सत्र चाले. मधे चार वाजता चहा पान होई. सहा ते सात 'फ्रि हँड' दिला जाई. त्यानंतर आठ वाजता सार्वजनिक पंगत बसे. पंगत वाढण्यासाठी जिल्हावार दिवस ठरवून दिला जाई. त्यादिवशी संबंधित जिल्ह्यातील शिबीरार्थी वाढपी म्हणून काम करीत. रात्री जेवणानंतर दहा वाजेपर्यंत सांस्कृतिक कार्यक्रम, करमणुक चाले. त्यानंतर सर्वजण विश्रांतीसाठी जात. एकूणच खूप मंतरलेले दिवस असायचे हे !

श्रमदान, बौध्दिक परिसंवाद, वक्तृत्व स्पर्धा, भाषणे, गुणदर्शन कार्यक्रम, मनोरंजन संपूर्ण दिवसभर अशा भरगच्च कार्यक्रमांचे नियोजन केलेले असे. बौध्दिक चर्चा सत्र जोरात चाले. जाती-पाती, धर्म-अधर्म, स्त्री-पुरूष समानता, श्रध्दा-अंधश्रध्दा, पर्यावरण रक्षण, आरक्षण, युवक व उद्योगधंदे असे विविध विषय चर्चेला असत. मार्गदर्शन करण्यासाठी त्या त्या क्षेत्रातील मान्यवरांना आमंत्रित केले जाई. यावर्षीच्या चर्चासत्रात भाग घेण्यासाठी सत्यपॉल, सुब्बाराव, नलिनी पंडीत, विद्या बाळ, शांताराम पोटदुखे व बाबा आमटे हजर होते. शिबीरादरम्यान बाबांना 'ऐकणे' हा परमभाग्याचा क्षण होता. मान्यवरांच्या भाषणानंतर प्रश्नउत्तरांचा कार्यक्रम अक्षरशः वादळी व्हायचा. त्यात बोलायला, मते मांडायला सर्वांना मुभा असे. देशाच्या विविध प्रांतातून सर्वजण आल्यामुळे परस्पर संवाद घडून सर्वांच्या ज्ञानात भर पडे. बाबा नेहमी म्हणत, “देशाचे खरे ऐक्य विद्यार्थांच्या या विविधतेतूनच साधता येईल. देशांतर्गत असणाऱ्या सीमा, भाषा, जाती, वर्ण इत्यादी भेद नष्ट होवून केवळ मानव नावाची एकच जात शिल्लक राहील !"

शिबिराच्या शेवटच्या दिवशी आनंदवनातील अंध व मुकबधीर मुलांनी सादर केलेला ऑर्केस्ट्रा सर्वांची दाद घेऊन गेला. सोमनाथ प्रकल्प म्हणजे बहुपक्षीय मत-मतांतरे मांडण्याचे खुले ज्ञानपीठ तर आहेच पण चिंतन-मनन करण्यासाठीची सुयोग्य अशी जागाही आहे. बाबांनी पाहिलेल्या दिव्य स्वप्नातील भव्य प्रयोगशाळाच जणू ती !

ऑगस्ट महिना उजाडला होता. प्रकल्पातील वातावरण आज थोडे वेगळे पण प्रफुल्लित असल्याचे जाणवत होते. सकाळचा नाष्टा-चहा आटोपून मी ओपीडीस निघालो होतो. चालताना मी माझ्याच विचारात दंग झालो होतो.

समोरुन अवनी व सीमा दोघी समवयस्क मैत्रीणी येताना दिसल्या. कधी नव्हे ते आज दोघींनीही साडी नेसली होती. केसात फूलांचे गजरे माळले होते. छानसा मेकअप केला होता. दोघीही सुंदर दिसत होत्या. लगबगीने कोठेतरी निघाल्या होत्या. वयास साजेसा अल्लड, अवखळपणा सुरु होता. मी समोर दिसताच छानश्या लाजल्या. “आज काही विशेष कार्यक्रम आहे का?"- मी विचारलं.
“अहो आज नागपंचमी नाही का ?"- कपाळावर हात टेकवत सीमा बोलली आणि दोघी अवखळ हसत निघून गेल्या. 'अरेच्चा आज नागपंचमी आहे तर?' मी मनाशीच बोलून गेलो. ओपीडीच्या दिशेने मी भरभर चालत होतो. पण मन मात्र उलट्या दिशेने भरभर चालले होते. भूतकाळाच्या लाटांवर मन आरुढ झालेले. गतआठवणींना उधाण येवू लागले. ती बत्तीस शिराळची जगप्रसिध्द अशी नागपंचमी....प्रत्यक्ष जीवंत नागांची पुजा....घराघरातून मडक्यात सुरक्षित ठेवलेले साप....त्यांची रोजची देखभाल... देवता समजून त्यांची केली जाणारी पूजा....ती तेथील नागमंडळे....त्यांच्यात चालणारी ईर्षा....प्रत्येक मंडळाची मिरवणूक....पुढे जाण्यासाठीची चढाओढ....वाद्यांचा खणखणाट....गुलालाची उधळण....सर्वत्र केवळ जल्लोष आणि जल्लोष.... आणि हे सर्व पाहण्यासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून उसळलेली गर्दी ! तेथील माहोल मला हुबेहुब आठवू लागला. प्रत्येक नागपंचमीला मी बत्तीस शिराळ्याला जात असे दिवसभर गुलाल झेलत असे. बिनविषारी सर्प गळ्यात अडकवून फोटो काढून घेण्यात मला भारी मौज वाटे. असे वर्षानुवर्षे चालले होते. नागपंचमीची शिराळवारी कधी चुकली नव्हती. अचानक उदासवाणं वाटू लागलं. मनास कसलीशी हूरहूर लागून राहीली. कसा जाणार होतो आज बत्तीस शिराळला? मी तर इकडे शेकडो किलोमीटर्स दूर आलो होतो. कोणास न सांगता... घर, गाव, नातेवाईक सर्व काही सोडून खुप दुरवर आलो होतो. आज तिकडे आपल्या मित्रांनी आपली आठवण तरी जागवली असेल का? बत्तीस शिराळ्याला जाण्याची त्यांची तयारी होत आली असेल का? माझ्या येण्याची वाट ते पाहत असतील का ? छे-छे नक्कीच विसरले असतील आपल्याला. नाहीतर आजकाल त्यांची पत्रे तरी कोठे येतात पुर्वीसारखी. मन विषण्ण झालं. रितेपणाची जाणीव ऊर भरुन टाकू लागली. उदासीनतेची छाया गडद होवु लागली.

आज आनंदवनहुन काही परदेशी पाहुणे सोमनाथ प्रकल्प पाहायला येणार होते. तशा आशयाचा फोन सकाळीच विकास भाऊंनी केलेला. दुपारी एक वाजेपर्यंत सर्व पाहूणे येणार होते. अमेरिकेतील नोविनो प्लांट चे सर्वजण सदस्य होते. दरवर्षी ऑगस्ट महिन्यात बाबा आमटेंचे प्रकल्प पाहण्यासाठी ते येत. गत पाच-सहा वर्षापासुन हा सिलसिला सुरु होता. प्रत्येक खेपेस वेगवेगळे सदस्य असत. यावेळी इटली, स्वीत्झर्लंड व फ्रान्स या देशातील सदस्य येणार होते. Novino Planet चे हे सदस्य तिकडे आपापल्या देशात सुट्टीच्या दिवसांत छोटी - मोठी कामे करून पैसे जमवितात. आणि वर्षभर जमा झालेली रक्कम आनंदवन व इतर प्रकल्पांसाठी घेऊन येतात. मग या पैशातून इथे एखादी वास्तू उभारतात किंवा योग्य कामासाठी दान करतात. नियोजित वेळी सर्वजण सोमनाथला आले. एकूण सतरा सदस्य होते. सदस्य कसले ही तर १७-१८ वर्षाची शाळा-कॉलेजची मुले होती. सर्वजण बस मधून उतरत होते. जणू सळसळता उत्साहच सोमनाथमध्ये ओतला जात होता ! आपल्याकडील मुलांसारखीच दंगा-मस्ती चालली होती. त्यांच्या बरोबर डॉ. उषा ही अनिवासी भारतीय डॉक्टर आलेली. ती बालरोगतज्ञ होती. मुळची तमीळनाडूची असलेली उषा अनेक वर्षापासून अमेरीकेत हाफकिन इन्स्टिट्युटमध्ये काम करीत होती. बालरोग तज्ञ असलेल्या उषाला आनंदवन व बाबा आमटेंना पाहण्याची, भेटण्याची तीव्र इच्छा होती. त्या ओढीने ती आलेली. दुपारी सर्वांची जेवणे पार पडली. त्यानंतर मी व हरीभाऊ बढे सर्व पाहूण्यांना प्रकल्प दाखविण्यासाठी घेऊन गेलो. संपूर्ण प्रकल्प व सोमनाथ मंदीराचा परिसर सर्वांना आवडल्याचे त्यांच्या चेहऱ्यांवरून दिसत होते. ठिकठिकाणी थांबुन त्यांनी खुपसे फोटोही घेतले. या दरम्यान त्यांची दंगामस्तीही सुरु होती. आज ते इथेच मुक्काम करणार होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी डॉ. उषा एकटीच ओपीडीत आली तिला आमचा दवाखाना पहायचा होता आणि त्यावर आधारीत एक डॉक्युमेंटरी बनवायची होती.
"हॅलो, डॉ. प्रमोद"
"ओह हाय, वेलकम डॉ. उषाजी, प्लीज हॅव अ सीट."
तिच्या पदवी आणि वयाचा मान ठेवून मी माझी खुर्ची तिला देवू केली. पण तिने ती नाकारली आणि शेजारील स्टुलवर बसणेच पसंत केले.

अस्खलित अमेरिकन-इंग्लीश वळणाची वाकड्या तोंडवळ्याची सुपरफास्ट एक्सप्रेस जशी धावू लागली तसा माझा 'आ' वासला. ती काय बोलतेय तेच मला समजेना. तिचे अमेरिकन वळणाचे इंग्रजी उच्चार माझ्या डोक्यात काही केल्या शिरेनात आणि ती बया थांबायचे नाव काय घेईना. मला सकाळी- सकाळी दरदरून घाम फुटला. संवाद साधण्यात अडचण उभी राहिली. संवाद एकेरी होवू लागला. मी मख्खच ! हिंदीतून सुरु करावे तर तिला हिंदी येत नव्हते आणि इंग्रजी किंवा तमिळ मला जमत नव्हते. माझे इंग्रजीचे ज्ञान अगदी यथास्तव आणि तमिळीशी संबंध असण्याचे काही एक कारण नव्हते. अगदी दुरान्वयेही संबंध नव्हता. मी उषासमोर सरळ नतमस्तक झालो.

“मॅडम, मला तुमचे अमेरिकन उच्चार समजत नाहीत त्यामुळे प्लीज सावकाश बोला आणि हो, माझे इंग्रजी म्हणावे तितके चांगले नाही त्यामुळे कृपया मला समजून घ्या.” अर्थात हे सर्व तिला मी मोडक्या तोडक्या इंग्रजीत सुनावले आणि चक्क तिला ते समजलेही !

"जरूर" ती हसून म्हणाली. मग पुढील सर्व प्रवास ठिकठिकाणी थांबत, अडखळत पॅसेंजरमधून झाला !

पण, तिच्या मनात माझी परिक्षा घ्यायची इच्छा होती की काय कोणास ठावूक ? कारण प्रश्नांमागून प्रश्नांचा असा काही भडीमार तिने माझ्यावर चालविला की उत्तरे देता-देता माझी भंबेरी उडाली. अक्षरश: झेंडू फाटला. त्यात भरीस-भर म्हणजे पेशंट तपासतानाचे माझे फोटोही ती खेचत होती. त्यामुळे फोटोसाठी का होईना चेहऱ्यावरचे भाव मला जपावे लागत होते. तब्बल दोन तास तिने माझा छळ चालविलेला. शेवटी कधीतरी एकदाचे तिचे समाधान झाले. तोवर इकडे उकडलेल्या कणसासारखी माझी अवस्था झालेली ! आजच्या चाकावरच्या जमान्यात इंग्रजी भाषा सफाईदारपणे बोलता येणे किती गरजेचे आहे याची जाणीव त्यावेळी मला प्रथमच झाली.

शेवटी दवाखान्यातून निघताना उषाताई म्हणाल्या, “डॉ. प्रमोद, खरेच हा दवाखाना तू खुप चांगल्या पद्धतीने चालविला आहेस. प्रत्येक कुष्ठरोग्याची आपुलकीने विचारपूस करुन त्यांना धीर देतोस, समजावून सांगतोस, व्यवस्थित काळजीपूर्वक तपासतोस, त्यांचा हात हातात घेतोस हे नक्कीच प्रशंसनीय आहे. व्हेरी गुड. किप इट अप.”

"Thank you" मी मनापासून तिचे आभार मानले. ती जाताच एक मोठा उसासा हवेत सोडला. हायसे वाटले. दुपारी जेवण उरकून novino planet चे सर्व सदस्य हेमलकशास रवाना झाले.

अचानक नामदेव शेलोटेला दवाखान्यात आणले गेले. त्याला श्वास घ्यायला खूप त्रास होत होता. जोराची धाप लागली होती. बिचारा खूप अस्वस्थ झाला होता. धड बोलायलाही येत नव्हते. श्वासागणिक तडफडत होता. छाती जोरजोराने वरखाली होत होती. छातीचा भाता झाला होता. अगदीच बैचैन झाला होता तो. मी त्याला त्वरीत ॲडमीट करून घेतले. नामदेव हा एक बरा झालेला कुष्ठरोगी होता. पण अनेक वर्षांपासून त्यास दम्याचाही विकार होता. न चुकता रोज धाप लागायची. श्वास फुलायचा. हळूवारपणे शिट्टी फुंकल्यासारखा आवाज त्याच्या छातीतून यायचा. अगदी न चुकता, नित्यनियमाने तो ओपीडीत औषधासाठी यायचा. त्याच्या नित्य 'प्रेझेंटी' मुळे माझी त्याच्याशी घट्ट ओळख झालेली. एकवेळ मुलांची शाळा चुकली असेल पण नामदेवचा दवाखाना कधी चुकला नव्हता. इथे तो एकटाच होता आपल्या जीवाला. कुष्टरोग जडल्याने बायकोने त्याचा कधीचाच त्याग केला होता. उरावर दगड बांधून तो जगत होता. सगळं दुःख पचवून तो पुन्हा उभा राहीला होता. दिलखुलास हसत होता. सगळ्यांशी प्रेमाने वागत होता. नामदेव खेळकर आणि दिलदार स्वभावाचा माणूस होता. पण आज अचानक तो अस्वस्थ झाला होता. बॅकरेस्ट देवून ऑक्सिजनचा मास्क त्याच्या तोंडावर लावला. तातडीने स्टिरॉइडची इंजेक्शनस् दिली. सोबत अमिनोफायलीनची ड्रीप सुरु केली. ॲंटिबायोटिक्स्चे इंजेक्शन आणि डाययुरेटिकही दिले. पण धाप काही कमी होईना. उलट ती वाढतच चालली. शर्थीचे प्रयत्न व्यर्थ ठरु लागले. पुढील उपचारासाठी त्याला तातडीने शिफ्ट करण्याची गरज होती. त्यासाठी वाहनाची व्यवस्था करण्यास एकाला पाठविले. पण...तोवर नामदेवने मान टाकली. तो आता दूरच्या प्रवासाला चालला होता. केवळ दहा मिनीटांतच सर्व खेळ आटोपला होता. आपल्यामुळे कोणास काही जास्त त्रास होवू नये याची पुरेपुर दक्षता त्याने घेतली होती. कॉटवर निपचित पडलेल्या नामदेवकडे मी हतबलपणे पाहत उभा होतो.

मी एक डॉक्टर, आपल्या ज्ञानाचा गर्व बाळगणारा आणि सर्वत्र तो मानाने मिरविणारा. माझ्या ज्ञानाचा उदो-उदो परस्पर होत असतो. पण एखाद्या प्रसंगी

जेव्हा पुढयातील रुग्णाला मृत्यू ओढुन नेत असतो तेव्हा मी काहीही करू शकत नाही. हे शल्य मनी बोचत राहतं. प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही जेव्हा मृत्यू वरचढ ठरतो तेव्हा माझे गर्वहरण झालेले असते. ज्ञानाचा मोहोर पार झडून गेलेला असतो. अनेक अनाकलनीय गोष्टींचे गुढ तसेच गुलदस्त्यात राहून जाते. आज मृत्यूवर विजय मिळवण्यासाठी मानवाचा प्रचंड खटाटोप चालू आहे. त्यासाठी अविरत झटतो आहे. भविष्यात त्याचा हा प्रयास यशस्वी होईल अथवा न होईल पण या घडीला नामदेव सारख्यांच्या निपचित देहाकडे पाहिले की, हतबलतेची, असहायतेची जाणीव मनास पार पोखरून टाकते. माणूस मग तो कोणीही असूदे एक मर्यादित आयुष्य घेवूनच जन्मास आलेला असतो. मापलेल्या आयुष्यात तो शाळा-शिक्षण, नोकरी-धंदा,लग्न, मुलं-बाळं,संसार, घरदार, गाडी-बंगला असे जीवनभराचे सारे उपद्व्याप करून शेवटी निघून जातो. शाश्वत सत्य कोणाला चुकलेले नसते. जन्मास आलेल्या प्रत्येकाला अखेर मृत्यू घेवून जातोच. मग असे का बरे होत असावे ? अंतिमतः मृत्यू ठरलेलाच असेल तर 'निसर्ग' इतके सारे उपद्व्याप मानवाकडून का करवून घेत असेल ? मानवाला एवढे 'खेळवून' मारण्यामागे निसर्गाची नेमकेपणाने काही भूमिका असेल का ? मानवी जीवनाचं नेमकं प्रयोजन काय बरं असावं ? खरेचं, काहीच कळत नाही.

आज पुन्हा सोमनाथला सहा-सात अमेरिकन मुले-मुली आलेली. प्रथम आनंदवन नंतर हेमलकसा, नागेपल्ली असा प्रवास करीत दुपारी एकच्या सुमारास सर्वजण इथे पोहचलेले. त्यांचा हा भारतीय दौरा केवळ चार दिवसांसाठीच होता. पुण्यातील एका नामांकीत बाईंनी तो आयोजित केला होता. त्यासाठी पुण्यातीलच एका प्रसिद्ध दैनिकाची त्यांना मदत झालेली. बाबा आमटेंचे सर्व प्रकल्प प्रत्यक्ष दाखविण्यासाठी आणि बाबांच्या कार्याची ओळख व्हावी या उद्देशाने दरवर्षी हा दौरा आयोजित केला जात असे. वेळ खूपच तोकडा असल्याने सोमनाथ प्रकल्प घाईगडबडीत पाहून ते सर्वजण सायंकाळी चार वाजता आनंदवनात परतलेही. दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर त्यांना नागपूरहुन परतीचे विमान पकडायचे होते. त्यामुळे सर्वांची खूपच धांदल उडाली होती.

सर्वजण आनंदवनला पोहचल्याचा फोन येतोय तोवर एक वाईट बातमी येवून धडकली. मूलहून सोमनाथ प्रकल्पाकडे येणाऱ्या रस्त्यावर एक भीषण अपघात घडला होता. क्षणाचाही विलंब न करता आम्ही काहीजण तिकडे धावलो.

रेल्वे क्रासिंगवर गेट नसल्यामुळे ही घटना घडली होती. आमच्या प्रकल्पाशेजारी एक सधन शेतकरी वास्तव्यास होता. पंधरा दिवसांपूर्वी त्याने एक नवीन ट्रॅक्टर खरेदी केला होता. स्वत:च्या शेतातील धानाचे (भात) पीक कापणीसाठी पंचवीस-तीस मजूर ट्रॅक्टरमध्ये दाटीवाटीने बसवून चाललेला. नवीन ट्रॅक्टर खरेदी केल्याच्या आनंदात, कर्कश गाणी वाजवीत सर्वजण निघाले होते. ड्रायव्हर अर्थातच नवखा होता. कर्कश गाण्याच्या तालावर चाललेला ट्रॅक्टर रेल्वे रूळाच्या मध्यावर जावून अचानक बंद पडला. ड्रायव्हरने बरीच कसरत करून पाहिली पण व्यर्थ. ट्रॅक्टर सुरू व्हायचे काही नाव घेईना. तो सुरू व्हायच्या प्रतिक्षेत सर्वजण ट्रॉलीतच बसून राहिले होते. अन्....तितक्यात.... भरधाव वेगात रेल्वेचे आगमन झाले. रेल्वेचे दर्शन होताच सर्वांच्या काळजाचा ठोका चुकला. काळरूपी अजस्त्र अजगरच दूरवरून येताना दिसू लागला. घास घेण्यासाठी त्याचा 'आ' वासला होता. सेकंदागणिक काळसर्प जवळ येत होता. सर्प पाहून संमोहित झालेल्या बेडकासारखी सर्वांची अवस्था झाली. रेल्वेकडे पाहत सर्वजण ट्रॉलीतच बसून राहिले. अन्....जे घडू नये असे वाटत होते ते अगदी तसेच घडले. फुलांची गच्च ओंजळ आकाशात उधळली गेली. होत्याचे नव्हते झाले. रेल्वेच्या जोरदार धडकेने ट्रॉलीतील सर्व मजूर, बायाबापडे हवेत उंच उडाले अन् फिरून पुन्हा रूळावर पडले. काळाचा वरवंटा फिरला. कित्येक देहांच्या अक्षरशः चिंधड्या उडाल्या. मासांचे तुकडे विखूरले गेले. माणसे तुकड्यात जमा झाली. कोणता तुकडा कोणत्या देहाचा याचा पायपोस उरला नाही. सर्वत्र रक्त-मांसाचा चिखल झाला. रक्तांचं अक्षरश: शिंपणचं झालं.

आम्ही जेव्हा घटनास्थळी पोहचलो तेव्हा समोरील दृश्य पाहून हादरून गेलो. काय बोलावे, काय करावे काहीच सुचत नव्हते. अनेकांना भोवळ आली. काहींनी जागेवरच बसकन् मारली. पोलीस आले, पंचनामा सुरू झाला. कटलेल्या धडांची जुळवणी सुरू झाली. पण व्यर्थ ! काही केल्या हिशोब जुळत नव्हता. त्या न जुळणाऱ्या हिशोबा शेजारी बसून त्यांच्या चिल्या-पिल्यांचा टाहो गगनाला भिडलेला. कित्येक निष्पाप, निरागस जीवांना नियतीनं अनाथ, पोरकं केलं होतं. काळीज पोखरून टाकणारा त्या निष्पाप जीवांचा आक्रोश नियतीला जाब विचारीत होता. एरव्ही निर्विकारपणे आपले कर्तव्य पार पाडणारे पोलीसही आतून हेलावून गेले होते. तिथल्या कोणाला काहीच सुचत नव्हतं. कित्येकांच्या मनाचा

पार कोळसा झाला होता. हृदय पिळवटून टाकणारा लहानग्या जीवांचा तो आक्रोश जेव्हा मी पाहिला तेव्हा नास्तिकतेबाबतचे माझे मन आणखी घट्ट झाले.

आज रविवार सुट्टीचा दिवस. परगावाहून प्रकल्प पाहण्यासाठी येणाऱ्या लोकांमुळे थोडीशी गर्दी जाणवत होती. दुपारच्या वेळी मी, सतीश आणि मुकुंदा गप्पा मारत कट्ट्यावर बसलो होतो. गप्पांचा फड रंगात आला होता. तितक्यात मुकुंदा अचानक वाशा-वाशा म्हणून ओरडू लागला. मी आजुबाजूला पाहिलं, पण तिथे तर कोणीच दिसतं नव्हतं. त्याच्या पुन्हा-पुन्हा ओरडण्याचा अर्थ मला काही केल्या उमगेना. मग शेवटी मीच त्याला खडसावून विचारलं, 'अरे असा ओरडतोयस काय ? जरा व्यवस्थित, नीट समजेल असे काही तर बोल.' मुकुंदा थोडा भानावर आला आणि एका वस्तुकडे बोट दाखवू लागला. अरेच्या तो तर तिकडे होता एक साप ! मी थोडे जवळ जावून पाहिले, साप तपकीरी रंगाचा होता. त्याच्या संपूर्ण अंगावर पांढरे पट्टे होते. स्थानिक लोक त्याला 'वाशा' म्हणून संबोधित होते.

कसलीही घाई गडबड न करता वाशा आपल्याच तालात शांतपणे चालला होता. मीही तितक्याच शांतपणे त्याच्याकडे पाहत उभा होतो. तेवढ्यात लख्ख्कन वीज चमकावी तसा एक विचार मनात चमकून गेला. मला प्रकाश भाऊंचे ते बोल आठवले. 'तंबाखूमुळे साप मरतो' हे त्यांनी मला पूर्वी हेमकलसा येथे गप्पांच्या ओघात सांगितले होते. खरेतर त्यावेळी त्यांचे ते मत मला अजिबात पटले नव्हते. पण तोच विचार आता मनात डोकावू लागला होता. या वाशालाच तंबाखू खायला दिली तर ? काय होईल ? देवून पाहूया का ? बघूया तरी काय होतयं ते. प्रकाशभाऊंच्या मताचा पडताळा तरी घेता येईल. पण हो, वाशाला तंबाखू द्यायची तरी कशी ? तो काय थोडाच माझा मित्र होता ? अन् मी दिलीयं म्हणून तो काय तंबाखू खाणार होता? अजून पर्यंत तरी सापांना माणसांसारखे तंबाखूचे व्यसन लागल्याचे कोठे ऐकिवात नव्हते. मग आता करायचे काय अन् कसे ? मी विचारमग्न झालो. काहीही होवो पण वाशाला आज तंबाखू चारायचीच. माझा निर्धार ठाम होता. तंबाखूपायी प्रथम वाशाला पकडणे आवश्यक होते. माझ्या उभ्या आयुष्यात मी साप कधी पकडला नव्हता. साधा स्पर्शही केला नव्हता. वाशाला पकडण्याच्या नुसत्या कल्पनेनेचं मला दरदरून

घाम फुटला. तर तिकडे आपल्याच मिजाशी चालीत वाशा बेदरकारपणे पुढे सरकत होता. पण आज मीही वेड्यासारखा झपाटलो होतो. काहीही होवो वाशाला पकडायचेच. अरे हो, पण पकडायचे कसे? मनाला प्रश्नांचे वेटोळे पडले होते. काही केल्या ते सुटत नव्हते. अचानक... जटिल कोडे सहजी सुटावे अशी एक कल्पना मनात चमकून गेली.

मी मुकुंदाला एक छोटीशी काठी आणायला सांगितली. त्याने नजीकच्या झुडपाची एक छोटी फोक काढून माझ्या हातात दिली. अंगठाभर जाडीची ती फोक मी माझ्या डाव्या हातात घेतली. अन् सावध पवित्रा घेत वाशाच्या निकट गेलो. सावकाशपणे त्याच्या बाजूला बसलो. आता तेथील सर्वांची नजर माझ्यावर स्थिरावली होती आणि वाशाचीसुद्धा. वाशा आता जागेवर थांबला होता. माझी चाहूल त्यास लागली होती. तो एकटक माझ्याकडे पाहत होता. त्याचा निर्णय पक्का होता. इकडे मी घामाने भिजलो होतो. हात थरथरत होते, पाय लटपटत होते. कानशिले गरम झाली होती. एकमेकांचा अंदाज घेण्यात काही क्षण असेच गेले पण.... पुढच्याच क्षणी डाव्या हातातील काठी मी वाशाच्या मानेवर दाबली. अन् त्याला जमीनीलगत केला. उजव्या हाताने मान अलगद पकडली आणि त्याला उचलले. पण....पुढच्याच क्षणी वाशाने माझ्या उजव्या हातास वेटोळा घातला. हात जखडला गेला. मी थरारलो आता हा तिढा सोडवायचा कसा? पेच-डावपेच सुरू होते. मी डळमळलो होतो. काय करावे ते सुचत नव्हते. वाशा जोर-जोराने फुत्कार टाकून जणू आव्हान देत होता. मी आता खरेच घाबरलो होतो. त्याच्या तावडीतून सुटायचे कसे याचाच विचार करू लागलो. तितक्यात सतीश झपाट्याने पुढे आला. त्याने धाडसाने वाशाचे शेपूट पकडले अन् हळुवारपणे तिढा सोडविला. हात मोकळा झाला तसा जीवात जीव आला. अजूनही वाशाची मान माझ्या हातात होती. मान सोडविण्यासाठी वाशाची अखंड धडपड चालू होती. मध्येच संपूर्ण शरीर फुगवत होता, फुत्कारत होता. मी मान सोडतो तर अनर्थ घडला असता.

मुकुंदाला तंबाखूचे व्यसन होते. ते मला माहीत होते. त्याच्या खिशात तंबाखूची पुडी व चुना डबी होती. मुकुंदाला थोडी तंबाखू मळण्यास सांगीतली. त्याने त्वरीत पुडी काढली व चुना न लावताच तंबाखू हातावर मळली. मी डाव्या हाताने वाशाचा खालचा जबडा ओढला तसे त्याचे तोंड वासले गेले. त्याक्षणी मी

मुकुंदाला इशारा केला. त्याने मळलेल्या तंबाखूची छोटीशी गोळी वाशाच्या तोंडात अलगदपणे टाकली. ती पडताच मी खालचा जबडा सोडला तसे वाशाचे तोंड मिटले गेले. तंबाखू व्यवस्थीतपणे तोंडात सामावली गेली. वाशाने तंबाखू खाल्लीय याची खात्री करुन मी व सतीशने वाशाला एकाचवेळी जमीनीवर सोडले. अन् सर्वजण बाजूला झालो. आता वाशाचे काय होणार ? सर्वांची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. क्षण निर्णायक होता. अगदी थोड्याच वेळात वाशा थरथर कापू लागला. त्याला पेटके येवू लागले. थरथर कापणारा साप आम्ही आयुष्यात पहिल्यांदाच पाहत होतो. अन् अहो आश्चर्यम्.... केवळ पाचच मिनिटात वाशा जागीच गतप्राण झाला. डॉ. प्रकाश आमटेंनी साप आणि तंबाखू विषयी व्यक्त केलेलं मत खूप विचारपूर्वक आणि प्रयोगाअंती मांडलेलं होतं, याची खात्री मला पटली. ‘ तंबाखूमुळे साप मरतो ' हे त्यांचं मत अगदी शंभर टक्के खरं होतं !

बाकी काहीही म्हणा, तंबाखूमुळे साप मरतो हे सत्य असले तरी आपल्याकडे असा एक ' प्राणी ' आहे की जो हीच तंबाखू लिलया पचवून दाखवितो. होय, अगदी बरोबर ओळखलतं - 'माणूस' त्याचं नाव ! अहो तंबाखूच्या एका चिमुटभर गोळीची काय कथा, दिवसभरात दोन-तीन पुड्या तंबाखू सहजरित्या पचविणारे महाभाग इथे काही कमी नाहीत. इतकेच नव्हे तर याहीपेक्षा भयंकर म्हणजे काही महाभाग तर इथे असेही आहेत की, तंबाखूची गोळी रात्रभर तोंडात धरून गाढ झोपी जातील अन् सकाळी उठून 'फ्रेश' होतील ! माणूस आणि तंबाखू यांचं नातं खूप घट्ट आहे. ते इतकं की, सहजासहजी कोणी कोणाला सोडायला तयार होत नाही. याऊपर तंबाखू वापरायच्या विविध अभिनव तऱ्हाही माणसाने शोधल्या आहेत. कोणी नखभर चुना लावून मळतो....तर कोणी तेंदूपत्ती किंवा कागदाच्या चिटोऱ्यात भरून झुरका मारतो... तर कोणी चिलिम भरून त्यावर विस्तव ठेवतो... तर कोणी गुरगुरत हुक्का वाद्य फुंकतो... तर कोणी मावा, गुटख्याचा तोबरा भरून रवंथ करतो आणि चर्वणाच्या नादमय आवाजात तल्लीन होवून जातो. काहीजण तर जाळपोळ करून तंबाखूची राखरांगोळी करतील अन् दात घासत परमानंदी टाळी लावतील. काहीही होवो.... अगदी दुनिया इकडची तिकडे होवो, पण तंबाखूचा नाद मात्र कधीही सोडणार नाहीत. हे व्यसन एकदा जडलं की, काही केल्या सुटत नाही... अगदी छातीची 'पोस्ट पेटी' झाली तरी ! मग पुढे कधीतरी तंबाखूची मगरमिठी त्याला अलगद-

आल्हादपणे कॅन्सरच्या जबड्यात ओढल्याशिवाय राहत नाही. पण तोवर वेळ निघून गेलेली असते. अन् त्याचा पुढील कार्यक्रम 'कॅन्सल' झालेला असतो. जिथे साप तंबाखूमुळे जीवानीशी जातो तिथे माणूसप्राणी तीच तंबाखू अगदी लिलया पचवतो. मग आता तुम्हीच सांगा, खरा विषारी प्राणी कोण ?

आज कधी नव्हे ती पहाटे चारलाच जाग आली. तीही अगदी घड्याळ्याच्या गजराविना. झोप छान झाली होती. खूप दिवसांनी गाढ झोप लागलेली. आळस झटकला आणि उठून बसलो. पण एवढ्या लवकर उठून करावे तरी काय? हाही प्रश्न होताच. काही वेळ तसाच बेडवर बसून राहीलो. डोक्यात अनेक विचार येत होते. त्यात हाही एक विचार आला, 'बाबांना कसरावदला फोन करुया का?' काही महिन्यांपूर्वी ते पुन्हा कसरावदला जावून राहिले होते. त्यांना इकडे कायमचे परत आणण्याच्या दृष्टीने हालचाली सुरु झाल्या होत्या. पण ते कोणाचेचं ऐकत नव्हते. बाबांना पहाटे लवकर उठण्याची सवय होती. ते रात्री लवकर झोपत अन् पहाटे तीनलाच उठत. उठले की प्रथम पुस्तक वाचन करीत. त्यानंतर दाढी, आंघोळ वैगेरे आटोपून फिरायला जात. हा त्यांचा नित्यक्रम असे. सहसा त्यात खंड पडत नसे. आता तर पहाटेचे चार वाजलेले. म्हणजे ते केव्हाचेच उठले असणार. यावेळी त्यांचे वाचन सुरु असेल का? खरेच आत्ता या क्षणी ते काय करत असतील ? माझे मनाशी हितगुज चाललेले.

मी पटकन् उठलो. चेहऱ्यावर गार पाणी मारले. अन् फोन करण्यासाठी धावलो. गेस्ट हाऊसच्या पडवीत फोन होता. नंबर फिरविला. पण बराच वेळ प्रयत्न करुनही फोन लागला नाही. सर्व लाईन्स् व्यस्त असल्याची रागदारी बराच वेळ सुरु होती. माझा चांगला मूड खराब झाला. परत जाण्यापूर्वी आणखी एकदा प्रयत्न करुन पाहूया म्हणून मी पुन्हा डायल फिरविला.... आणि आश्चर्य शेवटी एकदाची रिंग वाजली. माझा उत्साह दुणावला. पलीकडून बाबांनीच फोन उचलला होता. मी पटकन् आवाज ओळखला. त्यांचा पहाडी आवाज एकमेवाव्दितीय असाच होता. फोन उचलताच मी-

"गुडमॉर्निंग बाबा"

“गुडमॉर्निंग. कोण बोलतयं ?”

“बाबा मी डॉ. प्रमोद बोलतोय सोमनाथहून"

मी प्रथमतः त्यांच्या व साधनाताईंच्या प्रकृतीची चौकशी केली दोघेही खूप वयस्कर झाले होते. त्यांची ख्याली-खुशाली विचारणे अगत्याचे होते. दोन दिवसांपूर्वी उभयता इंदौरला वैद्यकीय तपासणीसाठी जाऊन आल्याचे मला वृत्तपत्रातून समजले होते. मग त्या अनुषंगाने मी बराच वेळ बोलत राहिलो. तिकडून बाबांचा प्रतिसादही तसाच होता. ते भरभरुन बोलत होते. बराच वेळ अवांतर गप्पा चालल्या. सर्व काही कुशल-मंगल असल्याची खात्री झाल्यावर मी त्यांच्या पाकिस्तान शांतीयात्रेचा विषय काढला.

“बाबा, तुम्ही पाकिस्तानला केव्हा जाणार आहात ?"

“हो त्याचे नियोजन सुरु आहे. केंद्र सरकारच्या परवानगीची वाट पाहत आहे.”

"अच्छा.”

“अरे हो, तू येणार होतास ना ?”

“हो, मी निश्चित येणार आहे.”

“पण तुझा पासपोर्ट तयार आहे का? नसेल तर विकासशी बोलून घे."

“ठीक आहे. मी विकासभाऊंशी बोलून घेतो. "

गेल्या वर्षीच्या मे महिन्यात हेमलकसा येथे मी, बाबा आणि साधनाताईंना भेटलो होतो. तेव्हा मीही पाकिस्तानला तुमच्यासोबत येणार' हे त्यांना आवर्जून सांगितले होते. इतक्या दिवसानंतर ते आत्ताही त्यांच्या पक्के लक्षात होते. नव्वदीच्या घरात असूनही स्मरणशक्ती किती तीव्र होती याची प्रचिती येत होती. अगदी लहान-सहान गोष्टीही त्यांच्या लक्षात चांगल्या राहत असत. 'बाबा आमटे पकिस्तानला जाणार' ही बातमी जवळपास सर्वच वृत्तपत्रांतून गेल्या काही दिवसांपासून सातत्याने प्रसारीत होत होती. त्यावर उलट-सुलट प्रतिक्रियाही उमटत होत्या. वेगवेगळ्या वृत्तपत्रांतून बाबांच्या मुलाखतींना खूप प्रसिध्दी दिली जात होती. पाकिस्तान यात्रा आता दृष्टिक्षेपात आली होती.

“बाबा,मी कालच तुमची मुलाखत एका प्रसिध्द दैनिकात वाचली. त्यासाठीच फोन करतोय” हे त्यांना आवर्जुन सांगितले. तसे ते मला म्हणाले, “पाकिस्तानला येण्याविषयी आग्रह धरणारा हा तुझा पहिलाच फोन आहे.” त्यांच्या पाकिस्तान शांतियात्रेला प्रतिसाद देणाऱ्या माझ्या या पहिल्या-वहिल्या फोनमुळे त्यांना खूप आनंद झाला होता. फोनवरील चाललेल्या आमच्या बोलण्यातून मला ते स्पष्ट जाणवत होतं. फोनवर आम्ही बराच वेळ होतो. गप्पा रंगल्या होत्या. ते मला डॉ.

उषा मेहता, पन्नालाल खुराणा व इतर काही महत्वाच्या गांधीवादयांविषयी बरीचशी महत्वपूर्ण माहिती सांगत होते. सुभाषितांची पखरण केलेले बाबांचे विचार प्रभातीच्या निरामय शांत समयी मी अधाशीपणे पीत होतो.

सर्व मान्यवर गांधीवादी तसेच इतर काही इच्छुक व्यक्तींना सोबत घेऊन पुढील काही दिवसांतच बाबांची पाकिस्तान शांतीयात्रा पार पडणार होती. त्याची तयारीही पूर्ण होत आली होती. पण...श्रेयवादाच्या फालतू कारणास्तव तत्कालीन केंद्र सरकारने या दौऱ्यास परवानगी नाकारली. बाबांची पाकिस्तान शांतीयात्रा पुढे कधीच पार पडली नाही. माझ्याही जीवनातील हा फार मोठा अपेक्षाभंग होता. एका ऐतिहासिक घटनेचा साक्षीदार होण्याचे स्वप्न भंग पावले. मला खूपच वाईट वाटले.

ठिकाण सोमनाथ. दुपारचे ठीक तीन वाजले होते. मी आणि अरुणभाऊ दुपारचा चहा संपवून बोलत बसलो होतो. इतक्यात कोठूनसा अनाहुतपणे सायरनचा आवाज ऐकू येऊ लागला. आम्ही कान टवकारले. आवाज आणखी निकट येऊ लागला. काही क्षणातच शासकीय गाड्यांचा ताफा सोमनाथला दाखल झाला. सर्वात पुढे पोलिसांची गाडी, त्यापाठोपाठ पांढऱ्या रंगाची टिपिकल ॲम्बॅसिडर आणि शेवटी स्टेनगनधारी ब्लॅक कमांडोजची गाडी असा लवाजमा होता. आम्ही भांबावून गेलो. काहीच उमगेना. नक्कीच काहीतरी गडबड-घोटाळा झाला असावा किंवा संबंधितांचा काही गैरसमज झाला असावा. वाट चुकून ते इकडे आले असावेत, असे वाटू लागले. पण नेमकेपणाने बोध काही होईना. ॲम्बॅसिडरमधून चंद्रपूर जिल्ह्याचे कलेक्टर श्री. जगदीश गुप्ता मोठ्या दिमाखात खाली उतरले. पाठोपाठ त्यांच्या सौभाग्यवती उतरल्या. सोबत मूल तालुक्याचे तहसिलदारही आले होते. सर्वजण सोमनाथ प्रकल्प पाहण्याच्या उद्देशाने आले होते. हे कळताच आम्ही सुटकेचा निःश्वास सोडला. हुश्श्... चला सुटलो एकदाचे. काही प्रॉब्लेम तर नक्कीच नव्हता. विदर्भातील काही जिल्हे नक्षलग्रस्त असल्याने तेथील कलेक्टरना व्यापक स्वरुपाची सुरक्षा व्यवस्था पुरविलेली असते. कलेक्टरांच्या अचानक येण्याने आमची धावपळ उडाली खरी पण तरीही अनाहुत पाहुण्यांचा यथायोग्य पाहुणचार केला. सर्वांचे चहापान आटोपल्यानंतर अरुणभाऊंनी माझी सर्वांशी ओळख करून दिली. तसे मोठ्याने हसत कलेक्टर मला म्हणाले, "डॉक्टर बघा, शेवटी तुम्हाला आमच्या विदर्भाकडे यावेचं लागले.

तुमच्या पश्चिम महाराष्ट्रात असा एखादा तरी □□□□□□□ □□□ □□ ?" □□□□□□□□□ □□□□□□□ सर्वजण सामील झाले. विदारक सत्याला त्यांनी विनोदाची झालर जोडली होती. सत्य पचवायला कटु असतं हेच खरं.

थोड्या वेळाने सर्वांना घेऊन मी सोमनाथ प्रकल्प दाखविण्यासाठी गेलो. कलेक्टर सर्व गोष्टींचे अगदी बारकाईने निरीक्षण करीत होते. अधून मधून प्रश्न विचारीत होते. माहिती घेत होते. प्रकल्प पाहून झाल्यावर येथील बऱ्याच गोष्टी आवडल्याचे त्यांनी आवर्जुन सांगितले. त्यानंतर तेथील शेताच्या एका बांधावर आम्ही बसलो. आपण कलेक्टर आहोत हेही ते विसरुन गेले होते. माणूस मातीतलाच असावा असे वाटत होते. सर्व शासकीय संकेत बाजूला सारुन ते वागत होते. जुनी ओळख असल्यासारखे मित्रत्वाच्या नात्याने माझ्याशी बोलत होते. एरव्ही एखाद्या सामान्य माणसाला कलेक्टरची भेट मिळणे किती जिकिरीचे असते. त्यासाठी बराच खटाटोप करावा लागतो. खस्ता खाव्या लागतात. तरीही भेट मिळेलचं याची शाश्वती नसते. पण आज याठिकाणी कलेक्टर महोदय सहजसाध्य झाले होते. हा केवळ बाबा आमटे या नावाचा महिमा होता. त्यांच्या प्रचंड सामाजिक कार्याचा करिश्मा होता. कलेक्टरसारख्या व्यक्तिलाही इथे नम्र, लीन व्हावेसे वाटले. दुरासाध्य रोगाने पिडीत झालेल्या व समाजाने बहिष्कृत ठरविलेल्या माणसांच्या पुनर्वसनासाठी जे प्रचंड विश्व येथे साकार केले होते त्या महामानवाच्या कार्यास मिळालेली ही पोच पावतीच होती. बराच वेळ गप्पा मारल्यानंतर गडबडीने कलेक्टर उठले अन् जायला निघाले. वेळ बराच झाला होता. निरोप घेताना मला म्हणाले, "डॉक्टर, खरेतर एका शासकीय कामानिमित्त मी मूलला आलो होतो. हाताशी अर्धा तास वेळ होता म्हणून इकडे आलो. पण इथे तीन तास कसे सरले ते कळलेच नाही. तिकडे लोक माझी वाट पाहत असतील. मला आता निघायलाचं हवं." माझ्याशी हस्तांदोलन करुन ते गाडीकडे वळले. गाडीत बसणार तोच त्यांना काहीतरी आठवल्यासारखे झाले. ते परत माझ्याकडे आले अन् मला हळूच म्हणाले, "डॉक्टर, दोन दिवस सहकुटुंब इथे मुक्कामास येण्याची इच्छा आहे. आले तर चालेल का?"

"सर केव्हाही या. आपले स्वागत असेल." मी त्यांना आश्वस्त केले. पुन:श्च निरोप घेऊन लवाजमा धावता झाला. क्षणात दृष्टिआड झाला.

बाबा आमटे खूप दिवसांनी कसरावदहून आनंदवनला आले होते. पु. ल. देशपांडे या घनिष्ट मित्राच्या विनंतीला मान देवून ते आता कायमचेच आनंदवन मुक्कामी आले होते. तब्बल दहा वर्षे त्यांनी आपल्या सर्व प्रकल्पांचा त्याग केला होता. आनंदवन येथे काही दिवस राहून ते आज सोमनाथला आले होते. खूपच त्रासलेले असावेत. त्यांच्या मुद्रेवरून तसे दिसत होते. पाकिस्तान यात्रेस सरकारने परवानगी नाकारल्याचा विलक्षण त्रास त्यांना झाला होता.

दोन दिवसानंतर एका सायंकाळी मी बाबांच्या समवेत फिरायला गेलो. आज बराच वेळ चालून झाले तरी ते काहीच बोलत नव्हते. त्यांच्या चेहऱ्यावर उदासपणं दाटलेलं. चेहरा खित्र दिसत होता. पण माझा मूड मात्र आज छान होता. बाबांशी काहीतरी भरभरुन बोलावे असे वाटत होते. परंतु त्यांच्या चेहऱ्याकडे पाहून मीही शांतच राहिलो. शांतपणे वाट तुडविताना शांतता अंगावर येत होती. अखेर न राहवून मी तिचा भंग केलाचं, मी बाबांना विचारले-
"बाबा, तुम्हाला काही त्रास होतोय का ?"
"नाही." ते कठोरपणे उत्तरले. आवाजात जरब होती. त्यामुळे पुढे काही बोलायचे धाडस मला झाले नाही. ते स्वतःच्या विचारात गढून गेले होते. फारसे बोलायला तयार नव्हते. थोडे बळ एकवटून विषयांतर करीत मी पुनःश्च त्यांना म्हणालो -
"बाबा, आम्हा तरुण पिढीकडे आज पैसा, वैभव, बुध्दी, जोश सर्व काही आहे पण आपण आयुष्यात नेमके काय करायला हवे ? कसे जगायला हवे ? कोणत्या मार्गाने पुढे जायला हवे ? जगण्याचा हेतू काय असायला हवा ? काहीच समजेनासं झालयं. डोक्यात नुसता गोंधळ माजलायं. काहीतरी नवीन, सृजनात्मक करावे असे सतत वाटत राहते पण नेमके काय करावे तेच सुचत नाही."

माझे बोलणे ऐकून त्यांचा उदास चेहरा एकाएकी फुलला. प्रसन्नतेची झालर चेहऱ्यावर झळकू लागली. युवकांचा, तरुण पिढीचा विषय निघाला की त्यांचा उत्साह नेहमीच द्विगुणित होत असे. अलिकडे तर त्यांच्या सर्व आशा-आकांक्षा युवकांवरचं केंद्रीत झाल्या होत्या. या देशात काही परिवर्तन किंवा क्रांती घडलीच तर ती केवळ युवकांमुळेच घडू शकेल, असा ठाम विश्वास त्यांना वाटत होता. त्यांच्या सर्व आशा-आकांक्षा तरुण पिढीवरतीचं एकवटलेल्या होत्या.

चालता-चालता बाबांची नजर दूरच्या क्षितीजाकडे वळली होती. भान हरपून ते बोलत होते -

“अरे प्रमोद, कोणतेही काम असे ठरवून सुरु करता येत नाही. पण... प्रत्येकाच्या आयुष्यात असा एखादा 'क्षण' नक्कीच येत असतो. मात्र तो पकडता यायला हवा. त्यासाठी मन संवेदनशील असायला हवं. प्रेम, करुणा, दयाभाव मनात जागृत असायला हवी. मी कुष्ठरोग्यांचे हे काम काही ठरवून सुरु केलं नव्हतं. त्यासाठी 'तो' प्रसंग घडावा लागला. एक महारोगी रस्त्याकडेला भर पावसात सडत होता. येता-जाता कित्येकांचे लक्ष त्याच्याकडे गेले असेल. पण माझे लक्ष गेले, अन् मला तो 'क्षण' पकडता आला आणि म्हणूनच आज एवढे मोठे काम उभे राहू शकले. आणि हो... आणखी एक गोष्ट लक्षात ठेव, काही जमत नाही म्हणून कधी रडायचं नाही. प्राप्त परिस्थितीला लगेच नमन करायचं नाही. अरे जातीवंत बी कोठेही पडले तरी ते उगवायला लाजत नाही. मी कुष्टरोग्यांबरोबर काम सुरु केलं तेव्हा लोक कुचेष्टेने म्हणायचेत; तुप-खारका खाल्लेला हा बामणाचा पोर काय दिवे लावणार? कसली सेवा करणार? पण ते काम मी श्रध्देनं केलं. त्यासाठी हृदयात दया, प्रेम, कणव असायला हवी. सभोवती जी गरीबी, अन्याय, अत्याचार आहे त्याप्रती मन संवेदनशील हवं.”

बाबा मनापासून भरभरून बोलत होते. बराच वेळ चालल्यानंतर आम्ही परत फिरलो. तेव्हा दिवेलागणीची वेळ झाली होती. दोन अनोळखी व्यक्ती बाबांची वाट पाहत निवासस्थानी वाटेतचं थांबल्या होत्या. त्यांना बाबांना आवर्जुन भेटायचे होते. आम्ही त्यांना ओलांडून पुढे जाणार तोवर त्यातील एक काळा, बुटकासा इसम पुढे आला -

"नमस्कार बाबा, मी मूल कोर्टाचा जज्ज. खास आपल्याला भेटण्यासाठी आलोय.” बाबांना आश्चर्य वाटले. आता ही काय नवीन भानगड ? कदाचित कोर्ट-कचेरीचा काहीतरी मामला असावा. मीही कोडयात पडलो. आम्ही सगळे बाबांच्या निवासस्थानी पोहोचलो. जज्जसाहेबांचा उचित मान ठेवून आदरातिथ्य केले गेले. जज्ज बाबांशी बोलण्यास खूप आतूर झालेले होते. त्यांचा कंठ दाटून आलेला. भावना आवेगाने ते बाबांना सांगत होते-

"बाबा, कदाचित तुम्हाला पटणार नाही पण, तुमचे एक पुस्तक वाचून मी जज्ज झालो ! होय, त्यावेळी शाळेसाठी लागणारे पैसे माझ्याकडे नव्हते. दहावीत

असतानाच मी शाळा सोडली. घरी कमालीची गरीबी, अठराविश्व दारिद्र्य पाणी भरत होतं. खूप बिकट परिस्थिती होती तेव्हा. नाइलाजास्तव शाळा सोडली. शेती कसायला सुरुवात केली. जवळपास पाच वर्षे शेतीत राबलो. असेच एकदा, आपण युवकांसाठी लिहिलेले पुस्तक वाचनात आले. दिवसभर रानात बांधावर बसून मी ते वाचून काढले. खूप प्रेरणा मिळाली. काहीतरी अमूल्य गवसल्याचा साक्षात्कार झाला. नवीन भूत अंगात संचारले ! शेतातून उठलो अन् पुन्हा शाळेची वाट पकडली. जिद्दीने दहावीचा अभ्यास सुरु केला. परीक्षा दिली, पास झालो. पुढे नव्या उमेदीने शिकत राहिलो. कालांतराने पदवीधर झालो. आता आत्मविश्वास बळावला होता. मग वकिलीच्या अभ्यासासाठी प्रवेश घेतला. पुढे वकील तर झालोच पण कालांतराने जज्जही ! सध्या मूल येथे माझी बदली झालीय. गेल्याच महिन्यात मी इथे रुजू झालोय. तुम्ही सध्या सोमनाथला आहात असं समजलं म्हणून खास आपणांस भेटावयास आलोय. माझी कित्येक दिवसांची इच्छा आज फलद्रूप झाली. खूप आनंद आणि समाधान वाटलं तुम्हाला भेटून बाबा" जज्जसाहेब भान हरपून बोलत होते. मी कानात प्राण ओतून ऐकत होतो. बराच वेळ ते बोलत होते. लहान मुलांच्या उत्साहाने बोलत होते. किती बोलू अन् किती नको असं त्यांना झालेलं. त्यांनी स्वत: काही कविताही रचल्या होत्या. सोबत ती वही घेऊन ते आलेले. त्यातील निवडक कविता त्यांनी बाबांना ऐकविल्या. जज्जआड लपलेल्या एका संवेदनशील कवीच्या मनस्वी निर्मितीला बाबांनी मनापासून दाद दिली. बराच वेळ कविता वाचन, चर्चा, गप्पागोष्टी यांत ते रमले. पण जेव्हा खूपच उशीर झाल्याचे त्यांच्या ध्यानी आले तसे लगबगीने उठले. चरणस्पर्श करून बाबांचा आशिर्वाद घेतला, आणि निरोप घेऊन निघून गेले. ते जाताच बाबांनी मला जवळ बोलाविले. माझ्यावर नजर रोखत मला म्हणाले, "मन संवेदनशील ठेव."

कर्म श्रेष्ठ दर्जाचे असेल तर एखादा सर्वसामान्य माणूसही उच्चपदास पोहचू शकतो अगदी महामानव बनू शकतो. स्वकर्माने मोठी झालेली माणसे अनेकदा आपल्या आजूबाजूस असतात पण ती आपणांस अज्ञात असतात. याचे एक अत्यंत स्पृहणीय उदाहरण म्हणजे डॉ. अभय बंग व डॉ. राणी बंग !

१९८६ साली त्यांनी गडचिरोली जिल्ह्यात शोधग्राम (सर्च) नावाची एक संस्था स्थापन केली आहे. आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी झटणारी ही

अत्यंत नावाजलेली संस्था म्हणून ओळखली जाते. शोधग्राम म्हणजेच 'सर्च'. (Society for Education, Action and Research in Community Health). डॉ. अभय व डॉ. राणी बंग दोघेही उच्च विद्याविभूषित. दोघेही एम.डी. डॉक्टर. डॉ. अभय हे M.D. Medicine असून ते अमेरिकेत प्रॅक्टिस करीत होते. कालांतराने अमेरिकन जीवनाचा त्याग करून ते इथे मागासलेल्या अप्रगत आदिवासी भागांमध्ये काम करण्यासाठी म्हणून आले आणि येथीलच एक होऊन गेले. आदिवासींच्या समस्यांचे योग्य निदान करून उपाययोजना करण्याबरोबरच त्याविषयीचा अभ्यासपूर्ण सुसंगत तपशील समाजापुढे मांडण्याचे महत्वाचे कार्य शोधग्राम ही संस्था करीत असते. तळागाळातील गोर-गरीब आदिवासींचे लोकशिक्षण, आरोग्य, बालसंगोपन, युवकांसाठीचे शिक्षण व प्रबोधन यांसारखे कार्यक्रम याठिकाणी राबविले जातात. सातत्याने स्वयंअध्ययन व मार्गदर्शनही सुरु असते. 'लोकसंख्येवर नियंत्रण ठेवायचे असेल तर बालमृत्यूदर घटवा' हा अभय बंग यांचा थोडासा विचित्र अन् विसंगत वाटणारा पण अभ्यासपूर्ण शोध होता. लोकसंख्या आणि बालमृत्यू यांचा त्यांनी शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करून महत्त्वपूर्ण तपशील शासनास पाठविला होता. या अहवालाची दखल शासनास घ्यावी लागली होती. त्यामुळे देशाच्या लोकसंख्या आयोगावर बंग दांपत्याची निवड करण्यात आली होती.

डॉ. अभय व राणी बंग यांना भेटण्याची माझी खूप दिवसांपासूनची तीव्र इच्छा होती. एके दिवशी सकाळी लवकर उठलो आणि सतीशला सोबत घेऊन शोधग्राम पाहण्यास गेलो. सोमनाथपासून शोधग्रामचे अंतर साधारण ७०-८० किमी असावे. आम्ही दोघे एसटीने प्रवास करून सकाळी ११ वाजता तिथे पोहचलो. ' शोधग्राम नावाचा प्रकल्प तो हाच ' हे सुरुवातीला मला मुळीच पटेना. कारण इथे साधेपण इतकं जपलयं की, तेच त्याचं वैशिष्टय ठरत होतं. सिमेंट-काँक्रीटची इमारत कुठे नावालाही दिसत नव्हती. पण प्रकल्प अत्यंत वैशिष्टयपूर्ण होता. स्थानिक वस्तूंचा वापर करुन छोटी-छोटी घरे उभारण्यात आली होती. घरांच्या भिंती आत- बाहेरून लाल मातीने रंगविलेल्या होत्या. या छोटया घरातूनच रुग्ण ॲडमिट केले होते. निसर्ग आणि आदिवासींच्या जवळ जाण्याचा आणि परकेपणा पुसून टाकण्याचा हा स्तुत्य प्रयत्न होता. बंग दांपत्याने मोठ्या कल्पकतेने तो वास्तवात आणलेला. येथे साधारण पन्नास एक कार्यकर्ते

स्वइच्छिने काम करीत होते. भरभरुन योगदान देत होते. एकंदरीत या संस्थेतील वातावरण, कार्यकर्त्यांचा कामातील उत्साह, आपुलकीची भावना, स्नेह सारे खरोखरीच उल्लेखनीय होते !

सर्व प्रकल्प चौफेर फिरुन पाहिल्यानंतर डॉ. अभय व डॉ. राणी बंग यांची भेट घेतली. परंतु आदल्या दिवशीच्या खूपच व्यस्त कार्यक्रमामुळे दोघेही थकले होते. त्यामुळे त्यांच्याशी जास्त बोलणे झाले नाही. उभयतांचे पेहराव आणि एकंदरीत राहणीमान अगदी ओळखण्यापलिकडे साधे होते. वास्तविक आणखी काही काळ मी व सतीश शोधग्रामला थांबणार होतो. परंतु सकाळपासूनच पावसाने पिच्छा पुरविला होता. त्यामुळे आमच्या उत्साहावर पाणी फेरले. नाइलाजास्तव परतीची वाट लवकर धरावी लागली. त्यातच बंग दांपत्याशी जास्तीचा संवाद साधता आला नाही याचेही दुःख होतेच. पण... एक चांगली संस्था पाहिल्याचा, अनुभवल्याचा आनंद मनाला खूप उभारी देवून गेला. हेही नसे थोडके !

प्राचीन शिल्पकलेचा अप्रतिम नमुना असलेले मार्कंडा देव हे विदर्भातील हेमाडपंथी मंदीर देशविदेशात सुप्रसिद्ध आहे. साधारण ११ व्या शतकात याचे बांधकाम पूर्ण झाले असावे. गडचिरोलीच्या चार्मोशी तालुक्यात वैनगंगा नदीच्या तीरावर हे मंदीर वसले आहे. याठिकाणी वैनगंगा नदी उत्तरवाहिनी असल्यामुळे या तीर्थक्षेत्रास खूप पवित्र मानले जाते. मार्कंड्याला विदर्भाची काशी म्हणूनही ओळखले जाते. महाशिवरात्रीला येथे खूप मोठी यात्रा भरते.

यावर्षी सोमनाथला संत्र्याचे अमाप पीक आलेलं. झाडेच्या-झाडे संत्र्यांनी लगडलेली. संत्र्यांचे घड पानातून डोकावत होते. माकडांची चंगळ होती. पण कुष्ठबांधवांचा पहाराही कडक होता. आता इतक्या संत्र्यांचे करायचे काय? हाही प्रश्न होताच. मार्कंडदेवाची महाशिवरात्रीला भरणारी यात्रा खूप मोठी, अलोट गर्दीची अन् अनेक दिवस-रात्र चालणारी. महाशिवरात्र तोंडावर होती. ही संधी साधायची असे आम्ही ठरविले. बघता बघता महाशिवरात्रीचा दिवस उजाडला. नियोजनबरहुकुम सकाळी लवकर उठून संत्री तोडायला सुरुवात केली. एक मेटॅडोर गाडी पूर्ण भरेल इतकी संत्री तोडली. गाडी काठोकाठ भरली. सायंकाळच्या सुमारास मी, नंदू ड्रायव्हर आणि चार-पाच कुष्ठबांधव यात्रेला निघालो. रात्री दहा वाजेपर्यंत आम्ही यात्रेत पोहचणार होतो. तिथे रात्रभर जागून संत्री विकायची असे

आमचे नियोजन होते. त्याबरहुकुम यात्रेत पोहचताच मुख्य रस्त्याच्या कडेला एक मोकळी जागा निवडून साफ केली. तिथे मेटॅडोर मोकळा केला. संत्र्याचा भव्य मोठा ढीग व्यवस्थित रचला. त्यानंतर आम्ही सर्वांनी सादवायला सुरुवात केली. झटपट संत्री विकली जाऊ लागली. आम्ही रात्रभर सादवून संत्री विकत राहिलो. बरीचशी संत्री विकली गेली. बघता-बघता ढीग संपत आला.

रात्रभरचे जागरण आणि ओरडून संत्री विकल्यामुळे भल्या पहाटे पोटातील कावळे जागे झाले. सर्वांना कडाडून भूक लागली होती. पण भल्या पहाटे खायचे काय ? खाण्यासारखे जवळ काहीच शिल्लक नव्हते. सोमनाथहून रात्री निघताना जे जेवण सोबत आणले होते ते केव्हाच संपलेले. आता भूक तर प्रचंड लागली होती. समोर अजूनही संत्री शिल्लक होती. मला भूक सहन होईना. मग मी पटकन एक संत्रे उचलले आणि विनाविलंब फस्त केले. पण भुकेचा कडाका एवढा होती की, दुसरे उचलून कधी संपविले ते कळलेच नाही. मी तिसऱ्याला हात घातला तसे सर्व सहकारी माझ्याकडे पाहू लागले. ' अरे, तुम्हीपण घ्या ना ' मी त्यांना आग्रह करु लागलो. पण त्यांनी दुर्लक्ष केले. ते संत्री खाईनात म्हणून मी पुन:श्च आग्रह केला. पण काही केल्या संत्र्याला हात लावेनात. खरेतरं त्यांनाही खूप भूक लागलेली. भूकेची व्याकुळता त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती. मला राहवलं नाही. मी पुन्हा एकदा संत्री खा म्हणून सर्वांना विनंती केली. त्यांनी नकार दिला अन् माझ्याकडे दुर्लक्ष केले. मला समजेना, हे लोक असे का वागत आहेत ? कितीही विनंती केली तरी संत्री का खात नाही आहेत? कदाचित संत्री त्यांना आवडतच नसावीत. तसेही असेल काय माहित? मी पुन्हा त्यांना म्हणालो, “ठीक आहे राहू देत संत्री, चला आपण नाष्टा तरी करुया. आपल्याजवळ संत्रे विक्रिचे बरेचसे पैसे साठलेत. नाष्ट्यासाठी थोडे खर्च झाले तरी हरकत नाही.”

माझे बोलणे ऐकून सर्वांनी नकारार्थी मान डोलावली. ते आता संत्रीही खात नव्हते अन् नाष्टाही नाकारत होते. काय म्हणावे यांना? “अरे असे का करताय? तुम्ही काहीच कसे खायला मागत नाही आहात. प्रत्येक गोष्टीला का नकार देताय ? चला उठा, किमान चहा तरी घेऊया." मी सर्वांची आर्जवे करीत होतो. पण जागचे हलायला कोणी तयार नव्हते. मी गोंधळात पडलो. माझा

गोंधळलेला चेहरा पाहून नंदू माझ्याजवळ आला आणि समजाविण्याच्या सुरात मला सांगू लागला-

“डॉक्टर साहेब, त्याचं काय आहे, जेव्हा आम्ही संस्थेच्या कामासाठी बाहेर असतो तेव्हा बाहेरचं काहीही विकत घेऊन खात नाही. अगदी संस्थेचा पैसा आमच्या खिशात खुळखुळत असला तरीही, फारच अडचण आली तर संस्थेत फोन करून परवानगी घेतो. पण पूर्वपरवानगी शिवाय संस्थेच्या कोणत्याही वस्तूला किंवा पैशाला हात लावत नाही. बाहेरगावी जाताना जो शिधा किंवा जेवण सोबत दिलेलं असतं, त्यावरच आम्ही आमची गुजराण करतो. बाहेरचं काहीही खात नाही. अगदी चहासुध्दा नाही.”

नंदूचे उत्तर ऐकून मी तर चाटच पडलो. अक्षरश: सर्द झालो. पुढे काय बोलावे तेच सुचेना. मला खरोखरच त्या सर्वांचे कौतुक आणि आश्चर्य वाटत होते. रात्री निघताना जे अन्न सोबत बांधून दिले होते तेवढ्यावरच त्यांनी आपली गुजराण केली होती. स्वकष्टाने पिकविलेली संत्री आणि त्याच्या विक्रिचे पैसे दोन्ही जवळ असतानाही त्यांच्या मनाचा तोल ढळला नव्हता. त्या सर्वाची बाबांवर प्रचंड श्रध्दा होती. खरंखुरं प्रेम होतं. बाबांनी जी मार्गदर्शक तत्त्वे त्यांना आखून दिलेली होती त्या परिघातच त्यांचं वर्तन होतं. कोठेही कसूर बाकी नव्हती. बाबांच्या नजरेआडही त्यांनी ती तत्त्वे अगदी कसोशीने जपली होती. व्ही. शांताराम यांच्या ' दो आँखे बारह हाथ ' सिनेमातील जीवंत दृष्य मी समोर अनुभवत होतो. एकीकडे स्वकष्टाचा हक्काचा मोबदला ते स्पर्शितही नव्हते तर दुसरीकडे मी त्यांच्या कष्टाचे फळ विना मोबदला चाखत होतो... मी शरमिंदा झालो.

दिवसांमागून दिवस सरत होते. सोमनाथला येऊन मला बरेच महिने लोटले होते.येथील बऱ्याचशा गोष्टीतील नावीन्य माझ्या दृष्टीने आता संपुष्टात येत चालले होते.नव्याचं नावीन्यपणं सरलं होतं.नव्याने काही करण्यासारखे इथं फारसं उरलं नव्हतं. दिवस कंटाळवाणे होवू लागले होते. काहीतरी सृजनशील काम करण्याची उर्मी मात्र गप्प बसू देत नव्हती. त्यातच घराकडील विचारही अलिकडे वारंवार मनात डोकावत होते. आपल्या काळजीने आई आजारी पडलीय हे अधूनमधून समजत होतं. माझ्या लग्नाची तिला खूप काळजी लागून राहिलीयं हेही समजत होतं. घरातील सर्वांना अडचणीत टाकून मी इकडे आलो होतो, हेही तितकचं सत्य होतं. मित्रमंडळी आणि नातेवाईकांचे चेहरे नजरेसमोर जसजसे

तरळत होते तसतसे अस्वस्थता अजूनच वाढत होती.मनाची नुसती घालमेल होत होती. मन दोलानमय झालं होतं. द्विधा मन ठोस निर्णय घेत नव्हतं.

'आपण बाबांच्या कानावर ही गोष्ट घालूया का? ते नक्कीच काहीतरी मार्ग सुचवितील. खरचं आपण त्यांच्याशी चर्चा करायला हवी. आपल्या घरची सर्व कल्पना त्यांना द्यायला हवी.' असा विचार अलीकडे माझ्या मनात सातत्याने डोकावत होता. पण त्यांना सांगायचे कसे? समजवायचे कसे? मन धजावत नव्हते. कारण माझ्या सोडून जाण्याने त्यांना खूप वाईट वाटेल, हा विचार मला मग आणखीनचं कमजोर बनवी. असे झाले की, मी मनातील सर्व जळमटे बाजूला ठेवून स्वत:ला कामात गुंतवून घेई. आज पुन्हा मामेभावाचे पत्र आले होते. त्याने निर्वाणीचा इशारा दिला होता. मला गावी घेऊन जाण्यासाठी इकडे यायचे म्हणत होता. आईच्या तब्येतीचा आणि माझ्या लग्नाचा सूर त्यात पुनःश्च उमटला होता. माझी मन:स्थिती पुन्हा-पुन्हा दोलानमय होत होती. दिवस असेच सरत होते.

अचानक एके दिवशी मी निर्णय घेतला. बाबा सध्या आनंदवन मुक्कामीच होते. मी पहाटे लवकर उठलो. रात्री झोपण्यापूर्वी मनाचा ठाम निर्धार झाला होता. सकाळी ओपीडी लवकर आटोपून जेवण केले. कालचे मामेभावाचे पत्र व्यवस्थित घडी करुन खिशात ठेवले आणि आनंदवनाची वाट धरली. काहीही करून बाबांना आज भेटायचेचं होते. माझा निर्णय पक्का होता. मला घरी परतायचे होते. दोपहर प्रहरी आनंदवनला पोहचलो. चौकशी केली, बाबा त्यांच्या खोलीतच होते. मी तडक तिकडे वळलो. सरळ जावून बाबांना भेटायचेचं, मनी विचार पक्का होता. पण, दाराजवळ जाताच मनाचा बुरुज ढासळू लागला. पाऊल पुढे उचलेना. काय करावे ? आत जावे की नको ? मन शंकाकूल झाले. बाबा आपल्याला समजावून घेतील का ? आपल्या भावना त्यांच्यापर्यंत पोहोचतील का ? बरे, त्यांना सांगावे तरी कसे ? ते आपल्याला ऐकून तरी घेतील का ? की धुडकावून लावतील ? मला काहीच समजेनासे झाले होते. पुढे जायचे धाडस होत नव्हते. पण शेवटी मनाचा दगड करून एकदाचे दार लोटले.

समोरील बेडवर बाबा पहुडले होते. त्यांच्या शेजारी अंधशाळेत शिकणारी एक मुलगी उभी होती. एका बाजूला त्या मुलीचे आईबाबा बसले होते. आपसांत त्यांचे काही हितगुज चालले होते. मी आत जाताच बाबांना नमस्कार केला.

त्यांनी मला जवळ बसण्याची खूण केली. मी बेडशेजारी खेटून बसलो. बेडवर आडवे पडूनच त्या सर्वांशी बाबा संवाद साधत होते. विषय काहीतरी गंभीर होता, एवढे कळत होते. मी कान देवून ऐकू लागलो. पण कसलाच उलगडा होत नव्हता. थोडया वेळाने ती अंध मुलगी उठली अन् आपल्या आई-बाबा सोबत जायला निघाली. तसे बाबांनी त्या मुलीचा हात आपल्या हातात घेतला अन् तिला विचारले

" खरेच तू मला सोडून जाणार ?"

" हो." ती म्हणाली.

“ जातेस तर जा." बाबांनी झटकन तिचा हात सोडला. क्षणात त्यांच्या डोळ्यातून अश्रूधारा वाहू लागल्या. ते खूपच भावनाविवश झाले होते. इतका मोठा माणूस आणि चक्क रडतोय. बाबांना रडताना मी प्रथमच पाहत होतो. तिथे सगळेच स्तब्ध झाले होते. थोडया वेळाने ते तिघेही निघून गेले. बाबांनी स्वत:ला आता सावरले होते. भावनांचा आवेग ओसरला होता. पण काही क्षणच्....अचानक त्यांच्या चेहऱ्यावरील भाव पालटू लागले. अगतिकतेची जागा आता कठोरतेने घेतली होती. चेहरा फुलु लागला. डोळ्यात अंगार उतरले. रागाने चेहरा लालबुंद झाला. श्वासही आता चढतीला लागला. क्षणात पालटलेले बाबांचे हे रुप मी अचंबित होवून पाहत होतो. काही क्षण असेच गेले. मी शांत बसून होतो. थोडया वेळाने त्यांची तंद्री भंग पावली. माझ्याकडे पाहत ते मला सांगू लागले -

“प्रमोद, आताची ही मुलगी पाहिलीस ना, लहानपणी तिची दृष्टी गेली म्हणून तिच्या पालकांनी तिला इथे आणून सोडले होते. आंधळी मुलगी म्हणजे डोईवर फुकाचा भार म्हणून तिचा त्याग केला होता. त्यांना तिचा काहीच उपयोग होणार नव्हता. खायला कार अन् धरणीला भार... बिनकामाची मुलगी म्हणून आईबापाने तिला इकडे आणून सोडले होते. तो दोन वर्षाचा निष्पाप कोवळा जीव पाहून मला खूप वाईट वाटलं. सख्ख्या आईबापाने तिला वाऱ्यावर सोडलं होतं. केवळ वाईट वाटून उपयोग नव्हता. तो जीव आता जगवायलाच हवा होता म्हणून मी आणि साधनाने तिला पदरात घेतलं. पोटच्या गोळ्याप्रमाणे तिचा सांभाळ केला. सतत हवं नको ते पाहिलं. कसलीही तोशिस लागू दिली नाही. अगदी तळहातावरच्या फोडाप्रमाणे जपलं. खूप लाडकोड केले तिचे आम्ही आणि तीही इथे चांगलीच रुळली. तिनेही आम्हांस खूप जीव लावला. आम्हा दोघांना

तिचा लळाच लागला. योगायोगाने मुलगी जात्याच हुशार निघाली. मग तिला आम्ही खूप शिकवायचं ठरवलं. थोडी मोठी झाल्यावर एकदा मला म्हणाली सुध्दा, बाबा, मला खूप शिकायचयं, मोठं व्हायचयं. तिचे बोल ऐकून खूप आनंद झाला त्यावेळी मला. म्हंटलं ठीक आहे, 'शिकतेस तर शिक. खूप खूप मोठी हो. माझा आशीर्वाद आहे तुझ्या पाठीशी. तू तुझ्या दृष्टीचा विचार करु नकोस. फक्त तुझ्या अभ्यासाचा विचार कर बाळा. एक दिवस तू हायकोर्टात वकिल होशील, अशी मला खात्री आहे.' खरेच तिने ही गोष्ट मनावर घेतली. प्रामाणिकपणे अभ्यास करु लागली. प्रत्येक वर्षी ती चांगल्या मार्कांनी पास होत गेली. मग आमचाही उत्साह वाढला. ती दहावीत असताना अचानक एके दिवशी तिला थोडसं अंधुकस दिसू लागलं. अंशत: का होईना तिची दृष्टी परत आली होती. मला आणि साधनाला खूप आनंद झाला. किमान वैयक्तिक गोष्टी तरी ती स्वत: करु लागेल असा विश्वास वाटू लागला.

पण कोठूनशी ही बातमी तिच्या पालकांना समजली कोण जाणे? तसे ते धावतच आले. मुलीला घरी घेवून जाण्यासाठी आणि क्षणात मुलगीही तयार झाली. मला वाईट वाटतयं ते याचचं की, या तान्हुल्या जीवाला आम्ही आईची ऊब दिली,वडिलांचे प्रेम दिलं. हवं नको ते सारं पाहिलं अन्.....एका क्षणात ही मुलगी आम्हाला सोडून चालली. तिला आमच्याबद्दल काहीच कसं वाटलं नाही? इतकी वर्षे तिला पोटच्या गोळ्याप्रमाणे वाढवलं, निरंतर मायेची सावली धरली, ओलावा दिला, काय हे सगळं निरर्थक होतं का? इतक्या वर्षांचं प्रेम, ममता, वात्सल्य याला काहीच का अर्थ नाही? ज्या जन्मदात्यांनी तिचा केवळ तिरस्कारच केला, तिला झिडकारलं, ती आता त्यांच्यासोबतच जायला निघाली. आम्ही तिच्यासाठी आता कोणीच उरलो नव्हतो. इतकी वर्षे ती आम्हाला काय समजत होती, आई-बाप की केवळ पोशिंदे ? काय म्हणावे या कर्माला ? किती सहजपणे एका क्षणात ती मला सोडून निघून गेली, खरचं, माणसाची जात कशी बेईमान असते ते बघ."

मी बाबांकडे पाहतच राहिलो. संपूर्ण शरीर रागाने थरथरत होते. चेहरा कठोर, लालबुंद झाला होता. जिच्यावर स्वत:च्या मुलीपेक्षाही जीवापाड प्रेम केलं, जीव लावला तीच त्यांना आता सोडून चालली होती आणि... नेमकी हीच गोष्ट बाबांच्या जिव्हारी लागली होती, खूपच वाईट वाटत होतं त्यांना. ज्या निर्दयी

पालकांनी पोटचा गोळा अंध, निरुपयोगी आहे म्हणून टाकून दिला होता, त्यास थोडी दृष्टी प्राप्त होताचं या स्वार्थी पालकांना मायेचा पान्हा फुटला होता. तिला परत न्यायला ते धावून आले होते.

बाबांना याहूनही वाईट वाटत होतं ते याचं की, या मुलीचं भवितव्य अंधःकारमय होणार होतं. तिचं करिअर बनण्याआधीच बिघडणार होतं. पुढील शिक्षणास लगाम बसणार होता. कदाचित ते या कोवळ्या मुलीचे कोठेतरी लग्न लावून देणार होते. चूल आणि मूल यातच ती घूसमटून निघणार होती. एका जात्याच हुशार मुलीचा बळी जाणार होता. संसाराच्या ग्रहणानं उगवतीचा सूर्य झाकोळला जाणार होता. दृष्टी आली होती पण तिची सृष्टी बरबादीच्या उंबरठ्यावर उभी होती.

बाबा बोलत होते. मी शांतपणे ऐकत होतो. खरेतर इकडे माझी अवस्था धरलं तर चावतयं अन् सोडलं तर पळतयं अशी झालेली. हात हलकेच खिशाकडे गेला. पत्राची घडी तशीच शाबूत होती. मी हळूच उठलो. बाबांचा निरोप घेतला अन् परत सोमनाथची वाट धरली. 'आयुष्याची वाटचाल म्हणजे अज्ञाताचा प्रवास असतो' असं कोणीतरी म्हंटलयं ते काही उगीच नव्हे.

....आणि अचानक एके दिवशी माझा मामेभाऊ सोमनाथला दाखल झाला. मला गावाकडे परत नेण्यासाठी तो अनाहुतपणे आला होता. सोबत लहान बंधू विनोदही आला होता. अचानक झालेल्या हल्ल्याने सावज गोंधळून जावे तशी माझी अवस्था झाली. त्यांना चकवा देणे आता अशक्य होते. 'पोराच्या डोक्यावर परिणाम झालायं म्हणून ते दूर कुठल्यातरी बाबाच्या आश्रमात जावून राहिलयं' अशी वंदता माझ्याबाबत मित्रमंडळी, शेजारपाजारी आणि पै-पाहुण्यांत अगोदरच उठलेली होती आणि विशेष म्हणजे ती दृढही झालेली होती, कोकणात चांगला चाललेला दवाखाना बंद करून बाबा आमटेंना भेटण्यासाठी मी आनंदवनी आलो होतो. या सर्व घटनांमुळे माझ्या घरचे लोक अगोदरच खचलेले. त्यात या अजब वंदतेमुळे ते आणखीनच खचले होते. मातोश्रींनी तर हायचं खाल्ली होती. 'अगोदर गावाकडे येवून लग्न कर. मग कोठे जायचे तिकडे जा.नाहीतर नंतर कोणी मुलगीही देणार नाही..असालकडा गेल्या कित्येक महिन्यांपासून त्यांनी माझ्या पाठी लावलेला. या धक्क्याने आई आजारी पडलेली. तिने अंथरूण धरलेले. आपल्या मुलाला कोणी मुलगी दिली नाही तर आयुष्यभराचे ब्रम्हचर्य त्याच्या

गळी पडेल, अशी भीती आईला सतत वाटत होती. पण मी ऐकतच नाही हे पाहून दोघे बंधू मला जबरदस्तीने गावी घेऊन जाण्यासाठी आले होते.

बाबा आमटे म्हणजे कोणी वीतभर दाढी वाढविलेला, भगवी वस्त्रे परिधान करून प्रवचन-किर्तन करणारा एखादा बुवा किंवा गोसावी असावा. भक्तांचा गोतावळा गोळा करून एखाद्या आश्रमात बसलेला असावा अशी दृढ संकल्पना गावाकडील सर्वांच्या मनात ठाम बसली होती. अशा बाबाचे शिष्यत्व पत्करून आपलं पोरगं त्याच्या नादी लागलयं ही कल्पनाच त्यांना काही केल्या सहन होत नव्हती. पण बाबा आमटेंविषयी असा समज होण्यात बिचाऱ्यांचा काही एक दोष नव्हता. बाबा आमटे म्हणजे नेमकी कोण असामी हे त्यांना कसे ठावूक असणार होते ? बाबा म्हणजे एखादा बुवा किंवा गोसावी असावा एवढीच भरारी त्यांच्या कल्पनेनं मारली होती. गावाकडील मंडळी आयुष्यभर घरदार आणि शेतीवाडी यातच मशगुल होते. गावकुसाआतच त्यांचे जग संकुचित झालेले होते. दोघे बंधू मला जबरदस्तीने गावी न्यायला आले होते खरे पण इकडे माझी द्विधा मनोवस्था अवस्था झालेली. एकीकडे गावाकडील गोतावळा माझ्या मनास साद घालीत होता. त्यातच वृध्दत्वाकडे झुकलेली.... माझ्या आठवणीने रडणारी.... कणाकणाने झुरणारी....आजारी पडलेली माझी जन्मदाती आई ! ....आणि दुसरीकडे....बाबा आमटे....त्यांचे इथले हे अफाट विश्व. हे भव्यदिव्य प्रकल्प....ही इथली जिवंत शिल्पे ! रक्ताच्या नात्या -पलिकडील हा गोतावळा.... आता आपला जीव गुंतलाय त्यांच्यात. आता आपला जीव गुंतलाय त्यांच्यात... जिव्हाळा लळा की कळवळा ?... काय म्हणावं या मायाजालासं ?....कसे सोडून जावे या सर्वांना ? कर्तव्याशी प्रतारणा कशी करु मी ?....कसा निष्ठुर होवू मी ?....इकडे आड अन् तिकडे विहीर.... जावं की नको.... जावं की नको ?... जावं तर कोठे ?... गुंता सोडवत जावा तसा तो आणखी वाढू लागला.... अधिकाधिक गुंतत जावू लागलो... अडकित्त्यात सापडलेल्या सुपारीसम मन झालं होतं.

माझ्या मनातील घुसमट, बैचेनी दोघा बंधूंना मी सांगूही शकत नव्हतो. ते वेगळ्याच मूडमध्ये होते. त्यांना त्यांचे 'मिशन' पूर्ण करायचे होते. स्पेशल कामगिरीसाठीच तर ते आले होते. 'लवकर निघूया' म्हणून दोघांनी सारखा लकडा लावलेला. तरीही समजूत घालून मी त्यांना चार दिवस ठेवून घेतले. सोमनाथचा संपूर्ण प्रकल्प दाखविला. आजूबाजूची काही ठिकाणेही दाखविली. मनातली

घुसमट मनातच ठेवून हसऱ्या चेहऱ्याने त्यांचा पाहुणचार करीत राहिलो. हवे-नको ते पुसून राहिलो. पण एके दिवशी रात्री दोघा बंधूंनी मला निर्वाणीचा इशारा दिला. अन् माझ्या होकाराची वाटही न पाहता साहित्याची आवरा आवर सुरु केली. बॅग भरली जावू लागली तशी माझी घालमेल वाढू लागली. मी त्यांची खूप विनवणी-आर्जवे केली पण दोघेही आता ऐकून घेण्याच्या मनःस्थितीत नव्हते. खूप आक्रमक झाले होते. मी गोंधळून गेलो. काही सुचेनासे झाले. त्यांनी माझा पुरता अर्जुन करुन टाकला होता.

"आपण आनंदवनला जावून बाबा आमटेंना अगोदर भेटू अन् मग घरी जावू." - मी गुगली टाकली. पण ते ऐकायला तयार नव्हते. व्यवस्थित समजावून सांगीतले, तेव्हा दोघे तयार झाले. खरेतर हा 'बाबा' नेमका कोण आहे हे पाहण्याची उत्सुकता त्यांनाही लागून राहिली होती.

सरतेशेवटी तो दिवस उजाडला. आज सोमनाथ सोडायचे होते कायमचेच... आता परत इकडे येणे व्हायचे नव्हते. भविष्याचा ताळेबंद कोणाकडे होता ? अंत:करण भरून आले होते. कंठ दाटला होता. पाऊल उचलत नव्हते. सकाळपासून मी आतल्या-आत रडत होतो. आवराआवर करून मी खोलीबाहेर पडलो. समोर हरीभाऊ-शोभाताई, अरुणभाऊ-ऊषाताई, विजू-गीता, नामदेव-संगीता असे सर्वजण उभे होते. सर्वांचे डोळे पाणावले होते. कोणी कोणाशी बोलत नव्हते. शब्द अबोल झालेले. जड पावलांनी मी त्यांच्याकडे गेलो. सर्वांना नमस्कार केला. मनोमन सर्वांचे आभार मानले. त्यांच्या सोबतच्या व्यतित क्षणांनी मी खूप समृध्द झालो होतो. माझ्या आयुष्यातील ते सर्व सुवर्णक्षणच होते. वेदनेच्या डोहातही सुखाचे क्षण वेचले होते. शब्दापलिकडील नाती निर्माण झाली होती. निर्माण झालेल्या भावबंधात मी पुरता गुरफटून गेलो होतो. हे सर्वजण माझे आप्त, सगेसोयरे बनले होते.कसा विसरणार होतो मी यांना? रक्तापलिकडील ही नाती आता दुरावणार होती....कायमचीच. पुन्हा कधी या सर्वांची भेट होईल का ? भविष्याच्या अंधारात मन चाचपडत होते. आनंदवनला जाणारी गाडी समोर उभी होती. पाय उचलत नव्हता. मणा-मणाच्या बेड्या पायात घातलेल्या बंद्यासारखी माझी अवस्था झाली होती. बॅग आणि इतर काही सामान मी गाडीत ठेवले. कपडे आणि आठवणींनी भरलेली बॅग खूपच वजनदार भासत होती. आम्ही सर्वजण गाडीत बसलो. मी मुद्दामच मागील सीटवर एकटाच बसलो.

गाडी सुरु झाली. सर्वांची पुन्हा एकवार नजरानजर झाली. इतका वेळ पापण्याआड लपलेले अश्रू बांध फुटल्यासारखे वाहू लागले. गाडीने वेग घेतला. सोमनाथचा परिसर पाठी पडू लागला. अश्रूपलिकडील दुनिया आता धूसर होऊ लागली. बघता-बघता नाहीशी झाली.

आनंदवनला एक दिवस मुक्काम करून मगच पुढे गावी जायचे असे आम्ही ठरविले होते. तत्पूर्वी बाबांची भेट अगत्याची होती. आनंदवनला पोहचताच फ्रेश झालो आणि दुपारचे जेवण उरकले. आता हाताशी वेळ तोकडा होता. थोडी विश्रांती घेऊन मी बाबांना भेटावयास गेलो. सोबत बंधुद्वय होतेच. माझ्या मनातील धाकधूक काही केल्या कमी होत नव्हती. 'मी गावी परत जातोय' हा विषय बाबासमोर काढायचा कसा? आणि हा विषय ते कसा घेतील, या विवंचनेत होतो. मनाशी बराच खल केला आणि छातीवर दगड ठेवला. सर्व धीर एकवटून बाबांसमोर उभा राहिलो. दोघा बंधूंचे इकडे येण्याचे खरे कारण त्यांना सांगितले. गावाकडील, माझ्या घरातील सर्व गोष्टी त्यांना बयाजवार कथन केल्या. मी बोलत होतो, ते काहीच बोलत नव्हते. केवळ शांतपणे मान डोलावत होते. त्यांना खूप वाईट वाटत होतं, मला ते जाणवत होतं. त्यांचा चेहरा निर्विकार, धीरगंभीर भासत होता, बाबा काय प्रतिक्रिया देतात याची मला चिंता लागून राहिली होती. त्यांच्या रागाचा कडेलोट केव्हा होतोय याचीच वाट पाहत होतो. पण, परिस्थितीमुळे मला गावी जावे लागणार आहे हे एव्हाना त्यांच्या ध्यानी आले होते. शेवटी त्यांनी होकार भरला. त्यांना अगदी गलबलून आले होते. आवाज कातर झाला होता.

बाबांना भेटून मी बाहेर आलो तर समोरील पडवीत साधनाताई उभ्या होत्या. त्यांनी मला जवळ बोलाविले. सोमनाथहून असे अवचित येण्याचे कारण विचारले. तेव्हा, मी कायमचा गावी परत जातोय म्हणून त्यांना सांगितले. पुन:श्च गावाकडील सर्व गोष्टी साधनाताईंनाही सांगितल्या. तशा त्याही नाराज झाल्या. पण आपली नाराजी लपवित उदास हसल्या. 'थोडा वेळ इथेच थांब' असे म्हणून आतल्या खोलीत गेल्या. थोडया वेळाने एक फुलांचा हार, नारळ आणि देव पूजेसाठी वापरल्या जाणाऱ्या काही चीजवस्तू घेऊन बाहेर आल्या. या सर्व गोष्टी माझ्या हाती देत मला म्हणाल्या -
“गावी गेलास की औदुंबरच्या दत्ताला माझ्यावतीने हे सर्व अर्पण कर.”

"ठीक आहे," मी म्हणालो.
"आठवणीने अर्पण करशील ना?" त्यांना खात्री वाटत नसावी.
"तुम्ही निश्चिंत असा. मी जरी नास्तिक असलो तरी तुमचे काम होईल." मी त्यांना खात्री दिली. तशा त्या हसल्या.

साधनाताईंचा निरोप घेऊन गेस्टरूमवर आलो. सगळ्या वस्तू बॅगेत व्यवस्थित ठेवल्या. थोड्या वेळाने दोघा बंधूंना आनंदवन दाखविण्यासाठी घेऊन गेलो. साडे-चारशे एकरावरील प्रकल्प दाखविताना दमछाक झाली. रात्री उशीरा परतलो. तोवर जेवणाची वेळ टळत आली होती. लगबगीने फ्रेश होवून आम्ही जेवणे उरकली. दिवसभराच्या दगदगीने रात्री झोप केव्हा लागली ते समजलेही नाही.

सकाळी लवकर जाग आली. आनंदवनातील हा माझा शेवटचा दिवस होता. आज मला गावी परतायचे होते. खूप उदासवाणं वाटत होतं. सकाळची सर्व कामे यांत्रिकपणे उरकली. भोजनगृहात जावून चहा- नाष्टा घेतला. आनंदवनातील काहीजण ओळखीचे होते त्यांच्याही गाठीभेटी झाल्या. सर्वांचा निरोप घेतला. तेथून थेट विकासभाऊंकडे गेलो. त्यांचाही निरोप घेतला.
“जावू नकोस थांब प्रमोद. इथेच तुझे लग्न लावून देतो.” विकासभाऊंचा आग्रह सुरु होता. पण.... माझा मार्ग आता ठरला होता. निघणं भाग होतं.

रुमवर आलो. सामानाची आवराआवर केली अन बॅगा भरल्या. आता एकच काम बाकी होतं. शेवटी जाता-जाता बाबांचा निरोप घ्यायचा होता. शेवटचा निरोप घेण्यासाठी मला पुनःश्च त्यांच्यासमोर जावं लागणार होतं. पण आता पाय उचलत नव्हता....पायात मणा-मणाच्या बेड्या घातल्यासारखं झालं होतं. त्यांच्या समोर उभा ठाकून मी त्यांचा निरोप कसा घेणार होतो ? काय बोलणार होतो ? कशी समजूत घालणार होतो ? बोलण्यासाठी माझ्याकडे आता शब्द तरी कोठे होते? अंत:करण भरुन आले होते. कोण जाणे....बाबांना दुबार भेटणे आता शक्य होणार होते की नव्हते? कदाचित...ही शेवटचीच भेट होती. पापण्यांच्या कडा ओलावल्या होत्या. जड अंत:करणाने मी एकटाच त्यांच्या निवासस्थानी गेलो.

तेही तिथे एकटेच होते. कॉटवर पडून पुस्तक वाचण्यात दंग होते. माझी चाहूल लागताच हातातील पुस्तक बाजूला ठेवले. मला जवळ बोलावले. मी जवळ जावून चरणस्पर्श केला आणि समोर उभा राहिलो. मला आता काही बोलवत

नव्हते. शब्दांनी रुसवा केला होता. ते अबोल झाले होते. माझी मनोवस्था त्यांच्या ध्यानी आली असावी. काही क्षण निःशब्द सरले. बाबांच्या चेहऱ्यावरील भाव हळूहळू पालटत होते. मी त्यांना आता सोडून चाललो होतो. ते उठले, त्यांनी माझा हात आपल्या हाती घेतला. अन् माझ्या डोळ्यात पाहत खिन्नपणे मला विचारले,

"आता, पुन्हा कधी भेटायला येशील ?"

"लग्न झाल्यावर तुमचा आशीर्वाद घेण्यासाठी नक्की येईन." समजावणीच्या सुरात मी बोललो. त्यांनी फक्त मान हलवली. डोळ्यांचे कड पाणावले होते. कंठ दाटून आला होता. स्वर कातर झाला होता.

"मला सोडून चाललास. आता ही आपली शेवटचीच भेट."

....माझं काळीज हेलावलं.... शब्द मुके झाले.... काय बोलावे.... मला काहीच सुचेना. त्या नीरव शांततेत आम्ही बराच वेळ नि:शब्द होतो. कोणी काहीच बोलत नव्हते. दोघांच्याही डोळ्यात अश्रू दाटलेले....

शृंखला पायी असू दे...

शृंखला पायी असू दे, मी गतीचे गीत गाई
दुःख उधळायास आता, आसवांना वेळ नाही ॥ धृ ॥
ओस आडोशात केले, पापण्यांचे रिक्त प्याले
मीच हया वेडावणाऱ्या, माझिया छायेस भ्याले
भोवती होते घृणेचे ते थैंब घोंगवणारे
संपले होते निवारे, बंद होती सर्व दारे
वाडगे घेऊन हाती, जिद्द प्राणांची निघाली
घाबरी करुणा जगाची लांबूनी चतकोर घाली
माझीया रक्तासवे अन् चालली माझी लढाई
दुःख उधळायास आता, आसवांना वेळ नाही ॥ १ ॥
त्या तिथे वळणावरी पण वेगळा क्षण एक आला
एकटे एकत्र आले आणि हा जत्था निघाला
घोर रात्री श्वापदांच्या माजलेले रान होते

पांगळ्यांना पत्थरांचे ते खडे आव्हान होते
टाकलेली माणसे अन् व्यक्त ती लाचार माती
त्यातुनी आले ऋतूंचे भाग्य ह्या घायाळ हाती
पेटती प्रत्येक पेशी मी असा अंगार झाले
आसवे अन् घाम यांचा आगळा शृंगार चाले
वेदनेच्या गर्द रानी गर्जली आनंद द्वाही
दुःख उधळायास आता, आसवांना वेळ नाही ॥ २ ॥
कोंडलेल्या वादळांच्या ह्या पहा अनिवार लाटा
माणसासाठी उद्याच्या येथुनी निघतील वाटा
पांगळ्याच्या सोबतीला येऊ दया बलदंड बाहू
निर्मितीच्या मुक्त गंगा, द्या इथे मातीत वाहू
नांगरू स्वप्ने उद्याची, गर्द ही फुलतील शेते
घाम गाळीत ज्ञान येथे, येथुनी उठतील नेते
हयाचसाठी वाहिली ही सर्व निढळांची कमाई
दुःख उधळायास आता, आसवांना वेळ नाही
दुःख उधळायास आता, आसवांना वेळ नाही ॥ ३ ॥

- बाबा आमटे

डॉ.प्रमोद सूर्यवंशी

एका अवचित क्षणी मनात निर्माण झालेल्या अनोख्या ध्येयप्राप्तीच्या स्फुल्लिंगाने अस्वस्थ झालेल्या तरुणाने केलेल्या साहसाची ही अंत:करण हेलावून सोडणारी कहाणी आहे. या साहसाने बेभान होऊन त्याने जो काही काळ प्रवास केला, तो मुलखावेगळा होता. या प्रवासात ज्या महामानवाने व त्याच्या परिवाराने दुरासाध्य रोगाने पीडीत झालेल्या व समाजाने बहिष्कृत ठरविलेल्या माणसांच्या पुनर्वसनासाठी जे प्रचंड विश्व साकार केले आणि त्यात करुणेने पुनित झालेले महाभारत रचले त्याच्या दर्शनाने स्तिमित झालेल्या तरुण डॉक्टराची ही गाथा आहे. या प्रकारच्या अनेक गाथा जगणारे तरुण जसे निर्माण होतील तशी भारताच्या स्वातंत्र्याला सार्थकता लाभेल आणि आज मोकाट सुटलेले अनेक कलंक पुसून जातील अशी आशा धरता येते. या प्रकारचे अनुभवकथन केल्याबद्दल डॉ.प्रमोद सूर्यवंशी यांना धन्यवाद दिले पाहिजेत.

– म.द. हातकणंगलेकर

ज्येष्ठ समीक्षक